

कथासंग्रह

# मावळतीच्या सावल्या

लेखक

ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

# मावळतीच्या सावल्या

## कथासंग्रह

अ‍ॅड. यशवंत बाबुराव कदम,
नमनेश्वर

कोमल
प्रकाशन

**मावळतीच्या सावल्या /कथासंग्रह**
Mavltichya Savlya / Kathasangrah
पहिली आवृत्ती : १ मे २०२३
ISBN No. : ?

**लेखक :**
© ॲड. यशवंत बाबुराव कदम
बी-११०१, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८९२०४६८६८/९६१९३६०६६१

**प्रकाशक :**
१) कोमल प्रकाशन
३०२, कृष्ण श्रद्धा, पांचाळनगर,
नालासोपारा (प.), जि. ठाणे.
मोबाईल : ९१३७६ ६५९६८/९९८७७ ७६८९९
२) ई-साहित्य प्रतिष्ठान

**मुखपृष्ठ :**
नरेश ठाकूर
मोबाईल : ९८२०३८०२९९

**अक्षर जुळणी :**
चैतन्य आर्टस्, दादर, मुंबई ४०० ०२८.
मोबाईल : ९२२३४७८४८९

**मुद्रक**
----

**मूल्य**
रु. १६०/-

**'मावळतीच्या सावल्या'** या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा... **ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# मावळतीच्या सावल्या

(कथासंग्रह)

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक- **ॲड. श्री यशवंत बाबुराव कदम**

आणि प्रकाशक- **कोमल प्रकाशन**

यांचे मनःपुर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण ॲड. श्री. यशवंत बाबुराव कदम यांना **ybkadam14@gmail.com** या ई मेल पत्त्यावर किंवा **9892046868** या phone क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

# अल्प–परिचय

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**

बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

| | |
|---|---|
| **जन्मतारीख** | : १४ ऑगस्ट १९४८ |
| **मूळगांव** | : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी |
| **प्राथमिक शिक्षण** | : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई |
| **महाविद्यालयीन शिक्षण** | : रुईया महाविद्यालय, मुंबई<br>न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई |
| **नोकरी** | : आयकर खाते (मुंबई) येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त<br>सध्या – मुंबई उच्च न्यायालयात वकिली<br>***<br>खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग<br>काव्यमंच, मुंबई<br>कोकण मराठी साहित्य परिषद<br>मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई<br>लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था<br>*** |

**प्रकाशित साहित्य** :

१. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५

२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८

३. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५ जून २०१०

४. अंतरंगत (काव्यसंग्रह) २८ फेब्रुवारी २०१०

५. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह २०११

६. जय दुर्गे (आरती संग्रह) २०११

७. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२

८. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११ जानेवारी २०१३

९. तांडव (चरित्र) ११ जानेवारी २०१३

१०.जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती

११.श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, ८ मे २०१३

१२.बोलके झाड (कथासंग्रह) मार्च २०१६
१३.महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च २०१६
१४.दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल २०१६)
१५.आकाशाचे पंख (कथा संग्रह) १८ फेब्रुवारी २०१७
१६.अंतरीचा दीप (अभंगगाथा) १२ एप्रिल २०१८
१७.गडगीचा डोह (कथासंग्रह) २० मे २०१८
१८.देव माणूस (व्यक्तिचित्र) मे २०१८
१९.लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च २०१९)
२०.हरिपाठ चिंतन (मार्च २०१९)
२१.वळणावळणाची वाट (कादंबरी) १६ डिसेंबर २०२२
२२.मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२३.गरुडझेप (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२४.ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२५.लंडनचा किनारा (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२६.आडवळणाची वाट (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२

**आगामी पुस्तके** :
- ◆ चांदण्याचा पाऊस (ललित लेख)
- ◆ मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)
- ◆ शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
- ◆ क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)
- ◆ आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ – एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)

**पुरस्कार** : 'जीवन गौरव पुरस्कार' – वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.
लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार २०१८ बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार २०१८ कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, २०१८.

# अर्पण पत्रिका

''मावळतीच्या सावल्या'' हा माझा कथासंग्रह
मी माझे आदरणीय
**श्री.रमाकांत शंकरराव सावंत**
यांना अर्पण करीत आहे...

– ॲड. यशवंत बाबुराव कदम
नमनेश्वर

# माझे दोन शब्द

खरे तर कोरोनाचा दोन अडीच वर्षाचा काळ संकटांच्या काळ्या कुट्ट ढगांनी व्यापून माणसाना शापित ठरला. पण मी निघालो नशीबवान. कोरोना पुर्वी कोकणात जाणे झाले. आमच्या घराच्या बांधकामासाठी आणि मी अडकलो. वेळ निवांत मिळाला आणि कथा, कवितांचा पाऊस, पावसाळ्या आधीच सुरु झाला. खूप काही लिहिले शंभर वर कथा लिहिल्या आणि कोरोना संपल्यावर आता याचे काय करायचे अशा कैचित सापडलो.

मी कोकणात माझ्या गावात चिपळूणला. सगळ्याच सुविधांची वानवा. DTP ची सोय नव्हती. मोबाईलना रेंज नव्हती. वाहनांची अडचण. मार्ग सापडेना. वह्यांचे बाड तसेच पडून होते. काहीही उपाय सापडत नव्हता. एकदाची मुंबई गाठली. आणि सारे मार्गी लागले. माझ्या भगिनी नंदा ताई यांच्याकडे सगळे सुपूर्त केले. आणि पुस्तकांची वाटचाल सुरू झाली.

माझे मित्र, साहित्यिक, कवी श्री. कमलाकर राऊत यांनी ती जबाबदारी स्वीकारली. आता मी निवांत झालो. आणि दोन कथा संग्रहांचा मार्ग मोकळा झाला.

मी मुळचा कोकणातला. लाल मातीत वाढलेला, त्याला विचारा आचारांची जोड आणि त्या विचार चक्रातून कथानकातून नजर फिरत गेली, अक्षरब्रम्ह साकार होऊ लागले आणि कथांना आकार आला. हा माझा निवांतपणाचा उद्योग फलद्रुप झाला.

माझा ‘मावळतीच्या सावल्या’ हा चौथा कथा संग्रह आकार घेत आहे. त्यातल्या १६ कथा निवडून ११५ पानांचा कथासंग्रह काढण्याचे ठरले. ह्या सगळ्या कथांचे कथानक माझ्या सभोवती घडलेल्या घटना, काही काल्पनीक, विचार मंथनातून बांधल्या गेल्या. त्यात माझा सहभाग प्रकर्षाने होता. यात आत्मीयता होती. प्रेम अनुभव सारे साकार झाले.

या पूर्वी माझे बोलके झाड, आकाशाचे पंख, गडगीचा डोह हे तीन कथासंग्रह नंतर मावळतीच्या सावल्या चौथा आणि पाचवा कथा संग्रह ‘गरुडझेप’ या सोबत प्रकाशीत होत आहे.

‘गडगीचा डोह’ या कथा संग्रहाला, ‘बोलके झाड’ या कथा संग्रहाला अनेक पुरस्कार मिळाले. त्यात कोमसापचा पुरस्कार महत्त्वाचा.

माझ्या कथा संग्रहाच्या वाचकांनी प्रतिक्रिया दिल्या आणि त्यातूनच पुढच्या

लिखाणाला स्फूर्ती आली हे मात्र सत्य.

वयाची ७५ री पार करतांना हा सगळा उद्योग खूप संघर्षाचा आहे हे क्षणोक्षण जाणवले. या सगळ्या प्रवासात आदरणीय मधु मंगेश कर्णीक, डॉ.पांडूरंग भानुशाली, माझे कोमसापचे सहकारी बंधु, भगिनी यांचा आधार लाभला. लेखनाला लागणारे वातावरण, निवांतपणा यातून सारे साकार झाले. या लेखन प्रवाहात काही दिर्घ कथाही लिहिल्या गेल्या. माझे गुरुस्थानी असलेले डॉ.भानुशाली यांनी दिर्घ कथांचा एक कथा संग्रह काढावा असा सल्ला दिला. तोही पुढे मार्गस्थ होईल. शिवाय एक कादंबरी. माझ्या वाचकांनी यासाठी आशीर्वाद द्यावेत आणि माझी लेखणी थांबण्याआधी सारे मार्गी लागावे अशी सदिच्छा. माझ्या भगिनी नंदा साळवी यांची यात भूमिका मोठी, अन्यथा हे बाड मार्गी लागणे कठीण.

या कथा संग्रहात १७ कथांचा समावेश आहे. त्यातल्या काही ग्रामीण भागातील व काही शहरी भागाशी जोडलेल्या आहेत. काही काल्पनिक तर काही वास्तवातल्या. त्याचा कल्पनेच्या ऐरणीवर विस्तार झाला व त्या आज आपल्या समोर आहेत.

या सगळ्या कथांमध्ये सप्तरंगांची पेरणी झालेली तुम्हाला जाणवेल. प्रेम, आनंद, दुःख, कौटुंबिक, सामाजिक इ. नी सजलेली. माझ्या वाचकांच्या पसंतीस नक्की उतरावी, अशी आशा करतो.

हा कथा संग्रह ई-साहित्य प्रतिष्ठान या साईटवर प्रकाशित होत आहे.

पुन: या लेखन प्रवाहात ज्यांचे ज्यांचे मला सहकार्य लागले त्या सगळ्यांचा मी ऋणी आहे . त्यात करोनाचेही आभार मानायला हवेत, ह्याने मला निवांत वेळ दिला खरे की नाही ?

या कथा संग्रहाच्या प्रकाशनात ज्या ज्या सर्वांचे सहाय्य लाभले त्या सर्वांचा मी ऋणी आहे. या कथासंग्रहाला प्रस्तावना लाभली आहे जेष्ठ समीक्षक कमलाकर राऊत यांची. त्यांचाही मी ऋणी आहे. या कथा संग्रहाचे प्रकाशक कोमल प्रकाशनाचे शेट्ये, अक्षर जुळणी करणाऱ्या नंदाताई साळवी, मुखपृष्ठ साकारणारे नरेश ठाकूर या सर्वांचे मला सहकार्य लाभले.

माझ्या रसिक वाचकांना हा कथा संग्रह आवडेल अशी आशा करून मी थांबतो.

आपला नम्र,

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

**(नमनेश्वर)**

# प्रस्तावना

## प्रगल्भ अनुभूतीचा परिपाक – मावळतीच्या सावल्या

मराठी साहित्यात लिहिल्या जात अललेल्या कौटुंबिक, सामाजिक, वैज्ञानिक, रहस्यमय, विनोदी, गुढ आणि भयकथा अशा अनेक प्रकारच्या कथांमध्ये कौटुंबिक आणि सामाजिक कथांचीच संख्या अधिक आहे.

रामायणात दिसत असलेला नितीधर्म आणि आपापसातील स्नेह तसेच महाभारतात दिसत असलेले प्रेम आणि मायेसह सुडभावना, कौटुंबिक कलह आणि राजकारण, अशाच प्रकारचे विषय, आशय आणि पात्रांच्या भावभावना कमी अधिक प्रमाणात आणि थोड्याफार फरकाने अनेक साहित्यकृतींमधून चितारलेल्या दिसतात. मराठी साहित्यातील सामाजिक व कौटुंबिक विषयांच्या कथांमध्ये कुटुंबातील व्यक्तींमधील स्नेहापासून कलागतीपर्यंत अनेक बाबींची वर्णने आढळतात. याशिवाय व्यक्तीपरत्वे आचार, विचार, व्यक्तींचे बोलणे यांचे वर्णन वाचताना यातून तत्कालीन कौटुंबिक परिस्थितीची माहिती वाचकांना मिळते. याशिवाय अनेक कथांमधून समाजाला आदर्श ठरावे अशी पात्रेही दिसतात.

आज सर्व स्तरातील परिस्थिती आणि जगण्याचे संदर्भ बदलले आहेत परंतु मानवी मनातील भावभावनांमध्ये बदल झालेला नाही.

प्रत्येक लेखकाच्या लेखनावर, त्याचे जन्मठिकाण, त्याचे कुटुंब, त्याचे आप्तेष्ट आणि मित्र परिवार किंवा संपर्कात आलेल्या अन्य व्यक्ती यांच्यामधील परस्पर संबंध, तो वावरत असलेला परिसर या सर्वांचा परिणाम झालेला असतो आणि यामधून त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होतो. आणि मग हे जीवन जगत असताना घेतलेल्या अनुभवातून त्याची लेखणी बहरत जाते. ॲड.यशवंत कदम यांनीही आपल्या स्वानुभवांना शब्दांची मशागत करून कथांचा मळा फुलविला आहे.

मावळतीच्या सावल्या या शीर्षक कथेतून, सत्तरीत पोहोचलेल्या एका व्यक्तीच्या शारीरिक अवस्थेचे वर्णन करताना त्यांच्या मनाची होणारी अवस्थाही ॲड.कदम यांनी टिपली आहे. सुमारे साठ वर्षे वयानंतरच्या सर्वच व्यक्तींच्या जीवनातील प्रातिनिधिक चित्र येथे उभे केले आहे.

कोरोनामूळे एका व्यक्तीपासून समाजापर्यंत आणि गावापासून जगापर्यंत सर्व ठिकाणी व सर्व क्षेत्रात आणी सर्व स्तरावर विपरीत परिणाम झाला. यातून काही कौटुंबिक नातेसंबंधही बिघडले, हेच चित्र ॲड.कदम यांनी वादळी वाट आणि कोरोनाअसर या कथांमधून चितारले आहे. आणि याच कोरोनामुळे एका पोलिसाला आलेले अनुभव 'ना घरका ना घाट का' या कथेतून शब्दबद्ध केले आहेत.

एका गावात सारे काही आलबेल सुरू असताना गावाचा विकास करण्याचा प्रयत्न सुरू असताना एक पुढारी येऊन या विकासाला कशी खीळ घालतो हे दुभंग या कथेतून दाखविले आहे.

देव रिटायर होताना या कथेमध्ये, एखादी कठीण वाटणारी समस्या सहजपणे कशी सोडविता येते हे दाखवून दिले आहे. येथे नवऱ्यां पेक्षा बायकांची हुशारी अधिक असते हे अधोरेखित केले आहे.

लहानपणापासून मैत्री असून देखील भिडस्त स्वभावामुळे तरुणपणी एकमेकांसमोर आपल्या भावना व्यक्त करू न शकलेल्या दोन जीवांची ताटातूट जे सांगायचे ते राहून गेले या कथेतून, दाखविले आहे ,याउलट कितीही समस्या आल्या तरीही प्रेम असलेल्या व्यक्तीशीच विवाहबध्द होण्याचे मिशन कसे पूर्ण केले हे मिशनया कथेतून दाखवाले आहे. अशाच प्रकारची दोन भिन्न जातीच्या प्रेमी जीवांची व्यथा, टक्कर या कथेतून सांगितली आहे.

एखाद्या व्यक्तीच्या जीवनामध्ये एखादी घटना अपघाताने घडते परंतु त्याचे दुरगामी परिणाम संबंधित व्यक्तीला कसे भोगावे लागतात हे देवचारकथेतून दाखविलेले आहे आणि विज्ञान युगातही मानवी मनावर अंधश्रध्देचा पगडा कसा आहे हे सांगून लेखकाने निवेदकाच्या भूमिकेतून त्यावर भाष्य केले आहे.

लेखकाच्या मनातल्या असलेली भूतदया त्यांच्या बेवारस या कथेतून व्यक्त झाली आहे अशीच भूतदया, आंदण या कथेमधून दिसून येते. सुरसऱ्या आणि रातांबा कथेतून यशवंत कदम यांनी बालपणीच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. परंतु त्या केवळ आठवणी नाहीत तर या कथांमधून तेथील सामाजिक व आर्थिक परीस्थितीचे चित्र रेखाटले आहे आणि यातून सलोख्याचे, आपलेपणाचे भावही प्रगट झालेले दिसतात. अनुत्तरीत शल्य या कथेमधून प्रेमीयुगुलाच्या अंतरातील भावभावनांचे तरंग चित्रित केले आहेत. ॲड. यशवंत कदम यांच्या मनातील गावाबद्दलची ओढ, प्रेम, जवळीक आणि आपुलकी

त्यांच्या अनेक कथा मधून दिसून येते चिपाड कथेमधून दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या शेतकऱ्यांची एकूण परिस्थितीचे वर्णन करून एका शेतकऱ्याचे मातृभूमीबद्दलची आस्था दाखविलेली आहे .

रातांबा या कथेतून त्यांनी बालपणीचा स्वानुभव मांडलेला आहे परंतु यातून तेथील आपलेपणा प्रगट झालेला दिसतो. प्रतिशोध या कथेमधून दोन भिन्न व्यवसायात असलेल्या तरूण तरूणीचा विवाह झाल्यावर त्यांच्या जीवनात आलेल्या चढउतारांचे वर्णन केलेले आहे.

आपल्या सभोवताली घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींचा परिणाम कवी किंवा लेखकावर होत असतो आणि या परिणामाची परिणिती साहित्य निर्मितीत होत असते, ॲड.यशवंत कदम यांच्या सर्वच कथांमधून याचा प्रत्यय येतो.

साहित्य निर्मिती करीत असताना सर्वच लेखक आपल्या कोणत्याही प्रकारच्या कलाकृती मधून ज्ञान आणि मनोरंजन यासह समाज प्रबोधनही करीत असतो. ॲड.यशवंत कदम यांच्या 'मावळतीच्या सावल्या' या कथासंग्रहातील कथाही याला अपवाद नाही. त्यांनी आपल्या कथासंग्रहातील कथांमधून तत्कालीन परिस्थितीसह मानवी मनाचे अंतरंग चित्रित करण्याचाही प्रयत्न केला आहे.

ॲड. यशवंत कदम हे एक निष्णात वकील आहेत, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या कार्यकालात अनेक विविध प्रसंग पाहिले आहेत आणि समाजात वावरत असताना अनेक अनुभव घेतले आहेत याचा परिणाम त्यांच्या साहित्यावर झालेला दिसतो. त्यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या नितळ दृष्टीकेनातून, आपल्या स्वानुभवातून आणि निरीक्षण शक्तीव्दारे त्यांनी आपल्या कथांमधून अगदी साधे प्रसंग घेऊन कथांची मांडणी केली आहे. ते केवळ कथा सांगून थांबत नाही तर, प्रत्येक कथेतून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.तसेच त्यांनी काही चांगले संदेशही या कथांतून दिले आहेत.

या कथांना सामाजिक जाणिवेची किनार लाभलेली आहे. लहानशा प्रसंगातून मोठा आशय व्यक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे .

**– कमलाकर राऊत**

**कवी व समीक्षक**

# अनुक्रमणिका


१. मावळतीच्या सावल्या

२. रातांबा

३. अनुत्तरीत शल्य

४. सुरसऱ्या

५. ना घर का ना घाट का

६. दुभंग

७. मिशन

८. प्रतिशोध

९. टक्कर

१०. देवचार

११. आंदण

१२. चिपाड

१३. वादळी वाट

१४. जे सांगायचे राहून गेले ते

१५. कोरोना असर

१६. देव रिटार्यड होताना

१७. बेवारस

# मावळतीच्या सावल्या

जयंताच्या सत्तराव्या वाढदिवसानंतर तो मनाने हळूहळू एका वेगळ्याच चिंतेने, ग्रासला होता. पत्नीचे निधन, त्यातून आलेला एकाकीपणा, इंद्रियांचे रुसणे आणि छोट्या मोठ्या आजाराने आताशा तो बेजार झाला होता. शिवाय आताशा ढोपराच्या दुखण्याने मान वर काढली आणि फिरणे ही आटत चालले. त्यात येवढे मोठे तीन बेडरुमचे मुंबईतले घर ही रिकामे, भिंती खायला उठल्या होत्या. आणि त्यामुळे मनाला मायुसी आली होती. दिवस कसातरी जायचा पण संध्याकाळच्या सावल्या मनाचा थरकाप उठवायच्या, एकाकीपणाच्या भीतीने.

त्यांच्या निवृत्तीनंतर पत्नीच्या सोबत त्यांनी अमेरिका पाहिली. मुलांबरोबर राहिले पण शेवटचा हा मावळतीचा काळ खूपच अस्वस्थ करीत होता. मुले केव्हातरी वर्ष दोन वर्षाने मुंबईला येत. तेवढा विरंगुळा हाहा म्हणता महिना दिड महिना भूरकन निघून जाई आणि ती गेली की पुन्हा घरात शुकशुकाट. खाणावळीतून येणारा जेवणाचा डबा नित्यनियमाने येई. पण चहा करुन घेण्याचे त्राणही आता अस्वस्थ करीत.

विरंगुळा होता तो वर्तमान पत्रांचा सगळी वर्तमान पत्रे येत. पण तास दोन तासात बाजूला होत. त्यात टिव्हीची सोबत व्हायची पण, तीही आताशा नकोशी झाली होती. सिरीयल आल्हादकारक वाटायच्या पण आता त्यांच्याच जीवनाची सिरीयल त्याला कमालीची अस्वस्थ करीत होती. नाही म्हणायला घरातल्या निर्जीव वस्तुंची सोबत होती, सोईसाठी वापरण्याला. पण त्यातून समाधान नव्हते. कधी लबाड कोणी मित्र येत, दोन घटका सोबत होई पण ते गेले की, एकाकीपणाच्या सावल्या ग्रासीत तना मनाला.

दोन महिन्यापूर्वी सतराव्या वाढदिवसाला दोन्ही मुले, सुना, नातवंडे आली. घराचे गोकूळ झाले. पण ती पुन्हा परत गेली आणि जयंतराव कमालीचे अस्वस्थ झाले. खूप नातेवाईक समारंभाला आले. मुलांनी खूप मेहनत घेऊन, नजर लागावी अशी व्यवस्था केली. पण हळूहळू घर खाली होत गेले. आता कोणाची सोबत नव्हती, ना सहवास. मोबाईलवर संपर्कात होते सगळे. पण सहा महिन्यात सारा आनंद आटला होता.

सत्तरीपर्यंत ठीक चालले होते. पण जशे दिवस पुढे सरकत चालले मावळतीकडे त्याचे सावट मनाला अस्वस्थ करायला लागले होते. शेकड्यानी

मित्र पण आताशा त्यांचे प्रेम, माया आटल्या सारखी वाटायला लागली होती.

परवा रमेश सावंत हा जयंतरावांचा जिवश्य कंठच्छ मित्र सपत्नीक आला होता दोन तास घरी. पण त्या दोघांनी परतीच्या प्रवासाचा विषय चाळवला आणि जयंतरावांच्या एकटेपणाला खिंडार पाडले. अस्वस्थतेची शिदोरी देऊन ती उभयता गेली. आणि सारा नुरच पालटला.

''आता जयंता ! म्हातारपण आलेले जाणवते ना तुला. कालपर्यंत नव्हते सावट पण आता आपले किती दिवस राहिले. जातील तेवढे जातील, उरेल किती, उपरवाला जाणे..'' रमेश.

असे तो म्हणाला आणि खाईत लोटावा तसा त्यानी वेगळ्याच विचाराची पेरणी केली. तो गेला आणि जयंतराव मनाने ढेपाळले, पार जमिनीवर आले. आताशा दिवस विचार चक्रात जायचा, पण रात्र मात्र तणावयुक्त, खूप नर्व्हसनेस आला. त्यांना ''आता किती दिवस राहिले'' बस हाच विचार टोचत राहिला मनाला. आणि तनानेही नांगी टाकली. जेवण जाईना, डब्बा तसाच अनेकदा परत जाई. खाणे आटले आणि अशक्तपणाने ग्रासले. मुलांचे फोन येत, पण त्याना काय सांगणार ? सकारात्मक जगण्याला नकारात्मकतेने पुरते ग्रासले होते. आणि प्रकृती ढासळली. बी.पी. ने डोळे वर काढले आणि अनामिक, एकाकीपणाच्या सावल्या मनात फेर धरुन नाचायला लागू लागल्या. पण ते सावरले. त्यांच्या मित्राच्या मदतीने त्यांचे एक मित्र डॉ. सावले सतत संपर्कात असत आणि त्यांच्यामुळे ते आताशा सावरले होते. त्यानंतर वर्ष दिडवर्ष निघून गेले. मुलांनी पाठ फिरवली होती. त्यांचे फोनशी आता आटले होते. मित्रांचे येणारे फोन ही कमी झाले होते.

त्यांच्या ऑफीसच्या सहकाऱ्यांचा एक ग्रुप होता. साठ-सत्तर लोकांचा जयंतरावानीच ह्याची बांधणी केली होती. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सगळे जमत. वाढदिवस साजरे होत. लग्नाच्या पन्नासावे समारंभही होत. पण आता जयंतरावांचे तेथे जाणे कठीण झाले होते. त्यात एकट्याने प्रवास करणेही कठीण होऊन गेले होते. पण त्यांच्या वाढदिवसावर मेसेजवर मेसेज येत. यायचे दोन चार लोक पण तेवढेच हे सारे आठवून जयंतराव कमालीचे अस्वस्थ होऊन जात. व्हॉटस् ॲपच संपर्काचे साधन होते.

अनेक वेळा त्यावर कोणाचे निधन झाल्याची बातमी येई आणि त्यांच्या सहवासाच्या आठवणीने जयंतराव अस्वस्थ होत आणि आपलीही अशीच

बातमी एक दिवस येईल आपण ढगात जाताना पण ते झटकून टाकीत मनात येणारे ते विचार आणि स्वत:ला वाचनात गुंतवून घेत. वाचनालयातून पुस्तके त्यांच्या व्यवस्थेसाठी ठेवलेला मुलगा घेऊन येई. तेवढाच सुखावह वाटायचा वेळ त्याना पण पुस्तकातल्या दु:खद उल्लेखाने ते अधिक अस्वस्थ होत आणि त्या नकारात्मकतेचे सावट असह्य करी त्यांना आणि मग त्यांचे मन भूतकाळातले पाणवठे धूंडण्यात गर्क होत असे. अगदी बालपणात उतरुन सवंगड्यांच्या सोबत दंगामस्ती ही होई, पण पुन्हा येरे माझ्या मागल्या.

जयंतराव भारत सरकारच्या फिनान्स् डीपार्टमेंट मध्ये कमशिनर होऊन निवृत्त झाले होते. ते स्वत: सगळ्या प्रलोभनांपासून दूर राहिल्यामुळे ते कार्यालयात सगळ्यांचे लाडके. हवे हवे से वाटणारे व्यक्तिमत्व, त्यामुळे संपूर्ण आयुष्य स्वच्छ, पारदर्शक होते ना व्यसन कसले, पण अनेक छंद त्यांनी जोपासले होते. ते उत्तम बॅडमिंटन पट्टू होते. नॅशनल लेवलचे हजारो माणसे जोडली त्यानी. तो एक छंदच होता त्याना पण आता वाढत्या वयात सारे आठवणीतच बंदिस्त झाले होते.

परवा त्यांना त्यांचे एक वरिष्ठ सहकारी दास यांची आठवण झाली. गेल्या ३/४ वर्षात म्हणजे कोरोनाच्या काळात त्यांचा संपर्क नव्हता. त्यांना फोन करावा असे सारखे त्यांचे मन सतावीत होते. ते आता ५० वर्षाचे असावेत. म्हणजे वयस्करच, पण फोन नंबर नव्हता. मोबाईलवर वेगळ्या नावाने तो होता पण सारे विस्मृतीत गेल्याने शोधता येईना आणि म्हणून त्यांचे एक मित्र माथूर यांना त्यांनी फोन केला. त्यानी जी बातमी दिली त्याने जयंतराव हादरले. दास साहेब दोन महिन्यापूर्वीच गेले होते. हि ती बातमी. तो दिवस आणि पुढचा संपूर्ण आठवडा जयंतरावाना धड जेवण गेले नाही. अशी अनेक जीवाला जीव लावणारी माणसे निघून जात होती. आणि ती पोकळी या उतारत्या काळात अधिक अस्वस्थ करीत होती त्यांना.

हा आपला मावळतीचा काळ आहे, याची जाणीव जयंतरावाना झाली होती आणि दिवसे दिवस त्यांच्या मनाची अस्वस्थताही वाढत होती. मुले दुरावली होती, मित्र दुरावत चालले होते, नातेवाईकांचाही तिच तऱ्हा. सोबतीला फक्त या अबोल भिंती घराच्या आणि मनांची अस्वस्थता.

आणि अजून एका गोष्टीने डोके वर काढले होते ते म्हणजे विस्मृती. त्यानंतर जयंतरावाच्या अडचणीत अधिक भर टाकली होती. ती म्हणजे विसर भोळेपणा

आता थोड्या वेळापूर्वी काय केले हे त्यांना आठवायला तयार नव्हते. औषधाचे डोस दोन दोन वेळ घेण वेगळे तरी खाणावळीत फोन करीत. एक वस्तू ठिकाणावर सापडत नव्हती. त्यामुळे त्यांचे जगणे त्यांना असह्य झाले होते. त्यात अधिक म्हणजे कोण आले गेले तर चेहरे आणि नाव याची फारकात व्हायची. कितीही ताण दिला डोक्याला तरी दरवाजे बंद ते बंद. घराचा तर त्यांनी कबाड केला होता. एकतर काम होईना त्यात हा आठवणीचा बट्याबोळ. अहो इतकेच काय हल्ली ते बँकेतली आपली सहीही विसरले होते. क्रेडीट-डेबीट कार्डाचे पीन ही विसरले होते. मग त्यांनी बँकेत अंगठा लावण्यास सुरुवात केली. आणि यामुळे त्यांची अस्वस्थता वाढत गेली होती. फोनचे नंबरही आठवेनात काय सांगू, जगणे हे नरक झाले होते. त्यांना उपाय सापडत नव्हता. म्हतारपणाने आपली जात दाखवायला सुरुवात केला होती. त्या अशा जगण्यापेक्षा मरण बरे असे जयंतरावाना सारखे वाटे. पण त्यानेही पाठ फिरवली होती.

आणि आता सोबत होती ती क्षितीजाकडे सरकणाऱ्या 'मावळतीच्या सावल्यांची'

या मावळतीच्या सावल्या आपल्याला वाकुल्या दाखवित आहेत असे आताशा त्याना वाटू लागले होते. सगळे सवंगडी ही गेले. उरले ते हाताच्या बोटांवर मोजता येतील असे. एकाएकी त्यांना वाटू लागले कि आपण ही मुंबई सोडावी. जावे कोकणात आपल्या गावाला. पण इंद्रिये रुसली होती. आणि तो विचारही त्यानी झटकून टाकला. पण मन मान रेंगाळत होते. त्याचे आजोळ, शाळा, तेराली नदी, दऱ्या डोंगर यात. आठवे आपली मित्रमंडळी, आजी, आजोबा, तिथली देवळे, घनदाट जंगले, निसरड्या वाटा आणि जिथे जिथे ते वादरले ती सगळी ठिकाणे, माणसे, मित्र, मैत्रिणी, सारे सवंगडी आणि तो एकच विरंगुळ्याचा आधार आता उरला होते ते जगणे, जगणे होते. याची प्रकर्शाने जाणीव जयंतरावाना होत होती.

आपण आता मावळतीच्या क्षितिजाकडे जात आहोत हे त्याना जाणवत होते आणि ते या साऱ्या आठवणीनी ते अस्वस्थ होत होते. धडधड वाढे हृदयांची, मन स्थिर होत नव्हते ते पळत होते. 'मावळतीच्या सावल्या' सोबत क्षितिजावर जायला. दिशांतराच्या शोधात.

०-०-०

# रातांबा

शिमगा आणि कोकण यांचे जीवाभावाचे नाते, तसेच आंब्या फणसाचेही अतूट नाते. डिसेंबर महिना सरला की आंबे मोहरायला सुरुवात होते आणि संपूर्ण झाड फुलून जाते नि त्यांचा रंगही सोनेरी होतो. समजावे यावर्षी चंगळ होणार बाल-गोपाळांची. मग आंब्याच्या चवीची गोडी घोळायला लागते जिभेवर पोराटोरांच्या. वेड्यासारखी आम्ही सगळी मुले आंब्याखाली जमा होऊन कच्च्या कैऱ्या खाण्यासाठी जमा व्हायचे आणि धम्माल यायची.

आमच्या शाळेच्या वेळा व्यतिरिक्त आमचे बस्तान आंबराईत असायचे. प्रत्येकाच्या शिखात तिखट-मिठाची पुडी हमखास आणि शिवाय एक लहानसा चाकू असायचाच. आंब्याच्या कैरीची चव अविट असते. आम्ही मुले आंब्याचा मोसम कधी येतोय याची पाखरासारखी वाट पहायची. कधी पडलेल्या, कधी दगडी मारून वा चढून काढलेल्या कैऱ्याचे पन्हेही मोठी माणसे करीत.

आंबे चोरून आणायचे नाही. यासाठी घरून दम भरलेला असायचा. शिवाय आंबेवाल्यांची करडी नजर असायची आमच्या वानरसेनेवर. खरं सांगू तरी आंब्याच्या कैऱ्यांसाठी जीव तुटायचा एप्रिल मे मध्ये. आंब्यावरचे उरले सुरले आंबे जेव्हा पिकायला लागत ते खाण्यासारखा आनंद तो दुसरा काय ?

आमचा गाव कोकणात टेरव. गावात अनेक भली मोठी आंब्याची रायवळ झाडे अगदी घराघराच्या कुंपणात असायची. तेव्हा हापूस आमच्या गावात आला नव्हता. पण कोणी कोणी लावायला सुरुवात केली होती. पण सारी मदार होती आमची ती रायवळ आंब्यावरच. नारळांबा, घोडांबा, बिटकी, कोनातला सगळ्या आंब्यांची चव वेगळीच असायची. खायला खूप आवडायचे आम्हाला. हा सगळा उपक्रम आंब्याचा मोसम संपेपर्यंत चालू असायचा.

त्याकाळी आंबा उतरणे हा प्रकार मोठा. वाडीतले सगळे लोक मग एका ठिकाणी जमत. आणि एका एकाच्या कुंपणातले आंबे उतरले जात. म्हणजे काढले जात. आम्ही सगळी मुले त्या आंब्याखाली जमा होऊन पडलेले आंबे जमवत असू. तेव्हा आमची हत्यारे म्हणजे बेचक्या मॅन झालेल्या असत. मग त्या आंब्याखाली घोळक्याने बसून आम्ही खात फस्त करीत असू वा घरी येऊन पन्ह्याचा आस्वाद मनसोक्त घेत असू. एखाद्याने आंबा उतरवला की ते झाड आम्हा मुलांच्या ताब्यात, आंबे शेड्यावरचे, अडचणीतले, उतरता येत नसत .

मग त्याचे मालक आम्ही मुले. शाळेच्या परिक्षेनंतर सुट्टी पडताच मग आमचा मुक्काम आंब्याखालीच असायचा.

काही नामचीन आंब्याची चव फारच लाजवाब. त्या झाडांवर आमची नजर सारखी असायची. पण कधी कधी मालकांची नजर चुकवून आम्ही आंबे चोरून आणत असू. त्याची आढी घालायची आणि पिकले की आमची चंगळ. काय सांगू आजही त्या आंब्यांची चव जिभेवरून जात नाही हो. अगदी आमच्या उतार वयात आता. त्या सगळ्या आठवणी आता चाळवतात मनात. जेव्हा आम्ही त्या वेळची मुले आता चावडीवर जमा होतो. गप्पांच्या ओघात मग अनेक लाजवाब प्रसंग चघळलाय. किती आनंद होत होता, तो नाही शब्दात मांडता येत.

त्यातली एक म्हणजे; माझ्या घराच्या शेजारी मोरे नावाच्या एका मानकऱ्याचे घर होते. त्यांच्या परसातील एक आंब्याचे झाड, त्याला आम्ही रातांबा म्हणत असू. आजही डोळे मिटले की त्याचा डेरेदार झोक नजरेसमोरून हलत नाही आणि त्यावर येणारे बचके एवढे पिवळे धम्मक आंबेही नजरेसमोरून हलत नाहीत. आता हा रातांबा घराच्या मागच्या कुंपणात. सगळ्या आंब्याच्या अगोदर त्याला मोहर येई आणि मग घमघमाट सुटायचा. संध्याकाळी वारा सुरू झाला की आमच्या नाकात शिरायचा. आंब्याच्या मोहरानेच आम्ही तृप्त होत असू. पण त्या आंब्यावरचे आंबे काही आम्हाला काढता येत नव्हते. दगड मारला की आंबा कुंपणात पडे. मग मोठी पंचायत होई. आम्ही मुलांनी ठरविले आंबा पिकायला लागला की काहीही करून आंबे काढायचे आणि यथेच्छ ताव मारायचा. बरे ते मालक वयस्कर, सदानकदा घरात. मग आम्हाला आंबे कसे काढता येणार. बरे आमच्या जीभेवर पूर्वी खाल्लेला आंबा पिंगा घालायला लागायचा. बैचेन होत असू आम्ही. दरवर्षी आंबा नाही आला. त्याचा तर सगळा आंब्याचा सिझन फुकट गेला असे वाटते.

आम्ही मुले तशी १२/१३ वर्षाच्या वयातली. आताशा काहींना झाडावर चढण्याचा सराव झाला होता. अगदी आंब्याच्या टोकापर्यंत. यावर्षी काहीही करून रातांब्यावर धाड घालायचा बेत आम्ही केला. आमची मालकावर पाळत असे. ते कधी घरी असतात. कोठे जातात. घरात त्यांच्या शिवाय एक म्हातारी. तिला दिसतही नव्हते आणि कानाने बहिरी. आम्ही कधीकधी सगळी मुले त्यांच्या पडवीशी जावून बसत असू. माग घेण्यासाठी आणि एक दिवस तशी संधी आली.

रातांबा नुकताच पिकायला लागला होता, पिवळे धमक बचके एवढे आंबे पाहून बघा जीव कासावीस व्हायचा. पाणी पिण्याच्या निमित्ताने आम्ही मुले त्यांच्या पडवीत जमा झालो. तेव्हा समजले मोरे आजोबा बाजाराला चिपळूणला गेले आहेत. तो रविवार होता आणि मोरे आजोबा लवकर येणार नाहीत याची बातमी आजीने सांगितली. आम्ही मुलांनी बाहेर येऊन बेत केला. आज धाड घालायचीच. आमच्या ९ जणांपैकी चार जण दुपारी आजी झोपलेली असताना रातांब्यावर चढले. भराभर आंबे खाली येऊ लागले. त्यात पिक्के, कच्चेही होते. टोपल्या भरून एक एक आंबे लंपास करीत होता. दुपारी १ ते ३ या दोन तासात रातांबा पिवळ्याचा हिरवा दिसायला लागला. आम्ही मग घरी पळून गेलो. कोणाला मागमूस न लागता.

सगळ्या आंब्याची लगोलग आढी घातली. दोघातिघांच्या माळयावर आणि तेरी बी चूप आणि मेरी बी चूप. मोरे आजोबा रात्री उशीरा घरी आले. तेव्हा बसचा प्रवास नव्हता. बैलगाडीने किंवा चालत ४/५ कोसाचे अंतर कापून मोरे आजोबा घरी आले तेव्हा खूप रात्र झाली होती. सकाळी उठून ते परसावनात गेले तेव्हा सगळा प्रकार उघडकीस आला. खूप शिव्या–शापांचा वर्षाव झाला पण ऐकायला आम्ही होतो कोठे ? आम्ही शाळेतून घरी आल्यावर मोरे आजोबांचा संशय आमच्या वानर सेनेवर होता. याचा बभ्रा सगळ्या गावभर झाला पण काही पुरावा नव्हता तेव्हा आम्ही सही सलामत सुटलो. ते आढी घेतलेले आंबे  आठवडाभरात पिकायला लागले. आमची वानरसेना माळ्यावर बसून रसाळ गोड आंब्यांचा आस्वाद ते संपेपर्यंत घेत होतो. त्या १० दिवसात एकही आमच्यापैकी मुल आंब्याखाली दिसले नाही. मोरे आजोबांचा संशय खरा ठरला. आणि सगळे आंबे आम्ही सगळ्यांनी खाल्ले खरे. पण त्यावेळी ही आंब्याची चव जीभेवरून हटायला तयार नव्हती. न सांगताच आमची चोरी पकडली गेली होती. घरच्यांचाही मार, शिव्यांचा प्रसाद सगळ्यांना मिळाला पण यावर्षी रातांब्याने आमची मने तृप्त केली होती. मोरे आजोबांना राहिले गेलेले आंबे मिळाले. त्या आठवणीने आजही आमच्या आठवणी जाग्या होत आहेत. तो आंब्यांचा सिझन संपला. पावसाळा सुरु झाला. आणि तृप्त झालेली आमची मने अभ्यासात गुंतली.

ते वर्ष कसे गेली हे आम्हाला कळलेच नाही. आम्ही सगळी मुले ७ वी पास करून चिपळून, मुंबई, पुणे येथे ८ वी नंतरच्या अभ्यासाला गेलो. वर्षभर

आमच्या भेटीगाठी नव्हत्या. पण ८ वी च्या परिक्षा झाल्यावर आम्हाला ओढ लागायची ती गावाची. मुंबई सारख्या शहरात शाळेत होतो पण आमची मने मात्र घुटमळत होती ती गावात. गावातल्या सणवारात गौर गणपती, शिमगा, दसऱ्यातल्या भजनात. पण येणे शक्य नव्हते. तेव्हा बहुतेक प्रवास मुंबई ते चिपळून हा बोटीने व्हायचा. दिड दिवसांनी आम्ही गोवळकोट बंदरात उतरलो. मोठी बोट हर्णे पर्यंतच येई व पुढचा सगळा प्रवास हा होडीतून. एकदाचे माझे पाय चिपळूणला लागले. मग मात्र चालतच गावात आलो एक वर्षाच्या नंतर.

मी पोहोचलो व इतर मुले जी आमच्या वानर सेनेत होती बहुतेक पुढे मागे १५ दिवसात गावला पोहोचली. मग काय आंब्या-फणसाचा सीझन. वारा वादळा सारखी सगळी मुले आंब्यासाठी वेडीपीसी झाली होती. एकतर वर्षाभरानंतर गावात आलो होतो. अभ्यास नव्हता. आम्ही सकाळी बाहेर निघायचो. न्याहारी करून, मग नदीत मनसोक्त पोहणे व मग आंब्याखाली विटीदांडू, लगोऱ्यांचे डाव रंगत. वर्षभराचे खेळून घेत होतो आम्ही सगळे. आमच्या या वानर सेनेत इतर लहान मुले ही सामील झाली. २०-२५ जणांची पलटण सारे खेळ खेळत असु. मजाच मजा यायची.

पण, आम्ही गेल्या वर्षाच्या केलेल्या प्रतापामुळे बदनाम होतोच. तेव्हा मोरे आजोबांच्या घराकडे व रातांब्याकडे फिरकलो नाही. त्यांनाही चुटपूटल्या सारखे झाले होते. त्यांनी माझ्या आजीला बोलावून विचारले. राजू, आला का मुंबईहून. म्हणाली 'हो' पंधरा दिवस झाले.

''तुम्ही असे करा त्याला माझ्या घरी यायला सांगा. गेल्या वर्षाच्या प्रकाराने ही सगळी मुले माझ्यापासून फटकून आहेत. मला चुकल्यासारखे वाटत आहे'' मोरे आजोबा.

''हो! पाठवते की !'' आजी.

रात्री झोपताना आजी म्हणाली, ''राजू ते मोरे आजोबा भेटले. तुझी आठवण काढीत होते. म्हणाले यायला सांगा भेटायला.'' आजी.

''असे म्हणाले ते! कसे शक्य आहे. आम्ही गेल्या वर्षी त्यांच्या रातांब्यातले आंबे चोरले. मारही खाल्ला पोट फुटे पर्यंत. ठीक तरीही जाऊन येईन.'' राजू.

खरेतर यावर्षी त्या रातांब्यावर खूप आंबे आले होते. पण आम्ही मुलांनी तिकडे पाठ फिरवली होती. उगाच भांडतो, शिव्या शाप आणि मारही ! खरेतर आम्ही एका वर्षात खूप शहाणे झालो होतो. मग एक दिवस २/३ मुलांना घेऊन

मी मोरे आजोबांकडे गेलो. त्यांनी आमचे स्वागत केले. बसायला घोंगडी दिली. प्यायला पाणी दिले.

"तुम्ही बसा हं ! मी आत जाऊन येतो " म्हणत ते घरात गेले. आणि काय आश्चर्य त्यांनी रातांब्याचे टोपलीभर आंबे आमच्या समोर ठेवले. काय बोलावे ते कळेना. समोर आंबे होते. पिवळे धम्मक. पण आमची त्याच्याकडे पहायची हिम्मत होत नव्हती. आम्ही खजील होतो. तोंडातून ब्र निघत नव्हता.

"आजोबा ! माफ करा ! आम्ही गेल्या वर्षी तुमच्या रातांब्याचे आंबे चोरले होते. क्षमा करा !" राजू.

"मला माहिती आहे ! तुम्ही यावर्षी माझ्या रातांब्याकडे फिरकला नाही. म्हणून मलाही चुकल्या चुकल्या सारखे वाटत होते. खा ! सगळ्यांनी पोटभर खा!" मोरे आजोबा.

त्यांच्या डोळ्यात पाणी आले मी पाहिले. "आजोबा! तुम्ही आधी आमच्या समोर यातला आंबा खा ! मग आम्ही..." राजू.

"हो ! अरे मला डायबिटीस आहे पण तरी ही एक फोड घेतो" मोरे आजोबा.

त्यांनी एक आंबा उचलला... बस... आमची वानरसेना तुटून पडली त्या चवदार गोड आंब्यावर... टोपली खाली होई पर्यंत! भरल्या पोटाने आम्ही त्यांना नमस्कार करून घरी आलो. जेवणाची गरज नव्हती. पोट फुटेपर्यंत आंबे खाल्ले होते. रात्री झोपताना गेल्या वर्षीचा प्रमाद डोळ्यासमोरुन हलत नव्हता. .... मग प्रश्न पडला ... मोरे आजोबांना यावर्षी येवढी दया कशी आली ?

मे महिन्याची सुट्टी संपताच आम्ही सगळे आपआपल्या शहरात परतलो. पण जाताना मोरे आजोबांची मेजवाणी ची आठवण घेऊनच.

तुम्हाला आश्चर्य वाटेल. आम्ही सगळी मुले मोठी होत गेलो. शहाणे झालो. पण तरीही मोरे आजोबांच्या घरच्या आंब्यांचा स्वाद नंतरही आम्ही चाखत राहीलो.... आजही त्याची आठवण विसरता येत नाही. आता मोरे आजोबा गेले. रातांबाही तुटला पण आमच्या मनात तो अजून तसाच आहे. सगळ्या आठवणींसह अगदी आजही!!

०-०-०-०

# आंदण

शेतकऱ्याच्या प्रपंचाचा डोलारा खरेतर शेतीतील उत्पन्न, गुरेवासरे, दुधदुपते यावरच चालतो हे अख्या जगाला माहिती आहे. त्यात कोकणातला शेतकरी अठरा विश्वे दारिद्र्यात राहून आपला प्रपंच रेटीत असतो. त्यामुळे नोकरी करणारा कुणी असोत तर ठीक अन्यथा अर्ध पोटी रहाण्याची वेळ त्यांच्यावर येते. त्यातलेच एक शांताराम नाना, देवगड तालुक्यातले कालुस्ते गावचे. एका पाठोपाठ तीन मुली झाल्या आणि धास्तावलेल्या त्यांच्या जीवाने मुलगा होण्यासाठीचे प्रयत्न थांबविले. तालुक्याला जाऊन आपल्या पत्नीचे ऑपरेशन करुन घेतले, कारण अगोदरच्या तीन पाठोपाठ झालेल्या मुलींना उजवणे हा मोठा यक्ष प्रश्न त्यांच्या पुढे होता.

आता जमेची बाजू होती ती म्हणजे मुली मोठ्या झाल्यावर शेतात राबणारे हात हाताशी होते. दोन-अडीच खंडीची शेती व्हायची. त्यात मोठा आधार होता तो वाड्यातल्या दुभत्या जनावरांचा. दोन म्हशी होत्या, चार गाई यातल्या निम्म्यातरी दुध द्यायच्या आणि त्यांच्या दुधाच्या रतिबातून पैसे हातात खेळायचे. कपडा लत्ता, सणवारांची खरेदी, मुलींचे शिक्षण सारे त्यातून व्हायचे. सारे काही ठिक चालले होते.

त्यात दोन मुलींची लग्ने, अगदी थाटामाटात नाही पण सुखी घरात त्या गेल्या आणि नानांच्या डोक्यावरचे ओझे थोडे उतरले. शिवाय त्यांची पहिली बाळंतपणे प्रथेनुसार माहेरी. तसा जावयांचा फारसा उपयोग नव्हता. ते सारे नानानाच निस्तरावे लागले. एका मुलीचे तर सिझरीन झाले त्याचा खर्च म्हणजे डोक्यावरुन पाणी गेले. पण एकदाचे नाना सुटले यातून.

आता शेतातले काम करणारे चार हात कमी झाले, पत्नी वयस्कर. ती घरातलेच पहायची म्हणून अर्धी शेती करणे त्यांनी सोडले आणि काही विकून त्यातून दोन मुलींची लग्ने, बाळंतपणे पार पाडली त्यात कोरड वाहू शेती त्याला भाव तरी काय येणार. अल्पदरात विकावी लागली. गरजवंताला अक्कल नसते हेच खरे. उरलेल्या अर्ध्या शेतीत ते राबत होते. कोणाशी वाट्याने, गावातल्या माणसांच्या मदतीने आणि कशीतरी गाठीशी गाठ मारली जायची. शेती कमी झाली म्हणून दोन बैल विकले. एक नांगर कमी झाला. गुरे राखण्याचे काम त्यांनाच करावे लागे वा शेतीच्या काळात वाड्यात बांधून ठेवावे लागे. दुभते

होते. त्याच्याच जीवावर सारा संसाराचा डोलारा नाना हाकीत होते.

नानांची तिसरी मुलगी शामा आता १६ वर्षाची होती. शाळेत जात होती. ती १० वीत होती. गावातल्याच हायस्कूल मध्ये. अडी–अडचणीला तिचीच मदत व्हायची त्यांना. कधी गुरे चारण्यास नेण्यासाठी, शेण काढण्यासाठी, गुरांना पाणी पाजण्यासाठी. त्या काळात नळाचे पाणी नव्हते. नदीचे वा विहिरीचे पाणी आणून गुरांना पाजावे लागे. तेवढे काम शामा अभ्यास सांभाळून करायची. हुशार होती ती वर्गात पहिली, दुसरी यायची. तिने खूप शिकावे अशी नानांची इच्छा, कारण अगोदरच्या दोन्ही मुलींनी शाळा सोडली सातवीतून आणि शेतीला मदत होऊ केली. अर्थात त्यावेळी गावात हायस्कूल नव्हते. पण शामासाठी शाळा म्हणजे हायस्कूलची व्यवस्था गावातल्या गावात झाली ती रमाकांत मोरे यांच्या प्रयत्नाने.

नानांच्या गुरांवर त्यातल्या त्यात गाईवर शामाची जबरदस्त माया. त्याना खाऊ घालणे, पाणी पाजणे व त्यांच्या वासरांची देखभाल व खाणे–पिणे तिच पहायची. अगदी गळ्यात गळा घालून ती गाईना, वासरांना कुरवाळायची आणि तीही मोठ्या प्रेमाने तिचे हात, गाल चाटायची. त्यातल्या दोन गाईंची तीन–तीन विणी झाली होती. पडत्या काळात त्यानीच नानांचा संसार सावरला होता. तीसरी गाय आता पहिलीटकरीण तिचे नांव 'पंडी' कारण तिच्या कपाळावर पांढरा डाग होता. छान शिंगाची तांबूस रंगाची आणि देखणी पंडी तर नानांची लाडकी होतीच पण ती शामाचीही मैत्रिण होती. तिची आई 'टीबी' ती तर आता म्हातारी झाली होती. पण वाड्यातल्या इतर गुरांबरोबर चरायची. पण पार थकली होती. या वर्षीच्या पावसात तर ती वाड्याबाहेर पडलीच नाही. तर पंडीनेही एका तिच्या सारख्या गोंडस पाडसाला जन्म दिला. खूप दूध द्यायची ती तिच्या आईसारखी म्हणजे 'टीबी' सारखी. शामाचा विशेष जीव होता तिच्यावर.

पंडीचे दूध तर शामाच काढायची सकाळ, संध्याकाळी. दोन कासंड्या भरुन दूध द्यायची ती. इतर दोन्ही गाई आता गाभण होत्या. तेव्हा दूधाचा रतीब पंडीच्याच दुधावर चालायचा.

नानानी आता साठी पार केली होती, शेतीचे काम होत नव्हते सारी मदार पंडीच्या विश्वावर होती. शिवाय महिना दोन महिन्याने इतर दोन गाई विणार होत्या. मग दूध कमी पडणार नव्हते. पंडी जर्सी होती पण इतर गाभण गाई देशी

होत्या. त्यांच्या दुधाचा कस पण कमी अगदी पंडीच्या अर्धा.

शामा पंडीसाठी आंबवण, पेंड सारी व्यवस्था करायची. पंडीही शामावर खूष होती. असेल चार-साडे चार वर्षाची पण धष्टपुष्ट गोड स्वभावाची. शामा वाड्यात येण्याआधी तिला तिच्या येण्याची चाहुल लागे. म्हणजे पायातल्या चांदीच्या घुंगूरवाल्या साखळ्यांच्या आवाजाचा. निवांतपणे आंबवणे खात ती शामाला दूध काढू द्यायची. तिच्या चार आचळापैकी एक आचाळ वासराचा. त्याला ती जराही हात लावीत नसे. ते वासरु म्हणजे पाडी होती. तिचे नांव शामाने सुंदरी ठेवले होते. विशेष म्हणजे शामा दूध काढीत असताना सुंदरी दूध प्यायची बिनधास्तपणे व पोट भरल्यावर शामाचे हात चाटायची. तिला ढकलून ढकलून शामा दमायची. मग बांधून ठेवायची. तरीही ते आशाळभूतपणे पहायचे तिच्याकडे. हिसके देत दाव्याला. दूध काढून झाल्यावर मात्र शामा त्या सुंदरीला मोकळी सोडायची दूध प्यायला. सुंदरीनेही आता चांगले बाळसे धरले होते. अनेकदा ते शामा बरोबर अंगणात बागडायचे. मग त्याला आंजारुन गोंजारुन झाल्यावर वाड्यात नेऊन बांधायची ती. लहान वासराना गुरांबरोबर चरायला घेऊन जात नसत. तेव्हा विरंगुळा म्हणून शामा त्याच्याशी वाड्यात जाऊन खेळायची. खूप लळा लावला होता सुंदरीने शामाला.

श्रावण महिना संपत आला होता. नांगरणीतून नाना मोकळे झाले होते आणि आपल्या गुरांना घेऊन ते कड्यावर कुरणात सोडून यायचे. गुरांची पोटे भरली की आपल्या पायाने वाड्यात यायची. सगळीच शहाणी. कोणाच्या हद्दीत जात नसायची. आणि आपल्या आपल्या जागेवर उभी रहायची. अनेक वेळा दावे नाही लावले तरी सगळी गुरे आपआपल्या जागेवरुन पेंढा खायची. तो शामा अगोदरच घालून ठेवायची.

गणपतीचे दिवस जवळ आले होते व मग घटस्थापना. सगळेच सणासुदीचे दिवस. गावात हवा तसा उकडा जात नव्हता. पैशाची चण चण होतीच. आणि एक दिवस शेजारच्या गावातले रघुनाथराव त्याच्या मुलाबरोबर दुपारी आले. त्याना कोणीतरी बातमी दिली की, नानांची गाय विकायची आहे. चांगले दूध देते. गुणी जनावर आहे. नुकतेच नाना गुरे घेऊन आले व आंघोळ करुन ओट्यावर आले. पाहुण्यांना आलेले पाहून त्यानी ओटीवर घोंगडी टाकली व बसण्याची विनंती केली, तसे ते त्यांच्या मोठ्या मुलीच्या सासरचे होते तेव्हा ओळख होतीच. नानानी त्यांना पाणी आणून दिले व तेही बसले.

‘‘काय ? पाव्हणे. कसे फिरकलात इकडे, येण्याचे प्रयोजन तरी काय?’’ नाना.

‘‘तसे काही खास नाही!.... पण एक नड होती माझी मुलगी बाळंतपणाला आली आहे. मुल अंगावर पीत नाही. म्हणून दुधासाठी मला एक गाय हवी होती!’’ रघुनाथराव.

शामाने माजघरातून हे ऐकले, मात्र ताडकन ती ओटीवर आली.

‘‘नाना! पंडीला नाही विकायची ! प्राण गेला तरी मी तिला विकू देणार नाही. दुसऱ्या विका हव्यातर माझी ना नाही. माझी ती लाडकी आहे. जीव प्राण आहे ती माझा नाना !’’ शामा.

तिच्या पोटतिडकीच्या बोलण्याने पाहुणे चक्रावलेच. पाहुण्याचा त्यांच्या सोबत आलेला मुलगा तर ताडकन उठून उभा राहिला आणि पहातच राहिला शामाकडे. शामा सुंदर होतीच. नाकी डोळी सरस गोरी पान, नक्षत्रासारखी. तो पहातच राहिला तिच्याकडे. शामाने ते पाहिले व सरळ माजघरात गेली.

मग काही वेळाने तो मुलगा ओट्यावर बसला, दिसायला राजबिंडा, गोरापान, शिकलेला नुकताच सेंट्रल एक्साईजमध्ये नोकरीला लागला होता.. शामा त्याच्या मनात भरली.

‘‘ मी काय करु ? मला पैशाची चणचण आहे’’ पण मुलीच्या हट्टा पाई मी काही करु शकत नाही. आता तुम्हीच सांगा!’’ नाना.

‘‘तुमच्या मुलीच्या भावना मला समजल्या. आपल्या प्राण्यावर प्रेम करणारी मुलेही गुणी, सालस असतात असा माझा अनुभव आहे. तुमची मुलगी गुणी आहे. !’’ रघुनाथराव.

थोडा वेळ थांबून त्यानी आपल्या मुलाकडे पाहिले, काही तरी खाणा खुणा झाल्या.

‘‘ हे पहा ! नाना. माझी मोठी अडचण आहे. गावात थेंबभर दूध नाही. एकही दूभती गाय नाही. म्हशी आहेत पण त्यांचा उपयोग नाही. मला गाय तर हवी किंवा दुधाची, काहीतरी तातडीने व्यवस्था करावी लागेल. आता तुम्हीच उपाय सांगा. काही तरी !’’ रघुनाथराव.

थोडा वेळ शांततेत गेली. चहा पाणी झाले. पाहुणे जायच्या तयारीत होते...

‘‘तुम्ही असे करु शकता काय ? तुमचा गांव येथून तीन किलो मीटर तर आहे . पंधरा मिनीटाचा रस्ता. कोणी दूध घेऊन जाईल तर खूप बरे होईल.

पैशाचा प्रश्न नाही. तुमची मुलगी ही माझीच मुलगी समजतो मी. मुलाचे हाल व्हायला नकोत तेव्हा...!'' नाना.

'' हो ! काहीतरी व्यवस्था करतो!'' रघुनाथराव.

असे म्हणत त्यांनी १५,०००/- हजाराची रक्कम नानांच्या हातात ठेवली..

''अहो हे काय ? मला गाय विकता येणार नाही. मी माझ्या मुलीच्या सांगण्या पलीकडे नाही. तिची मर्जी ती माझी मर्जी.. हे पैशे परत घ्या!'' नाना.

''नको ! तुमच्या मुलीच्या भावना मला समजल्या. मुक्या जनावरांवर इतके प्रेम ! कमाल बाबा ! दूध घेऊन जाण्याची व्यवस्था करतो. हा माझा मुलगा महिन्याच्या रजेवर आहे. तो येऊन नेईल दूध ! पूढे पाहू !'' रघुनाथराव... थोडे थांबून.

'' पण नाना तुमची मुलगी जी इतके प्रेम करते ! माया करते तुमच्या गाईवर. ती गाय मला पहायची आहे ! दाखवाल !'' रघुनाथराव.

'' हो ! का नाही! पण विकणार नाही ! हे प्रथम सांगतो!'' नाना.

''चालेल!'' रघुनाथराव.

आणि ते वाड्यात आले तर काय पाहतात ते शामा पंडीला घट्ट मिठी मारुन रडत होती व तिला गोंजारत होती. हाताशी सुंदरी पण होती. हे पाहून पाहुण्यांचे काळीज द्रवले... त्याना पाहून शामा पंडी पासून दूर झाली नाही....

''काही केल्या मी पंडीला विकत देणार नाही! नाना पाहुण्याना परत पाठवा!'' शामा.

क्षणभर तेथे थांबून सारेच वाड्यातून बाहेर आले रघुनाथरावांचे डोळे पाणावले होते...

''अहो ! तुमचे पैशे परत न्या!'' नाना.

''नाही नाना ! मी गाय घेतली आणि तुमच्याकडेच ठेवली असे समजा!'' रघुनाथराव.

''आता ! दादा ! जेवणाची वेळ झाली आहे. जेऊनच जा ! तुमची ही रक्कम माझ्याकडे अमानत राहील !'' नाना.

आणि पाहुणे थांबले. जेवणाची वेळ झाली होती. जेवण साधेच पण प्रेमाने भिजलेले, ते वाढीत होती शामा. सगळी मंडळी जेऊन उठली. निरोपाचे सोपस्कर झाले येवढ्यात पाहुण्यानी शामाला बोलावायला सांगीतले.. शामा आली व पाहुण्यांच्या पाया पडली.

"ती माझी आवडती गाय आहे ! नाही विकून देणार मी.. प्राण गेला तरी .. नाना !" शामा.

"ठीक ! ती तुझ्याकडेच ठेव.. काही अडचण नाही... म्हणत त्यानी त्यांच्या खिशातून एक छानसा पेन काढून तिच्या हातात दिला...

" हा तुझ्या परीक्षेसाठी यशस्वी हो" ! रघुनाथराव "थॅक्स" शामा.

पाहुणे निघून आपल्या घरी गेले दुसऱ्या दिवसापासून रघुनाथ रावांचा मुलगा मोटर सायकल वरुन येऊन दूध घेऊन जात होता. त्याची रजा संपल्यावर तो मुंबईला गेला, दररोज तो शामाला पहात असे. तिच्या मर्यादाशील हाल चाली न्याहाळत असे.. आवडली ती त्याला...

तो गेल्या वर रघुनाथराव स्वत: येऊन दूध घेऊन जात होते. या उकड्याचे पैशे रघुनाथराव नानाना देत होते. आता तर दोन्ही घरांची चांगलीच गट्टी झाली होती. त्यात वर्ष केव्हा निघून गेले समजले नाही. रघुनाथराव रोज येऊन दूध घेऊन जात होते.

" अहो ! तुमचे पैशे गेले एक दीड वर्षे माझ्याकडे पडून आहेत ते घेऊन जा! मला हे ओझे खूप वाटते आहे !" नाना.

" नाही ! आता नाही ! मी सांगेन तुम्हाला त्याचे काय करायचे ते !" रघुनाथराव.

" ठिक आहे... पण हे ओझे लवकर उतरवा ! नाही झेपत मला !" नाना.

"नक्की !" रघुनाथराव.

शिमग्याचे दिवस जवळ आले होते. शामा आता १०वी पास झाली ७०% मार्क मिळवून आणि पी.टी.एस.चा कोर्स करीत होती. आता रघुनाथरावांचा इथल्या उकडा संपत आला होता. रघुनाथरावाची मुलगी मुंबईला गेली होती. त्यांच्या घरात इन मीन दोन माणसे ते आणि त्यांची पत्नी. तेव्हा तशी गाईच्या दुधाची गरज नव्हती. त्यांच्या घरात दूधदूभते होते. ते सैन्यातले निवृत्त कॅप्टन होते. नानांचे त्या गावी मुलीकडे जाणे येणे होत होते. घरोबा वाढत गेला... प्रेमाचे संबंध मैत्रीत दृढ झाले.. एकदिवस नाना त्यांच्या गावात गेले होते. "अहो ! कॅप्टन साहेब तुमच्या त्या १५,०००/-रु.... च्या अमानतीचे काय करु ? पुढच्या खेपेला, मी येताना घेऊन येईन !" नाना.

" ठिक !...पण ती वेळ येणार नाही !" रघुनाथराव.

" का बरं ?" नाना.

" नंतर सांगीन तुम्हाला !" रघुनाथराव.

शिमगा पार पडला. रघुनाथरावांचा मोठा मुलगा व छोटा राम ही गावाला आला होता. आणि एक दिवस त्यांची मोटर घेऊन नानांच्या दारात येऊन उभी राहिली. गाडीतून कॅप्टन साहेबांची पत्नी मोठा मुलगा व त्याची बायको नातवंडे आणि राम. सगळी मंडळी अचानक आली. तो रविवार होता. दुपारची वेळ होती.

"शामा ! आईला पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था करायला सांग !" नाना

" होय ! बाबा !" शामा.

आता शामाचा शिक्षकाचा पाठ्यक्रम पूर्ण झाला होता. ती खूपच छान दिसत होती. साडीत तर तिचे सौदर्य खुलून दिसत होते. शामाने बाहेर येऊन रघुनाथराव त्यांच्या पत्नीला नमस्कार केला. रामची नजर तर शामावरुन हटत नव्हती.. तेवढ्यात त्यांची नजरा नजर झाली आणि लाजून ती माजघरात गेली.

"बसा! आता जेऊनच जायचे. थोडा वेळ थांबावे लागेल !" नाना.

"अहो, आम्ही जेऊनच जाणार आहोत !" रघुनाथराव.

"छान ! मग आराम करा."

"हो !" रघुनाथराव.

पण पाहुणे कसले आराम करतात ते वाड्यात गेले. त्यांनी पंडीला पाहले आता तिचे वासरु ही छान झाले होते. बाळसे घेऊन.

हे पाहून नाना चरकले ! म्हणजे हे पंडीला नेणार की काय ?" ते थोडा वेळ बेचैन झाले होते.

मग जेवणे आटोपली.

"नाना ! आम्ही सगळे कुटुंबीय आज आलो आहोत एका वेगळ्या कारणासाठी ! तुमची प्रेमळ लेक शामा आम्हालाही लेकीसारखी आहे मला स्वत:ला लेक नाही. तेव्हा..." रघुनाथराव.

'तेव्हा काय ?' नाना

"काही चिंतेची बाब नाही! नाना आम्ही शामाला मागणी घालण्यासाठी आलो आहोत आमच्या या राम साठी. त्यालाही ती पसंत आहे. तेव्हा.."

"ठिक ! अगोदर शामाला विचारतो" ! नाना.

नाना माजघरात गेले. तर शामाने हा सगळा प्रकार ऐकला होता. ती ही लाजली. तिने आईला "हो" सांगा असे सांगितले होते...

मग नाना व त्यांची पत्नी बाहेर आले

''आम्हाला मंजूर आहे''! नाना.

शामा काही बाहेर यायला तयार नव्हती. ती वाड्यात पंडी जवळ गेली होती व तिला कुरवाळीत होती..

'' शामाला बाहेर बोलवा ''! रघुनाथराव.

''हो''! नाना.

पण शामा घरात नव्हती. बराच वेळ ती वाड्यातच पंडीच्या गळ्यात गळा घालून होती...

येवढ्यात शामा वाड्यातून बाहेर आली व ओटीवर येऊन तिने सर्वांना नमस्कार केला. एक कटाक्ष रामकडे टाकून ती आत जाणार..येवढ्यात.

''शामा ! बाळा ये इकडे ये..!'' रघुनाथराव.

म्हणत कॅप्टन साहेबानी आणलेले पेढे व साडी त्याच्या पत्नीने तिच्या हातात ठेवली...

''नाना ! आम्हाला आज आनंद झाला. आमच्या मनासारखे झाले आहे..! रघुनाथराव.

'' हो ! जरा थांबा.. तुमचे १५०००/- घेऊन येतो..

रघुनाथरावानी त्याना थांबविले...

''नाही ! नाना त्याची गरज नाही ! हे लग्न आमच्या खर्चाने आम्ही आमच्या गावात करणार आहोत''.. आणि एक करायचे नाना !'' रघुनाथराव.

'' काय ?''

'' घाबरु नका !...तुमच्या कन्ये बरोबर शामाची ती पंडी गाय व वासरु 'आंदण ' म्हणून आमच्याकडे पाठवायचे !'' रघुनाथराव.

'' हा ! जरुर ! '' शामालाही आवडेल, तिचा जीव आहे पंडीवर आणि तिच्या सुंदरीवर. '' नाना .

शामा ही हसली. सारी चिंता मिटली होती. आता शामाच्या आनंदाला पारावार राहीला नव्हता. एवढ्यात..

'' राम ! तू आणलेली अंगठी शामाच्या बोटात घाल !'' रघुनाथराव.

आणि रामने अंगठी शामाच्या गोऱ्यापान बोटात घातली. ती कमालीची लाजली होती. आता.

'' मी उद्या दूध न्यायला येईन हं !'' राम.

आणि सगळे खळखळून हसले.

आता शामाच्या मनावरील दडपण संपले होते ती आणि पंडी सासरला जाणार होते कायमचे.

०-०-०-०-०

# सुरसुऱ्या !

माझे बालपण माझ्या आजोळी म्हणजे पेढांब्याला गेले. मातबरांचा गाव, ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेला, सह्याद्रीच्या कुशीत वसलेला, गावात फारशा सोई नव्हत्या. त्याकाळी पण शाळा होती सातवी पर्यंत. पूर्व प्रा. शाळा, चांगली म्हणून आईने त्या गावात माझ्या आजोळी ठेवले. मी तेथेच वाढलो. शिकलो. पण गावात शाळेशिवाय कोणत्याही सुविधा नव्हत्या, ना पाण्याची चांगली सोय, ना रस्ते गावा पर्यंत. सगळा प्रवास व्हायचा तो बैलगाडीने. माझ्या मामाची बैलगाडी होती. तो हौशी होता. महादेव मामाला इतर सर्व मामानी कायम गावात शेती करायला ठेवला. पण त्याची सगळी हौस-मौज ते पुरवीत.

तर गावात शाळेशिवाय काहीही सोई नव्हत्या. दुकान होते एक तिसनकरांचे पण तेही खाली खालीच. पण त्याला बरकत येई ती सराईलाच. म्हणजे दिवाळी नंतर.

आता उन्हाळ्याची सुट्टी असायची. तिसनकराचे दुकान लवंग्या, फुलबाजे, कॅप यानी भरून जायचे. आम्हा मुलांसाठी ती मोठी पर्वणी असायची. घरातून फराळ आणायचे पैसे कोणी देत नव्हते. तशी गरिबीच म्हणा. पण मनात फटाके वाजवण्याचा मोह जबरदस्त. त्याकाळी गवत शेती कापून झालेली असे. तशी आम्ही सात-आठ मुले लहान मोठी असू आमच्या वाडीत. आम्ही त्या तिसनकराच्या दुकानाकडे उगाच चकरा मारायचो. चैन पडत नसायचे, सारखे त्याने दुकानाच्या दर्शनी लावलेल्या फटाक्याच्या दर्शनाने आमचे पोट थोडेच भरणार होते. रजेचे तीन-चार दिवस निघून गेले. आणि दिवाळी चार दिवसावर आली. येवढ्यात रघुने एक तरकिब काढली आणि सकाळीच तो माझ्या घरी आला.

''ये येशा! चल सोबत एक टोपली घे !'' रघू.

''पण कशाला हवी !''

''आपण आज दारपड्यात जाऊन शेतात पडलेल्या लोंबी जमा करायच्या. हम खास मिळणार आणि संध्याकाळी तिसनकराला देऊन त्याचे फटाके आणायचे!'' रघू.

हा खरे तर माझा पहिला अनुभव होता. तेव्हा मी पाचवीत असेन. मग सकाळी आम्ही निघालो दोन तासात खळ्यात पडलेल्या लोंबी (भाताच्या) नी

टोपली भरली आणि तिसनकराचे दुकान गाठले. दुपारची वेळ होती. मालक जेवत होता. पण आम्हा मुलांना पाहून तोही उठला. त्याने तागडी लावली. आमचे एका एकाचे भात त्याने तागडीत टाकले. वजन केले आणि त्याच्या किमती येवढे फटाके आमच्या टोपलीत घालून दिले, त्यात फुलबाजे, लवंगी फटाके, कॅपच्या डब्या असा बराचसा ऐवज आम्ही घेऊन घरी आलो. दुसरा दिवस, दिवाळी. चौकात आम्ही जमा झालो आणि उदबत्तीने ते वाजवायला सुरुवात केली. आवाजाने आजी बाहेर आली.

फटाके वाजवायचे कोठे हा प्रश्न होताच. पहिली गोष्ट म्हणजे घरे दाटी वाटीने, शिवाय गुरांचे गोठे तेही केंबळारी, शिवाय सराई झालेली घरा घरा समोर भाताच्या उडव्या. मोकळी जागाच नसायची. शिवाय शेताच्या चोंड्यात इतर गवत वाढलेले. संध्याकाळी मच्छर, विंचू यांची भिती. यातून आम्ही मार्ग काढला, की फटाके माझ्या आजोबांच्या घर परड्या बाहेरच्या गुरांना चरण्याच्या जागेत फोडायचे. तसे त्यात गवत वाढलेले. ठीणगीने गवत पेटायचे आणि नसती आफत. शिवाय सगळ्या मुलांबरोबर फटाके वाजवण्यात जी मजा ती मात्र एकट्या एकट्याने येत नसे. दंगा मस्ती, बोंबाबोंब याचाच आवाज फटाक्यापेक्षा मोठा यायचा. फटाके वाजवणे चालू होते आणि.... आजीचा आवाज.

"ये मेल्यानो ! कुठून आणलेत रे हे बार ! चोरून आणलात काय !" आजी.

माझी बोबडीच वळली. काय बोलावे समजेना. आजी महा खाष्ट विश्वास थोडाच ठेवणार होती आमच्यावर ? कसे कधी होते कां ? भात देऊन फटाके कोण देते का ? पन्नास शंका. एवढे सांगून अगदी काकुळतीला आलो तर फटके बसलेच आणि वाजलेल्या फटाक्याचे आवाज जिरण्याआधी आम्ही घरे गाठली. पोरे भित आमच्या आजीला एवढी तिची जरब होती. खाष्ट बाई, पुरूषही तिच्या नादाला लागत नसत.

थोडे फटाके सगळी मुले मिळून आम्ही वाजवले पण बरेचसे शिल्लक राहिले. उद्या दिवाळी पहिली अंघोळ. मग पोहे-बोरे खाऊन पळ काढला. आता आमच्याबरोबर आमची सगळी पलटन होती. सगळ्यांच्या हातात टोपल्या आणि दुपार पर्यंत सगळ्या टोपल्या भरल्या. खरेतर त्यासाठी आम्ही पांगलो होतो वेगवेगळ्या चोंड्यात. मग रघुने आवाज दिला. मला तर जेवणाची वेळ

चुकवणे शक्य नव्हते नाहीतर पुन:ओरडा. म्हणून आम्ही सगळेच जण तिसनकरांच्या दुकानात गेलो. सगळ्यानी फटाके घेतले आणि घर गाठले. मी मात्र माझे फटाके रघुबरोबर त्याच्या घरी पाठविले. उगाच संशय नको, तरीही....

"कोठे होतास सकाळ पासून ?" आजी.

मला उत्तर देता येईना, घाम फुटला. काय बोलवे समजेना. मी गप्प राहिलो. पण खोटे काहीतरी सांगून वेळ निभावली. माझे मौन काय ते आजीला समजले होते कारण आज वाडीतली सगळीच मुले गायब आहेत हे आजीला सकाळीच समजले होते. मी सकाळी भाकरी खाल्ली नव्हती, तेव्हा पोटात आंगडोंब. मी माजघरात गेलो. तर आजी मागून.

"भूक लागली का रे? "

"हो !"

"घे वाढून स्वत:च्या हाताने !" आजी.

जेवन आटोपून मी पुन: खेळायला गेलो, सगळी मुले जमली. त्यापैकी अर्ध्यांनी घरचा ओरडा खाल्ला होता. ते ऐकून सगळेच खळखळून हसले, उदया भाऊबीज त्या काळात भाऊबीज तशी काही करीत नसू. त्यात माझी बहीण आई बरोबर माझ्या गावात. तेव्हा तोही प्रश्न नव्हता. त्या काळात ही प्रथा नव्हतीच म्हटले तर चुकीचे होणार नाही. पण आम्ही उद्या सगळे फटाके संपवायचे या उद्देशाने कार्यक्रम आखला.

पऱ्याच्या पलीकडे मोकळी जागा होती तेथे सगळे जमलो. प्रत्येकाच्या हातात जळत्या शेणपुड्या होत्या. शिवाय थैलीत फटाके. मग क्रमाक्रमाने वाजवले जात, प्रथम लवंग्या, नंतर असले तर आपटी बार, मग सुरसुऱ्या आणि शेवटी दगडावर बसून कॅप. तेव्हा पिस्तुल वगैरे काही नव्हतीच ती नंतर आली. मग उरले सुरले, न वाजलेले फटाके घेऊन आम्ही घर गाठायचे. शाळेची रजा पण संपत आलेली असायची. एक-दोन दिवस बाकी होते. तिसनकरांच्या दुकानातले फटाके संपले होते, आता काय करायचे ? हा प्रश्न समोर होता. पण योग असा माझे काका. मावशीचे यजमान त्यांच्या गावाहून आले. ते कस्टमला होते. त्यांनी माझ्यासाठी फटाके आणले होते. आम्ही त्याच दिवशी सगळे फटाके संपवले. त्यावर्षी मोठी चंगळ झाली माझी आणि सगळ्या मुलांची. तेही फटाके संपले.

मग सुरु झाला सुरसुऱ्यांचा डाव. आता तुम्ही म्हणाल हे काय ? म्हणजे सुरसुऱ्या म्हणजे काय? सांगतो. आम्ही न वाजलेले फटाके जमा करून ठेवायचो. नंतर ते फोडतो. त्यातली दारू एका कागदावर साठवतो. मग ती दारु वेगवेगळी करून, कागदावर ठेऊन त्याची नळकांडी करून त्यात भरतो. दोन्ही बाजूनी बंद करतो. झाल्या तयार सुरसुऱ्या.

मग प्रत्येकाने आपली सुरसुरी हातात घ्यायची नी पेटवायची. फवारे उडतात तशी दारु जळायला लागते आणि मग धमाल. मजाच मजा !

हा शेवटचा दिवस ! उद्या पासून शाळा असते. २१ दिवसाची सुट्टी संपते आणि हिरमुसल्या मनाने पाय वळतात शाळेकडे... त्या सुरसुऱ्या आठवीत!!

०–०–०

# ना घर का ना घाट का

कोरोनाने मुंबईत हाहाकार उडवला, आणि कॉरंटाईनची शिक्षा प्रत्येक मुंबईकराला झाली. मोठी जागा असो वा छोटी. कोडंलेल्या कुटूंबाना आसरा नव्हता. खाली उतरले तर सोसायटीच्या गेटना टाळे, पहिल्या १५ दिवसाचा लॉकआऊटमध्ये लोकांनी कसा तरी दम काढला आणि कोंडून घेतले स्वत:सह कुटूंबाला. शाळा, कॉलेज बंद, मुलांचे खेळणेही बंद. नाही म्हणायला पहिला लॉकडाऊन कसातरी दम काढला. पण दुसरा सुसह्य झाला नाही. कलावंतांचे धाबे दणाणले. कोंडून कोण राहणार हो महिना महिना ? लोक रस्तोरस्ती राजरोस फिरायला लागले नी पोलिसांचा प्रसाद मिळाला. पण तरीही हा प्रकार काही थांबयला तयार नव्हता.

त्यात काही सरकारी खात्यात, वशीलाबाजीनी दोन नंबरचे पैसे चारुन लोकांनी पासेस मिळवून मुंबई पुण्यातून पळ काढला. त्याचवेळी युपी, झारखंड, कर्नाटक, आग्रा येथील मजूरांनी तर कहर केला. लाखोंच्या संख्येने मुंबई, ठाणे, नवी मुंबई नाक्यावर गर्दी करून सरकारवर दबाव आणण्याचे राजकारण करीत होते. त्यांना त्यांच्या त्यांच्या राज्यात पोहोचवण्याचे सरकारने ठरवले. आणि आमच्या इथल्या लोकांना चेव चढला. या ना त्या गाव गाठायचे यासाठी साम दाम दंड भेद यांचे उपचार सुरू झाले आणि इथले सारे वातावरण बिनसले.

त्यात आमचे एक मित्र शिरगावकर, पोलिस खात्यात कमिशनर कार्यालयात कारकून हवालदार. दिमतीला सगळी पोलीस यंत्रणा. पोरांच्या शाळा बंद, कॉलेज बंद, एक रुम किचनच्या पोलीस लायनीत बिचारी सगळी फॅमिली बेचैन झाली होती. त्याला अस्पृश्य वाटायला लागले, दुसरा लॉकडाऊन सुरू झाला आणि मुंबईत बिमारीचे प्रमाण वाढतच होते. आता या महामारीने झोपडपट्ट्या घेरल्या होत्या. त्यात तबलीकीचा तमाशा. सारी मुंबई दृष्ट लागावी अशी झाली होती. पण पोलिसांसाठी रान मोकळे.

या बेट्याने शिरगावकरने ठरवले. आता काही खरे नाही मुंबईत. आपण आपले गाव कणकवली गाठावे. त्याने खटपटी लटपटी करून पास मिळवला आणि बायको, तो व दोन मुले निघाली भल्या पहाटे. मुंबई वाशी-नाक्यावर त्याला ओळखणारे खूप, तो नाका पार झाला, पनवेलही पार, पण गाडी अडकली ती कशेडी घाटात. त्याने बघितली भली मोठी रांग म्हणजे दोन कि. ची

रांग, तपासणीसाठी, शिरगावकरने आपली गाडी थेट चेकनाक्यावरच आणली. वर्दीची चरबी पण ती सगळीकडे चालेलच असे नाही हो.

खरे तर त्याने व त्याच्या कुटुंबाने करोना टेस्ट केली असती तर मामला निपटला असता. पण गाडी तिथेच अडली. शिरगावकरने मुंबईच्या पोलीस कमिशनर नगरकर यांना फोन केला. त्यांनीही हात वर केले. कारण ह्या प्रकारे पाठविण्याचा पास देण्याचे त्यांच्या अखत्यारित येत नव्हते. तरीही हा प्रकार झालाच. त्यांनी कानावर हात ठेवले.

आणि मग गाडीसह चौघांना एका शाळेत डांबले. करोना टेस्ट झाली. ना तेथे कसली सोय, संडास पाण्याची, खाण्याची वा झोपण्याची. ती मंडळी कंटाळून गेली. चार दिवस तेथेच होते. रिपोर्ट निगेटीव्ह आले. आणि त्यांना सोडले खरे पण चिपळूण, रत्नागिरी, राजापूर आणि शेवटी कणकवली नाक्या नाक्यावर मनस्ताप होईल येवढा त्रास. झक मारली आणि निघालो असे शिरगावकराला वाटले. सगळ्या देवांनी दडी मारली. ते कोणीच उगवले नाहीत मदतीला. आणि शिरगांवकरांची परवड काही थांबायला तयार नव्हती.

त्यांची गाडी संध्याकाळी साडे चार वाजता करुळ या त्यांच्या गावी आली पण रस्त्यात स्वयंसेवकांनी अडवली. खूप गयावया केली त्यांच्या गाववाल्यांजवळ पण कोणीच ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यात हातावरचा शिक्का, कॉरंटाईन केल्याचा दुश्मन ठरला. सरपंच आले आणि त्याला जेव्हा हॉस्पीटलला घेऊन गेलो. तेथे तपासून त्या सगळ्यांना कॉरंटाईन केले. पुढचे चौदा दिवस. तेथेही तिच परिस्थिती. त्यापेक्षा मुंबईच्या घरात ठीक होतो. असा जावई शोध शिरगांवकरला लागला. पण वेळ होऊन गेली होती.

चौदा दिवसानंतर सुटका झाली पण पुढचे १४ दिवस येथेच रहायचे. जराही बाहेर दिसायचे नाही. शिरगावकर वैतागला. हा महिन्याचा तुरुंगवास त्याला जीवघेणा वाटला. पण सरकारने अगदी शहरापासून गावापर्यन्तची यंत्रणा अशी स्ट्रीक केली की या पोलिसच्या बच्याला घर का ना घाट का अशी अवस्था झाल्याचा शोध लागला. झक मारली आणि मुंबई सोडली. अशी शिरगावकरची अवस्था झाली.

गावच्या सीमेवरचा प्रकार हा त्याला अपेक्षित नव्हता. सीमेलगतच म्हणजे एका यार्डावर त्याचे घर समोर दिसत होते पण गाडी जायला रस्ता मोकळा हवा होता ना. बाबूंनी तो बंद केला होता.

''अहो मला माझ्या घरात जाऊ द्या. गेली ८ दिवस माझी जिरली आहे. गावाला येण्याची हौस. ना खाणे, ना पिणे, अहो लहान मुले आहेत. सोडा आम्हाला मग काय हवे ते करा. पण आधी घर गाठू द्या.''

''नाही ! तालुक्याला जा नी स्टॅम्प मारुन या मगच एन्ट्री!'' एकजण.

''अरे दत्ता ! तू तरी सांग या पोरांना. मी हात जोडतो, पण गावात घ्या.'' शिरगावंकर.

''नाही. आम्हाला स्ट्रीक इंस्ट्रक्शन आहेत. मुंबई-पुणे येथून येणारा एकही माणूस म्हणजे गाववाल्यांना सरळ प्रवेश द्यायचा नाही. आम्हाला आमचा गाव प्यारा आहे. त्याची सुरक्षितता महत्वाची आहे.'' दत्ता.

''ठिक आहे आम्ही दोघे जातो पण निदान या दोन मुलांना तरी सोडा.'' शिरगावकर.

''नाही ! त्यांना बरोबर न्या ! त्यांच्या हातावर शिक्का मारून आणा.'' दुसरा गृहस्थ.

शिरगांवकरचा नाईलाज झाला. आपण या गावांत लहानाचे मोठे झालो. आणि मी इथला इनामदार, तरी प्रवेश नसावा. ही काय कोरोनाची देणगी? त्यापेक्षा मुंबई बरी होती. आणि शिरगावकरचे तोंड सुटले.

''मी बघून घेईन! मी पोलीस खात्यात आहे हे विसरु नका. आता जातो. पण इथे आल्यावर एकेकाची जीरवतो!'' शिरगांवकर.

आणि त्याने गाडी मागे वळवली. ४ कि.मी. वरच्या तालुक्याच्या कॉटेज हॉस्पिटलमध्ये तो व मुले आली. संध्याकाळचे ६ वाजले होते. हॉस्पीटल बंद व्हायच्या मार्गावर होते. कोणीच काही खबर घ्यायला तयार नव्हते.

''आता वेळ संपली! तुम्ही उद्या या! सकाळी ८ वाजता.'' एक नर्स.

''अहो पण आता जाणार कोठे ? लहान मुले आहेत सोबत! मेहनबानी करा.''

''यांना कॉरंटाईन करा ! बघा जागा आहेत का त्या !''

''मॅडम ! हॉस्पीटल फूल आहे. याना जिल्ह्याच्या हॉस्पीटलमध्ये बघायला हवे!'' दुसरी नर्स.

शिरगांवकर समोर मोठे संकट उभे राहिले. रात्र होत होती. मुलांना भुका लागल्या होत्या. बिस्कीटेही संपली होती... एवढ्यात.

''अहो ! साहेब, आधी गाडी कंपाऊंडच्या बाहेर काढा ! तसा हुकूम आहे

आम्हाला. हॉस्पीटच्या वाहना व्यतिरिक्त एकही गाडी नको.'' वॉचमन.

काय बोलावे शिरगांवकरला कळेना. जिल्हयाचे ठिकाण ४० कि.मी. वर. पेट्रोल संपत आलेले.

''तुम्ही बाहेर रस्त्यावर गाडी उभी करा. सकाळी या. चला चला मला गेट बंद करायचा आहे.'' वॉचमन.

तो वॉचमन ही त्याच्या वारुळ गावातला. ओळखीचा पण काही बधेना. शेवटी गाडी बाहेर काढली. शिरगांवकरने गाडी ५ कि.मी. वरच्या पेट्रोल पंपावर घेतली. तो बंद होण्याच्या मार्गावर होता.

''पेट्रोल ! फूल करा गाडी!''

''अहो पण पट्रोल संपलय ! सकाळी किंवा रात्री गाडी येईल. तुम्हाला सकाळी देतो गाडी फूल करुन. आता जावा ! आता तहसिलदार येतील. तपासायला. सातचा काटा म्हणजे सातचा. कोणालाही पेट्रोल द्यायला आम्हाला अटकाव आहे. तहसिलदार देसाई यांच्या ऑर्डर आहेत !'' पेट्रोल मालक.

मग आम्ही आता काय करावे ? – शिरगांवकर

तेवढ्यात तहसिलदार यांची गाडी आली. ते शिरगांवकरांच्या परिचयाचेच होते.

''नमस्कार सर!'' शिरगांवकर.

''नमस्कार ! अरे यावेळी कोठे ?

''साहेब काय करावे समजत नाही ! मला रात्रभर आसरा द्या ! लहान मुले आहेत. दुध नाही, जेवण नाही सकाळपासून ! गावातही घेतले नाही. प्लीज''

''ठिक ! अहो सावंत, हे माझ्या परिचयाचे आहेत. तुम्ही ....... ला घेऊन जा. आणि रात्रभर वरांड्यात थांबायला द्या ! इतका कोणाला त्रास नको.'' देसाई.

''होय सर !'' सावंत.

आणि पुरी वरात जवळच २ कि.मी. वर शाळेत आली. तिथल्या पाटील नावाच्या केअर टेकरने पाणी दिले दुरुनच. जेवणही दिले आणि उघड्यावर व्हरांड्यात शिरगांवकरने मुलांसह रात्र काढली.

वेगळाच अनुभव त्याला आला. पैशाची पुडकी जवळ होती. पण कोणही आसरा द्यायला तयार नव्हता. देसाई यांनी मेहरबानी केली म्हणून रात्र कशी बशी

गेली.

सकाळी उठल्या उठल्या त्याने कुटीर रुग्णालय गाठले. हातावर शिक्के मारले नी १४ दिवसांची कॉरंटाईन घरातल्या घरात करायची ऑर्डर त्याना दिली. पोलिसांच्या गाडीने त्याला घरी आणून सोडले.

यांना कोणीही १४ दिवस स्पर्श करू नका ! वेगळ्याच रुममध्ये ठेवा. फक्त लांबून जेवण घ्या. मुलांनाही तुम्ही जवळ घ्यायचे नाही ! आमची गाडी दररोज कधीही येईल. यांच्यापैकी कोणीही बाहेर फिरताना दिसणार नाही. दोन दिवसात रिपोर्ट येतील. मगच त्यांचा विचार होईल.

शिरगांवकरांचे आई-वडील वयस्कर ते तरी काय करणार ? गावात ग्रामपंचायतीची गाडी दिवसभर फिरत आहे. चिडी चिप. सगळा गांव. रस्ते ओस.

शिरगांवकरने डोळे मिटले नी, निघाल्यापासूनचा सगळा पट डोळ्यापूढे आणला 'झक मारली' नी गावाचा रस्ता धरला ! मुंबईत बरा होतो मुलां-बायको सोबत. माझी जिरली. पोलीस म्हणून आलेली चरबी पूरती पातळ झाली. कोरोना पुढे सगळेच हतबल आहेत. याची जाणीव शिरगावकरला झाली होती...... आताही १४ दिवसाची शिक्षा .... त्याच्या वर्दीलाही कोणी विचारेना अशी अवस्था झाली होती. ना घर का ना घाट का !!

०-०-०

# दुभंग

रांजणगावाच्या चाकरमान्यानी कंबर कसून आई भवानीचे सुंदर, झोकदार मंदिर बांधले. त्या मंदिरात आई भवानीची तीन टन वजनाची दशभूजामूर्ती त्यांनी कर्नाटकातीला करकाला गावातून बनवून आणली आणि तिची विधीवत प्रतिष्ठापना केली. सगळा गांव या उपक्रमात सहभागी होता. छान सोहळा पार पडला. या मंदिरावर सोन्याचा कळस चढवला गेला, करवीर पिठाच्या शंकराचार्यांच्या हस्ते. आजूबाजूच्या पंचक्रोशीसह महाराष्ट्रातील भाविकांची रीघ लागली. मंदिरात पैशाचा ओघ लागला आणि लोकांचे डोळे फिरले.

या मंदिरातल्या जीर्णोद्धार ट्रस्टचे काम तसे संपले होते. आई भवानी सह हनुमंत मंदिराची वास्तुही वर्षभरात बांधून तयार झाली. आणि त्या मंदिरात हनुमंताच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करायची तयारी सुरू होणार, तेवढ्यात गावात 'राजकारण' घुसले आणि बघता बघता गावाचा तीन तिगाडा झाला. ही प्रक्रिया अधिकाधिक बिघडली जाऊन अगदी विकोपाला गेली नी पूर्ण गाव दुभंगला आणि पुढे त्याची अनेक शकले उडाली. वाड्या वाड्यात नव्या पार्ट्या झाल्या आणि सोन्यासारख्या गावाला कीड लागली ती राजकारणाची.

पूर्वी रांजणगाव हा एका हातावर होता. कोणताही राजकीय पक्ष या गावात कार्यरत नव्हता. गावात राजकारणी खूप अगदी विविध पक्षाचे. पण त्यांचे कार्यक्षेत्र होते मुंबई आणि चिपळूण. तालुक्याच्या ठिकाणी. गावाच्या सीमेतून घाणीने आत प्रवेश घेतला आणि नासला हो गाव पूरता. त्याचे कारण गावातल्या नव्याने उभारलेल्या मंदिरात निघणारा पैशाचा धूर.

यात गावातल्याच एका सुपूत्राचा म्हणे अपमान झाला मंदिराचा उद्‌घाटनाच्या वेळी आणि त्याचा आसुरी डाव गावाला नासवायला कारणीभूत झाला. समजूत काढण्याचा प्रयत्न गावातल्या बुजूर्ग तसेच मुंबईच्या कार्यकर्त्यांनी केले. पण, मामला अधिकच बिघडत गेला. आता तो माजी आमदार रिकामटेकडा होता. कारण गेल्या वर्षाच्या निवडणूकीत तो पूरता धूतला गेला नी चितपट झाला.

गावाबाहेर तालुक्याच्या ठिकाणी रहाणाऱ्या या राजकारण्याच्या डोळ्यातल्या अंगारात आता पूरता गांव भाजून निघायला लागला होता. त्याने त्याचा मोर्चा वळवळा तो गावात. त्यात अनेक वळू त्याने गावात सोडले. चंदन

हा त्यातला मुख्य वळू. आमदार चंद्रराव मोऱ्यांचा पी.ए. सध्या मा.आमदार मोरे साहेबांना काही काम धंदा नव्हता. त्यांची सोसायटीची दुभती म्हैस पाण्यात बसली होती आणि पैशाची आवक थांबली. त्यात त्यांची नजर रांजण गावातल्या मंदिरावर पडली आणि राजकारणाची कीड पूर्ण गावालाच पोखरू लागली.

देशातल्या राजकारणाने आता नव्याने कात टाकली होती. मूळच्या काँग्रेसच्या चंद्ररावांनी वर्षभरात तीन पार्ट्या बदलल्या. पण कोठेच आपली डाळ शिजत नाही असे वाटल्याने त्यांनी शेवटी सत्ताधारी पार्टीत प्रवेश केला. पण तिथेच घोटाळा झाला. सद्या या पार्टीतल्या नव्या कार्यकर्त्यांना हे जुने खोड काही पचनी पडले नाही. आणि अपमानीत होऊन त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला. ना राजकारण, ना पैसा, चंद्ररावांची अवस्था बिकट झाली होती. तालुक्यात एका काळात 'वट' असलेल्या राजकारण्याला सगळीकडूनच कट कट झाल्याचा अनुभव येऊ लागला नी तालुका सोडून रावांनी गावातच आपले बस्तान बसविले. ते कायमचे.

आता राव म्हटले की ग्रामपंचायत हेच या मुरब्बी राजकारण्यांचे कार्यक्षेत्र झाले. गावच्या सीमेच्या आत राजकारण्याच्या अहंकाराने पूरता प्रवेश केला आणि सगळा गाव नासला हो वर्षभरात. अगदी देशात नसेल इतके राजकारण वाड्यावाड्यातून घराघरात घूसले. भाऊ भाऊ दुश्मन झाले. चंद्ररावांनी प्रत्येक वाडीतला एक एक वळू आपल्या कंपूत दाखल करून घेतला आणि त्यांना पैशाच्या विषात गुंडाळायला सुरुवात केली. बिन पार्टीचे हे राजकारण, राजकारणात तरबेज चंद्ररावांच्या पथ्यावर पडले नी ग्रामपंचायत अलगद त्याच्या गळाला लागली आणि छोटा मोठा रतीब सुरु झाला. गावात विहिरी, पाणी योजना, रस्ते, रस्त्याला लाईट कनेक्शन यासारख्या छोट्या मोठ्या योजना आल्या. त्याची चूल पेटायला लागली होती. पण पैशात अखंड पोहणाऱ्या चंद्ररावांची नजर शोधित होती ती मोठा हात मारण्याच्या योजनांची. कोकणात आलेली रस्ता रुंदीकरणाची दुभती म्हैस. मुंबई गोवा हायवेचे काम सुरु झाले होते. त्यात त्यांना टेंडर लागलेली, ते पुन्हा तालुक्यात कार्यरत झाले. पण गेल्या दोन वर्षात त्यांची पकड तालुक्यातून ढिली झाली ती ढिलीच राहिली. पुन्हा मोर्चा वळला तो गावात. आता रांजणगावातच त्यांनी घरही बांधले आणि पूर्ण वेळ गावातल्या राजकारणातच त्यांना अधिक रस वाटू लागला.

रांजणगांव तसा अठरा पगड बलुतेदारांचा. कोणत्या एका सरदाराची ही राजधानी. जहांगिरीचे गांव, मोक्याचे, तालुक्याजवळ, हवेशीर डोंगरावर वसलेले. पण तालुक्याशी नाळ जुळली होती. आणि पूर्वी कफल्लक असणारा गाव आता पैशातच डुंबत होता. गावातल्या बलुतेदारांना शहरात काम भरपूर, त्या शिक्षणाची गंगा गावातच सुरु झाल्याने मुले सर्व क्षेत्रात पारंगत आणि कामधंद्याला. आर्थिक सुबत्ता मागच्या दरवाजातून घराघरात पोहोचली होती. आता गाव तसा अनाडी राहिला नव्हता. पूर्वीचा मातब्बर मराठा समाज गावाच्या एकूण संख्येने तुटपूंजा. त्याचे वर्चस्व गावात; मंदिरातल्या उभारणीत. पण गावात शुकशुकाट. सगळे चाकरमानी मुंबई, पुण्यात आणि गावात घराना कोयंडा. मात्र इतर समाज अजून गावातच पाय रोवून होता. याचाच फायदा मुरब्बी चंद्ररावाने घ्यायचा ठरविला आणि दबदबा बसविला वाडीवाडीत.

पैसा ही सगळ्यात विषारी वस्तू, तिचा उपयोग या चंद्ररावांनी पुरेपूर करून घेतला नी गाव गळाला लागला. आणि दुभत्या म्हशीसारख्या मंदिराकडे त्याने मोर्चा वळविला. प्रथम वाडीवाडीत बखेडे उभे केले. त्यातून गावाची शकले झाली. त्याच्या कोर्ट-कचेऱ्या सुरू झाल्या नी गावाचे लक्ष आता पोलीस स्टेशन, कोर्ट याकडेच वळवण्यात या मुरब्बीचा प्रयत्न यशस्वी झाला.

पण अजून पैशाचा रतिब घालणारे मंदिर हातात येत नव्हते. ते अजून उच्चभ्रू मराठा समाजाच्याच हातात होते. त्याच समाजातल्या एका वळूला हाताशी धरले. चंदन त्याचे नांव. तो तसा उमदा तरुण. चंद्ररावांचा एकेकाळचा पी.ए. चंद्ररावांच्या मुशीत तयार झालेला. पण या प्रकरणात आपण मात्र मागे राहून सगळी सुत्रे चंदन मार्फतच हलवण्याचा उद्योग चंद्ररावांनी सुरु केला. ह्या मंदिरावर आपली सत्ता म्हणजे गावावर अधिराज्य. या समीकरणाप्रमाणे तो आता कामाला लागला होता. आपण यात नाहीच असे भासवत मागून सगळी सुत्रे चंद्ररावच हलवीत होता. या मागे डोके मात्र चंद्ररावांचेच होते. आणि कुटील डाव सुरु झाला.

इमानदारीत मंदिराची उभारणी करणारे वसंतराव आपल्या कार्यकर्त्यांच्या मदतीने अजून मंदिराची सगळी सुत्रे हातात ठेवून इमानदारीत मंदिराचे व्यवस्थापन करीत होते. तसेच पाहिले तर वसंतराव आणि चंद्रराव उच्चभ्रू मराठा समाजातले. पण आता तर दोघेही इरेला पेटले होते. अहंकाराने पुरते व्यापले होते. दोघांचेही विचार त्यात भरडले जातेय. मंदिरही, वस्तू पण

दोघांच्याही ध्यानात येत नाही. हिच तर मोठी शोकांतिका आहे.

पण आशावादाला सिमा नसतात आणि प्रयत्नानांही. देवी एक दिवस समज दिला आणि तिढा सुटेल...... यावर काळच मार्ग शोधील. आम्ही काळाच्या स्वाधीन करून ही गोष्ट गप्प राहू शकत नाही. पाहू या काहीही करुन प्रयत्नांची पराकाष्ठा करायची समजूत काढायची. गप्प राहणे हा गुन्हा ठरेल आणि फटका सगळ्यांनाच बसेल. पुढची पिढी नाही माफ करणार या टग्याना पण सध्यातरी काही मार्ग सापडत नव्हता. पोलीस स्टेशनपासून, इतर मातब्बर लोकांनी हा तिढा सोडवायचा प्रयत्न केला. पण चंद्रराव दाद देत नव्हता. मध्यंतरी अनेक स्थित्यंतरे झाली. पण गावातल्या, वाडी वाडीवरच्या लोकांची दूभंगलेली मने काही एक हातावर येत नव्हती. आणि त्यात परवड होत होती ती देवीच्या मंदिराची.

काळ पुढे पुढे चालला होता. तो थोडाच थांबायला तयार होता. आणि गांव तसाच दुभंगलेला राहिला कायम... आजही...

०–०–०

# मिशन !

चाळीस वर्षापूर्वी कॅनडाला गेलेला अनिल व त्यांच्या कुटुंबियांनी मग अमेरिकेत आपले बस्तान बसविले. तेथे ते गेली पंचवीस वर्ष होते. त्यांना कॅनडा आणि अमेरिकेचेही नागरिकत्व मिळाले. त्यानी नोकरी न करता व्यवसायातच स्वत:ला व्यस्त ठेवले. भारतातून ज्वारी बाजरी विकत आणायची आणि अमेरिकेतल्या भारतीय कुटुंबियाना विकायची. पुढे तर त्याने एक फ्लॉवर मील काढली आणि एन. जे. या नावाने ज्वारी बाजरीचे पीठ विकायला सुरुवात केली. धंदा एकदम तेजीत. पण माशी शिंकावी तसा कोरोना शिंकला. लोक आपापल्या देशात स्थलांतर करू लागले आणि धंदा आटला. भारतीयांची अमेरिकेतली संख्या रोडावू लागली. लोकांच्या नोकऱ्या गेल्या, मिळेल त्या भावाला त्यांनी आपल्या जागा विकल्या. अनिललाही त्या मंदीला तोंड देता येईनासे झाले आणि आता काय करावे असा प्रश्न त्याला आणि त्याच्या कुटूंबियांना पडला. कॅनडातही जाणे शक्य नव्हते. थोडा काळ भारतात यावे कारण  कोरोनाचा कहर कमी होता, त्यामानाने भारत सुरक्षित होता.

पण ही महामारी संपेल तर ना. जग काळवंडून गेले होते, कोरोनामुळे. अनिलरावांना भारतच सुरक्षित वाटत होता. शिवाय भारतात जाऊन वडिलोपार्जीत जमीन, घर यांची व्यवस्था लावावी, घराची डगडुजी करावी. कोकणातले त्याचे बालपण, आता अनुभवता येईल आणि तिथल्या हवामानात आणि हिरवळीत दिवस सुखाचे जातील. त्यांचे भारतात आगमन झाले ते थंडीच्या दिवसात. म्हणजे नोव्हेंबर. नुकतीच छान थंडी पडू लागली होती. कोकणच ते मग काय विचारता, अनिलराव रमले या वातावरणात. आणि त्यांच्या पत्नी, छोटा मुलगा, पण नव्हती ती त्यांची मुलगी सोना. तिने एम.एस. करून नोकरी धरली अमेरिकेत, पण कंपनी बंद पडली आणि तिला कोठेही नोकरी मिळेना, त्यात ती भारतात आली. तिथल्या अमेरिकन जीवनाची चटक लागलेली ती काही पुण्यात येऊनही खूश नव्हती. तिला ओढ लागली होती अमेरिकेची. तिथल्या वातावरणाला चटावलेली ती इथल्या वातावरणात एकरूप नव्हती होत. तिला पुण्यात हेक्झावर इंडीया या कंपनीत जॉब लागला.  छान, पण दोन महिन्यात ती कंटाळली, इथल्या काम करण्याच्या पद्धतीला. इथल्या घरातून काम करण्याला. हे तिला नव्हते अपेक्षित. पण अनिलरावानी तिला

पुण्याला आणून, छान नोकरी लावली. त्यासाठी अमेरिकेतल्या त्यांच्या परिचयाचे सगळे सोर्सेस वापरले व ते पुनः रत्नागिरीला गेले. पुण्यात एक आलिशान घर भाड्याने घेतले होते व उन्हाळ्यात पुण्यातच आपण यावे या इराद्याने त्यांचा जीव सुखावला होता. निदान येथे पुण्यात, कुटुंबियांच्या सहवासात ती आनंदी होईल यासाठी. पण पुढच्या दोन महिन्यात सोना अगदी त्रासलेली होती, दिड लाखाचा पगार, गाडी साऱ्या सुविधा तिच्यासाठी दिल्या होत्या. पण का जाणे तिचे मन यू.एस.लाच ओढ घेत होते कां हे मात्र अनिलरावाना समजत नव्हते. त्यांनी पुण्यात आल्यावर. खूप चर्चा केली. पण सोनाच्या मनातले काहीही समजले नाही. ती कोणाच्या प्रेमात फसलेय का? की आणखी काही कारण असावे. ते अगदी त्रस्त होते. पण सोनीच्या मनाचा काहीच अंदाज येत नव्हता. त्यांनी त्यांच्या पत्नीला लक्ष्मीलाही तिचे मन पारखण्यास सांगितले. पण तीही हतबल झाली.

अनिलराव व कुटुंबिय यांना भारतात येऊन आता दोन वर्षे झाले होते. अनिलरावानी येथे आपला तोच धंदा येथे सुरु केला व खरोखर उत्तम जम बसवला. आता भारतभर त्याच्या कंपनीचा आटा भारतभर विकला जात होता, ते खूश होते आपल्या व्यवसायात, पण दुःखी होते सोनामुळे – ती घुट घुटत रहायची, तिच्या मनातले काहीच समजत नव्हते. अनिलराव अगदी त्रस्त होते.

आता सोनीला २७ वे वर्ष लागले होते. तिला अनेक मुलांची प्रपोझल येत होती पण तिला लग्नात इंटरेस्ट नव्हता. म्हणजे तिला अमेरिकेतलाच मुलगा हवा होता. पण बाबांजवळ सांगण्याची हिम्मत होत नव्हती की आपण प्रेमात पडलो आहोत, हे सांगण्याची हिम्मत नव्हती. काही असो पण सोनीला हे सारे खूप सतावत होते. तिने एकापाठोपाठ येणारी सगळी प्रपोझल नाकारली.

तिच्याच कंपनीत शशांक चौधरी हा एक सिनियर प्रोग्रामर होता. तो सोनावर फिदा होता. त्याचेही प्रपोझल आले होते. पण तेही तिने रागाच्या भरात नाकारले, पण मग मात्र तिला पस्तावल्या सारखे झाले. पण पुन्हा तो निर्णय कसा बदलावा हा प्रश्न तिला सतावीत होता. पण वेळ निघून गेली होती. धनुष्यातून बाण निघून जावा आणि रॉंग नंबर ठरावा बस् .अगदी तसेच झाले होते. शशांकने बी.ई. केल्यावर एम.बी.ए. केले होते व प्रोग्रामींगमध्ये जावा, पायशन, सी व सी.सी.टी. याचाही अभ्यास झाला होता.

हेक्झावेअर कंपनीने त्याला (शशांकला) अमेरिकेत पाठवण्याचा निर्णय

घेतला आणि तो गेलाही. आता मात्र सोनाच्या मनात शशांकने घर केले होते. आपण ही शशांकच्या प्रेमात पडलो आहे याची जाणीव सोनाला झाली होती, तिने ही गोष्ट वडीलांना सांगावे असे अनेक वेळा वाटले, पण आता हे सांगावे कसे याच विंवचनेत ती होती. तिने शशांकला एक मेल केला आणि त्याची चौकशी केली. कोठे आहेस ? कसे काम चालले आहे ? त्याच्या प्रोकेक्टची इनचार्ज सोनीच होती. जी भारतातून सारी सुत्रे हलवीत होती. शशांकला वाटले हे सारे नार्मल असावे. पण सोनीच्या मनात प्रेमाचे झरे वेगळ्याच वेगाने आता वाहू लागले होते. काय करावे असा प्रश्न तिला पडला होता. शशांकचे प्रपोझल झिडकारल्या नंतर त्याचे आई वडील इतर मुली शोधण्याचा प्रयत्न करीत होते. पण कोठेच काही जमायला तयार नव्हते. पण आता तो यू.एस.ला गेल्यावर शेकड्याने प्रपोझल आली. त्यातले एखादे आपण निवडावे असा विचार ते करीत होते. पण त्यातल्या त्यात अमेरिकन सिटीझन (ग्रीन कार्ड)होल्डर असेल तर उत्तम. पण त्यात एकही असे प्रपोझल नव्हते. शशांकचे आई वडील सोनीच्या कॉम्प्लेक्समध्ये रहात होते. त्यांची थोडी फार ओळख होती. शशांकची आई सोनीच्या आईला अधून मधून भेटत असे. या पूर्वी सोनीला शशांकच्या आईने पाहिले नव्हते. पण, त्यांना सोनीच्या आईने गणपतीला घरी बोलावले आणि त्याना सोनी शशांकसाठी योग्य वाटली. तिने शशांकला या बाबत कळवीले पण एकदा रिजेक्ट केलेल्या मुलीचा कसा विचार करावा. शिवाय ती त्याची बॉस होती, हे त्रांगडेच होते. पण शशांकच्या आईने या बाबत आपला प्रस्ताव सोनीच्या आईला दिला. पण शशांकची मानसिकता हे प्रपोझल स्वीकारायला तयार नव्हती. हा तिढा कसा सोडवावा कोण व कसा सोडवणार यात सहा महिने निघून गेले.

डिसेंबरमध्ये कंपनीने सोनीला यू.एस.ला पाठविण्याचे ठरवले. या प्रोजेक्टचा रिपोर्ट देण्यासाठी यू.एस.मध्ये शशांकच हा प्रोजेक्ट हॅन्डल करीत होता. ती येणार ही गोष्ट शशांकला समजली. आता ती आल्यावर भेटी गाठी होणार. हा सिलसीला महिनाभर चालणार. तेव्हा आपण तिच्या जवळ कसे वागावे या विचाराने तो त्रस्त होता. गेले आठवडाभर तो अस्वस्थ होता.

ती आली. शशांकच्या कॅबीन शेजारची कॅबीन ती वापरीत होती. त्या दिवशी दिवसभर वर्षभराच्या कामाचा आढावा त्यानी घेतला. त्या दिवशी दुपार झाली लंचची वेळ झाली...

" शशांक आपण दोघेही येथेच लंच घेऊ तूला चालेल नां "? सोनी.

" हो का नाही !" शशांक.

आणि शशांकने कॅंटीन मधून वेस्टर्न आणि इंडियन फूड ऑर्डर केले. जेवण झाले. रात्री ८ पर्यंत काम चालू होते. मग ते निघाले.

"तू कोठे रहातोस "? सोनी

"जवळच ! वॉकेबल डिस्टंस आहे !" शशांक.

"उद्या येईन तुझ्याकडे ! आज मी माझ्या हॉटेललाच जाते !" सोनी.

" चालेल ना ! का नाही ! शशांक.

ती हॉटेलला निघून गेली. पण शशांक विचार करीत बसला, आता उद्या येणार म्हणजे ? माझ्याकडेच रहाणार का? की जाणार हॉटेलला? किती दिवसाचा तिचा मुक्काम आहे येथे ? की, अमेरिकेतल्या वेगवेगळ्या सेंटरला ती जाणार आहे ? या प्रश्नांची उत्तरे त्याला मिळत नव्हती. ठिक उद्याचे उद्या पाहू असे म्हणून तो रात्रीचे जेवण न घेताच झोपला.

दुसऱ्या दिवशी तो लवकरच ऑफीसला आला. सोनीही सकाळी साडे आठलाच आली.

"शशांक ! मी पुढचे १५ दिवस येथे आहे ! आणि मग मी भारतात जाणार आहे !" सोनी.

"ओके "! शशांक.

सोनीचे बोलणे ऐकल्यावर मात्र त्याचे विचार चक्र अगदी वेगाने पळू लागले. ती येथे १५ दिवस आहे. ते ठीक, कारण ती एक महिना रहाणार होती. त्यांचे काम दोन दिवसात संपले. म्हणजे हिचे मिशन तरी काय होते. मी म्हणजे शशांक तर नसावे? आणि दुसऱ्या दिवशीही दुपारचा लंच दोघांनी बरोबर घेतला. तिचे सामान पाहून शशांक समजला ही बया माझ्या बरोबर माझ्या घरी येण्याच्या विचारात आहे तर! ठीक आहे. देखेंगे ! क्या होता है ! म्हणजे घोडा मैदान लंबा नही है !

त्यांचे काम पाच वाजताच संपले. आणि दोघेही निघाले. शशांकच्या घरी यायला. शशांकने सामान आपल्या गाडीत लोड केले. शशांकचे घर १०/१५ मिनिटाच्या अंतरावर होते. ते दोघे त्याच्या घरी पोहचले.

एरव्ही शशांक संध्याकाळी जेवण घरीच घ्यायचा. स्वत:च डिनर तयार करायचा. पण आज तो चार्ज सोनीने घेतला.

"काय खाणार ? " सोनी.

"तूला जे आवडेल ते !" शशांक.

"तरी पण ?" सोनी.

"छान पैकी पुलाव बनव ! सगळे मटेरीयल घरी आहे "! शशांक.

"ठीक !" सोनी.

अर्ध्या तासात जेवण तयार झाले. आज सोनीने डायनिंग टेबलवर सगळी तयारी केली व शशांकला हाक मारली. तो आपल्या स्टडी रुममधून त्याच्या आई जवळ बोलत होता. सोनी घरी आल्याची बातमी त्याने त्याच्या आईला दिली. तिलाही आनंद झाला. येवढ्यात सोनीने हाक मारली आणि शशांकने फोन बंद केला आणि जेवायला आला.

छान अरेंजमेंट सोनीने केली होती. हा ब्रम्हचाऱ्याचा भटार खाना नाही, हे त्यानेच ओळखले आनंदात जेवण झाले. तत् पूर्वी सोनीने विचारले.

"ड्रिंक घेतोस कां ?" .

"नाही बा ! कधीच नाही."

"आणि तू "?

"कधीच नाही टेस्ट केले !" सोनी.

मग जेवण झाले. त्यांचे ते घर थ्री बेड रुमचे होते. त्याने सोनीला आपला बेडरुम दाखवला. मग १२ वाजेपर्यंत गप्पा चालू होत्या. आज सोनी आनंदात होती. तिचे मिशन सक्सेसफूल झाले असे तिला वाटले. तिला शशांकचे वागणे, बोलणे, खूप भावले होते. आता भारतात जाऊन सगळी चक्रे हलवायची असे मनोमन तिने ठरवले होते.

याच काळात शशांकने त्याचे एम.एस. ही पूर्ण केले ऑनलाईन. ते त्याचे एक ॲडीशनल कॉलीफिकेशन होते. कंपनीने त्याला चांगले पद द्यायचे ठरवले. आणि सोनीच्याच लेव्हलला आणले. सोनीला आनंद झाला. आणि त्याला साऊथ आफ्रिकेचा इन चार्ज बनवले. ही तातडीची नेमणूक होती. दोन दिवसात शशांकला तेथे जॉईन व्हायचे होते. त्याचा रिलीवर येऊन जॉईन झाला होता. तेव्हा तातडीने त्याला निघणे गरजेचे होते. त्याच्या बरोबर सोनीही निघाली. दोघेही न्यूयॉर्कला आले. सोनी मुळची यू.एस.ची. तिने फटाफट छानसे घर शोधले. शशांक खूष झाला. तो तिच्या तत्परतेमुळे. नाही तर आज त्याला हॉटेलातच रहावे लागणार होते. शशांक कार्यालयात गेला. सोनीने घरचे सामान

लावले. सगळे जरूरीचे सामान भरले एखाद्या चौकस गृहीणी प्रमाणे. ती आनंदात होती. शशांक घरी आला तेव्हा घर चकचकत होते. तो तिच्यावर खूष होता. त्याला अशीच जोडीदार हवी होती आणि आपले मिशन यशस्वी होते आहे याची जाणीव शशांकच्या स्वभावातल्या बदलामुळे झाले होते.

आता सोनीयालाच घाई होती. न्यूयॉर्कला येऊन आठवडा झाला होता. आपण भारतात जावे आणि लवकरात लवकर लग्नाचे करावे असे तिने ठरवले.

''शशांक ! मी भारतात जायचे म्हणते !'' सोनी.

''कां ? इतकी घाई कां ? तू महिनाभर रहाणार होतीस ना ?'' शशांक.

''हो ! पण आता माझे मिशन पुरे झाले आहे !'' सोनी.

'' पण ! मी येथे एकटा पडेन ! नाही करमणार मला ! निदान दोन आठवडे तरी रहा ! खूप बोलायचे आहे तुझ्याशी ! प्लीज !'' शशांक.

'' ओके तुझे ऐकते ! आर यू हॅपी!'' सोनी.

रात्री बारा वाजेपर्यंत त्यांच्या गप्पा चालत. अगदी रंगून. त्यातून दोघांची मने त्यांना समजली. शशांकला ती आवडू लागली होती. आणि केव्हा एकदा ती आपली होते याची वाट तो पहात होता.

ते १५ दिवस संपत आले होते. सोनीने आपले परतीचे तिकीट काढले. पासपोर्ट रिलिव्ह करून घेतला. फ्लाईट सकाळी ९ वाजताचे होते. त्या रात्री २/३ पर्यंत ते जागेच होते. शशांक आपल्या मनातले तिला सांगावे असा विचार दहा वेळा करीत होता. पण कसे सांगावे ? याच विचारात तो होता.

''सोनी ! मला तुला काही सांगायचे आहे !'' शशांक.

''मलाही ! जे तुझ्या मनात आहे ते !'' सोनी.

''काय ? सांगशील कां ?'' शशांक

''तू समज काय ते ! अरे माझे मिशन पुरे म्हणजे यशस्वी झाले आहे ! '' सोनी.

आणि दोघेही मिठीत धुंद झाली ! ''आता चल झोपायचे. सकाळी लवकर निघावे लागेल ! तु ही तयार हो !'' सोनी.

सकाळी दोघे एअरपोर्टवर आले. सोनीने पाणवलेल्या डोळ्यांनी न्यूयॉक सोडले. आणि शशांकही सदगदीत झाला ! त्या रात्री त्याला झोप लागली नाही. तो रविवार होता. त्याने ब्रेड बटर वरच दिवस काढले आणि सोनी कधी भेटतेय तिच्या आईला आणि लग्नाचे कधी जमतेय या साठी.

रात्री सोनी अडीज वाजता मुंबईहून पुण्याला आली. आणि सकाळीच तिने सगळी चक्रे फिरवली ....

''आई ! माझे मिशन सफल झाले. आता तुम्ही कामाला लागा. नाहीतर आम्ही यू.एस.लाच जाऊन लग्न करु !'' सोनी.

''नको ! आपण येथेच लग्नाचे करू. सगळे नातेवाईक येतील, शशांकचे आई-वडील येथेच आहेत. मजा येईल !'' सोनीची आई.

सोनीने शशांकचा व्हिजा वाढवून घेतला. आणि त्याची पोस्टींग तेथेच केली.

यथावकाश शशांक परत आला व लग्न झाले. आणि दोघेही पुन्हा यू.एस.ला हनिमुनला गेले. हा दुग्ध शर्करा योग दोघही अनुभवीत होते. सोनीला यू.एस. मधलाच मुलगा हवा होता. ती तर सिटीझन होती, म्हणून त्याचेही प्रपोझाल मार्गी लागले.

शेवटी सोनीचे मिशन यशस्वी झाले हे मात्र खरे.

०-०-०-०-०

# प्रतिशोध

स्त्री वा पुरुषाने एकटे राहणे हे पापच समजते आताची सामाजिक, मानसिकता, मधला काळ ठिक होता आणि पूर्वीचा तर स्त्रियांसाठी 'शोषित', परित्यक्ता या सदरात मोडत होता पण तरीही आज स्त्रिया सुरक्षित आहेत या नजरांपासून हे ही काही वाटत नाही. थोडक्यात स्त्रिया सुरक्षित नाहीत, हे खरे !

शिरगावातल्या सगळ्याचा गुजराथी आणि काही मराठी धनिकांच्या झाल्या रहिवाशी वर्षानुवर्षे भाडेकरु होते. जेव्हा भाडेकरु बदलत तेव्हा मालकांची चांदी नव्याने येणारा भाडेकरुला भाड्याची पावती हाच पूरावा येथे रहाता याचा प्रचंड त्रास व्हायचा भाडेकरुना त्या चाळ मालकाकडून दबावाचे राजकारण जागा सोडावी म्हणून जेव्हा नवे गिऱ्हाईक चाळ मालकाकडे यायचे जागेच्या शोधात.

राजी आणि तिचे कुटुंब गेल्या तीन पिढ्या शिरकर चाळीत राहत होते. त्या चाळीचा मालक खूप चांगला होता. अपवाद म्हणून, पण त्याच्या पश्चात त्याचा पोरगा 'सोहम' त्याचा बाप म्हणावा लागेल असा घाणेरड्या नजरेचा रंगेल, राजीची आई वडील गेले ती जेव्हा सोळा-सतरा वर्षाची होती. तिला नोकरी नव्हती. तेव्हा ती कॉलेजध्ये शिकत होती. तीन वर्षाचे भाडे देणे बाकी होते. सोहमच्या बापाने काही तगादा लावला नाही भाड्यासाठी पण पोरगा हरामी ती वाट पहात होता. बाप कधी मरतोय ते, चाळींचा सगळा कारभार हातात घ्यायला.

राजी बी.ए. झाली नी सचिवालयात नोकरीला लागली. नोकरी लागताच भाडे शिरकर म्हाताऱ्याच्या हातात दिले. पण पोरगा काही घ्यायला तयार नव्हता. त्याला राजीची जागा ढापायची होती. राजीच्या शेजाऱ्याला हवी होती म्हणून. तो सहा लाख रुपये द्यायला तयार होता पण राजी त्याला दाद देत नव्हती. ती सचिवालयात म्हणजे सरकारी खात्यात नोकरीला होती. सोहमने भाड्याचे पैसे घेतले, पण तो पावती द्यायला तयार नव्हता. पण, रोज धमकावयाचा - 'जागा खाली कर म्हणून'. तिच्या शेजाऱ्यांची ही तिला सहानुभूती नव्हती. ती जागा मिळावी यासाठी स्पर्धाच लागली होती. सोहमच्या दररोज दरवाज्यावर येऊन धमकावायचा खरेतर तिच्या जवळ पावती नव्हती. घर भाड्याची, म्हणजे तेथे रहाते याचा पूरावाही नव्हता. तिने गिरगाव पोलीस स्टेशनला जाऊन एन.सी. केली सोहम विरुध्द, पण पोलीस स्टेशन दाद फिर्याद

घेईनात आणि तेवढ्यात सोहमचा बापही गेला. मग काय सोहमला रान मोकळे झाले.

सोहमच्या धमकावणीवर उपाय काही सापडत नव्हता. म्हणजे तिला ते असह्य झाले होते. बरे शेजारी कोण मदत करतील ही ही आशा नव्हती. आता काहीतरी करणे भाग होते. कारण पाणी डोक्यावरुन गेले होते. सोहमच्या धमकीने ती पूरती नामोहरण झाली होती. तिला आता रात्री-रात्री झोप लागत नव्हती. तिची तब्बेतही आताशा कृश होत चालली होती. गेल्या चार महिन्याच्या तापाने तिला जेवणही जात नव्हते. ती सकाळी जाई ऑफिसला तो संध्याकाळी येऊन दरवाजा उघडत असे आणि पूर्ण वेळ ही स्वत:ला चार भिंतीत गाढून घेई. दरवाज्याबरोबर मागची व पूढची खिडकीही बंद असे. ऑफिसला गेल्यावर तिला टेकून असे व ती मालक सामान बाहेर फेकून देईल या भितीने जगत होती. चार महिन्यात सोहमने घर भाडेही घेतली नव्हते. त्या वेळी भाडेपट्टीच्या घरासंबंधी २ च्या कायद्यात ६ महिने भाडे दिले नाही तर घर खाली करावे अशी मालकाला सवलत होती. त्याचीच वाट सोहम पहात होता. अजून दोन महिने बाकी होते.

तिला कोणीतरी सांगितले - २४ महिन्याचे भाडे चेकने पाठवा. तिने तसे केले म्हणजे प्रश्न मिटला पण सोहमने तो चेक बँकेत टाकलाच नाही. म्हणजे भाडे बाकीच. नाही यावर उपाय काय? ती एकटी अबला होती. कोणीही मदतीला नव्हते ना नैतिक सपोर्ट ना कसला तिने तीन-चार वेळा गिरगाव पोलीस स्टेशनला चकरा मारल्या पण कोणीच दाद फिऱ्याद घ्यायला तयार नव्हता. तिने तिच्या ऑफीस मधल्या डि.वाय. सेक्रेटरीला फोन केला तेव्हा जबानी नोंद घेतली. पण गुन्हा दाखल केला नाही. परिस्थिती जैसे थे.

तो दिवस रविवार होता. आणि सकाळी ६ वाजता सोहम ... नोटिस घेऊन आला. भाडे न दिल्याबाबत पावती देत असलेली भाडेही त्याने घेतली नाही. ताबडतोब जागा खाली करा असा मजकूर त्यात होता. मुदत ६ दिवसाची पुन्हा पुढच्या रविवारी सोहम चार-पाच माणसांना घेऊन आला आणि ती बाजारात गेली असताना तिचे टाळे तोडून आत घुसले आणि सामान बाहेर फेकायला सुरुवात केली. ती तशीच घरात घुसली तिच्या रागाचा पारा चढला होता. ती बाहेर आली, हातात कोयता घेऊनच आली बाहेर येऊन तिने सोहमच्या डोक्यात घातला. तो रक्त बंबाळ झाला आणि बाहेरच्या बाकड्यावरच आडवा

झाला. सोबत आलेल्यानी सामान तसेच टाकून पळ काढला. मग इतर भाडेकरु त्याला बॉम्बे हॉस्पीटला ॲडमीट केला. तेवढ्यात राजीने बाहेर फेकलेले सगळे सामान आत ठेवले आणि ती गिरगाव पोलीस स्टेशनला जाऊन हजर झाली.

"आता तरी माझी तक्रार घेणार का?

"कसली !

"मी भाडे मालकाचा खून केला !"

"काय सांगता काय ? अटक करा रे तिला नी गजा आड करा!" ऑफीसर.

"अहो माझे म्हणने तरी रेकॉर्ड करा, माझी जबानी घ्या तरी विटनेस कुठे आहेत ?" पोलिस.

"कोणी नाही !"

" मग पंचनामा होऊ द्या मग तक्रारीची नोंद करुन घेऊ!" ऑफीसर.

पोलीस स्टेशनच्या जेलमध्ये ती बसली होती. पण डोळ्यातून एक थेंब काढला नाही. गेली ६ महिन्याचा उट्टा तिने काय तर त्यावर वार करुन काढला होता. माणसाचा जेव्हा नाइलाज होतोना तो अशी स्टेप घेतो. तेव्हा झाले ते ठीकच, त्यालाही धडा शिकविला. यावरती ठाम होती. सगळ्या शेजाऱ्यानी शेपूट घातली. पण समोरच्या गॅलरीत एक गृहस्थ होते. त्यांनी हा प्रकार पाहिला होता. त्यानी पोलिसांना सगळी हकीकत सांगितली. ते स्वत: वकील होते. त्यांनी राजीची केस स्वत: चालवायची ठरविले व संध्याकाळी तिला जामीन मिळाला. पण गुन्हा तो गुन्हा तिच्या कोयतीने सोहमच्या डोक्याला १२ टाके पडले व कित्येक दिवस तो कोमात होता. पण दिड महिन्यानंतर घरी गेला. पण परत पंधरा दिवसाने त्याची तब्बेत अचानक बिघडली आणि त्याचे श्वास थांबले.

वकिलांनी चौकशीसाठी तिची केस घेतली आणि चालवली तिला ५ वर्षाची सक्त मजूरीची सजा झाली. तिच्या वास्तववादी परिस्थितीजन्य कारणाने तिने खून करण्याच्या उद्देशाने .. पण त्याला धडा शिकवावा. तिला घरातून बाहेर काढू नये यासाठी हा प्रयत्न होता. म्हणून कोर्टाने तिला ५ वर्षाची सजा ठोकावून दिली. त्यानंतर तिला ऑर्थर राडे जेल मध्ये ठेवण्यात आले.

या प्रकरणानंतर तिच्या ऑफीसरनेही तिला नोकरीवरुन सस्पेंट केले व सगळ्याच संकटात कहर म्हणजे तिची जागाही गेली. रहाण्याचा आधार संपला होता. जरीही तुरुंगातून घरी जायला निघाली तर जायचे कोठे ? डोक्यावर छप्पर

नव्हते ना पैसा खाण्या-पिण्याची ही व्यवस्था नव्हती. चारी बाजुनी राजीवर संकटांची बरसात चालू होती. आता तिला पाच वर्षाच्या सजेनंतरच विचार करायचा होता. तिच्या घरातले सगळे सामान घरातच होते. वकिल चौधरी यानी ही केस, घराची चालवायचे ठरविले. ती जेलमध्ये असे तोवर त्या केसचा निकाल लागला नव्हता. वकिल चौधरी काहिही फी न घेता ही केस लढत होते.

येवढ्यात गिरगावातल्या चाळी चड्डा या विकासकाने घेतल्या. रिडेव्हल्पमेंटसाठी व सर्व भाडेकरुना त्या जागेतून दूसरीकडे हलविले. कोर्टाच्या आदेशाने तिचे म्हणजे राजीचे नाव मात्र त्या यादीत समाविष्ठ करण्यात आले. ही एक जमेची बाजू होती. पण पुढे जेलमधून आल्यावर काय करायचे हा यक्ष प्रश्न होता तिच्यापुढे. त्यात त्या जागेच्या बदल्यात तिला २०,०००/- चे भाडे महिन्याला तिच्या अकाऊंटमध्ये पडत होते. पण ती नवे घर भाड्याने जेलमध्ये असल्याने घेऊ शकत नव्हती म्हणून वकील चौधरी यांनी ती इमारत पाडण्यापूर्वी तिचे सगळे सामान आपल्या घरी हलवले. तो एक मोठा दिलासा तिला मिळाला होता. वकील चौधरी हे ६० वर्षाचे वयस्कर गृहस्थ त्यानी खरी तर आपली वकिली बंद केली होती. पण या मुलीच्या मायेने अडचणीत असलेल्या राणीला मदत करावी या उद्देशाने तिची केस या वयातही त्यानी चालविली निरपेक्ष बुद्धीने. अजून भाडे प्रकरणाचा पूर्ण निकाल लागला नव्हता. पण कोर्टाने स्टे मात्र दिला होता व ती जागा तिच्याच नावावर रहावी अशी तात्पूरती ऑर्डर पास केली होती.

हा हा म्हणता ५ वर्षाचा सजेचा कालावधी संपला, पण जायचे कोठे? हातात पैसा होता बँकेत भाड्याचा तेवढीच एक जमेची बाजू होती.

या पाच वर्षाच्या काळात त्या जेलमध्ये तिने एक क्रांतीकारक योजना राबवली. त्यामुळे तिची सक्त मजुरीतून सुटका झाली. ती योजना म्हणजे ती स्वत: एक उत्तम योग शिक्षीका सिद्धी का होती. आणि जेल मधल्या सर्व कैद्याना सकाळ संध्याकाळ योगाचे क्लासेस तिने चालवले. तिचे उपकार सर्वच कैद्यांनी मानले व राजीची सुटका या जेल मधून चांगल्या वागणूकीमुळे व्हावी. अशी विनंती त्यांनी महाराष्ट्र सरकारला केली होती. तिला सोडणारी ऑर्डर झाली. पण राजी काही जेल बाहेर जाण्यास तयार नव्हती. बाहेर जाऊन काय करणार ? रहाणार कोठे ? खाणार काय ? आणि गुन्हेगार या शिक्याने कायम बदनामी डोक्यावर घेऊनच जगावे लागेल. तेव्हा राजीने सरकारचे उपकार मानले. पण

तिला पुन्हा योगा शिक्षक म्हणून जेलमध्ये त्यानी नेमण्याचे व रहाण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या चाळीत एक रुम देण्याची ऑर्डर पास झाली. शिवाय थोडे फार मानधन ही मिळायला लागले होते.

त्यात राजीने अनेक निर्णय स्वत: बद्दल घेतली. पहिला म्हणजे लग्न करायचेच नाही आणि आयुष्यभर जेलमध्ये कैद्यांना योगा शिकवायचा आता तिचे जगणे तसे पहिले तर स्थिर होत होते.

एक दिवस अचानक वकिल चौधरी जेलमध्ये आले व कोर्टाने तिची टेनन्सी मान्य केली. ही बातमी तिला दिली. आता तिने एकतर वेगळी जागा भाड्याने घ्यावी व वकिल चौधरी यांच्याकडे रहावे असा प्रस्ताव वडीलकीच्या नात्याने तिच्यापुढे ठेवला. पण तोवर राजी जेलच्या वातावरणाशी एकरुप झाली होती. वकिल चौधरी यांची पत्नी याच वर्षी गेली. त्यांना मुलबाळ काही नव्हते म्हणून त्यानी राजीलाच दत्तक घेण्याचा विचार केला. व तशी ऑर्डर कोर्टाकडून घेतली. व आपली सगळी स्थावर जंगम संपत्तीची तिच मालक होणार. त्यांच्या मृत्यूनंतर अशी नोंद करुन ते दत्तक विधान कायदेशीर केले. राजीच्या जीवनात जे काही घडले तो एक अपघात होता. सामाजिक अन्यायातून हा गुन्हा त्या परिस्थितीसाठी घडला जेव्हा जगणे असह्य झाले तेव्हा. त्याला ती दोशी नव्हती. पण तरीही कोर्टाच्या आदेशाचे पालन करण्याचे राजीने निर्णय घेतला व जेलमध्ये गेली. तिने त्या ऑर्डर विरोधात अपील ही केला नाही. नाहीतर ती निर्दोष सुटली ही असती पण तिला ते मान्य नव्हते. तिने चौधरी वकिलांची समजूत काढली. आणि गेली ५ वर्षे आपल्या योगाच्या ज्ञानाचा उपयोग करुन अनेकांचे जीवन सुसह्य केले. सुदृढ केले. गुन्हेगारांना जेलमध्ये प्रचंड स्ट्रेस असतो, एकाकीपणाचा. तो तिच्या योग शिक्षणामुळे कामी होण्यास मदत झाली. या गोष्टीची दखल महाराष्ट्र सरकारनेही घेतली व इतर मोठ्या जेलमध्ये म्हणजे ठाणे, नाशिक येथे ही तिची नेमणूक करुन योगा व क्लासेस चालू करायला लावले. आणि मुंबई पोलिस खात्यातर्फे १ मे ला तिचा विषेश पारितोषिक देऊन सन्मानही करण्यात आला.

अनेक स्त्री सुधार संस्थानी ही तिचा सत्कार केला व स्त्रियांसाठी योगा शिक्षणासाठी मुंबईत गोरेगाव येथे तसेच गिरगांव येथे तशी शिबीरे घेण्यास सुरुवात केली. तिने कोर्टाचे तायकांडो व कराटेचे शिक्षण ही घेतले होते, म्हणून त्याचा उपयोग स्त्रियांनी आपल्या स्वसंरक्षणासाठी कसा करावा यासाठी

शाळामध्ये मुलींना तिने कराटे शिकवले. हे एक मोठे योगदान तिने समाजाला दिले. व तिच्या नावाला खुप प्रसिद्धी मिळाली, पण तरीही ती एक गुन्हेगार होती. याची जाणीव मनातून पूसयचा प्रयत्न करुनही तो डाग पुसला जात नव्हता.

आता तिला लग्नासाठी अनेक प्रस्ताव आले. पण तिने प्रेमळपणे ते नाकारले. ती दिसायला सुंदर होती. वय होते ३६ वर्षे तेव्हा आता लग्न करुन ही काही उपाय नव्हता. म्हणून आपण जे योगा शिक्षणाचे काम हाती घेतले आहे. त्यातच स्वतः ला गुंतवून घ्यावे. असे तिने मनोमन ठरविले होते. अधून मधून ती वकिल चौधरी यांच्याकडे जात असे त्यांच्याही वयाची ८० वर्षे पूर्ण होत होती. ते एकटेच होते तेव्हा त्यांची कन्या या नात्याने त्यांची सगळी जबाबदारी राजीने स्वीकारली. आणि सगळी व्यवस्था केली. त्यांच्यासाठी तिने ठरविले येथेच रहायचे त्यांची सुरक्षा करायची. कारण ते आता आजारी होते ते बेड रिडन होते. त्यांनी आपल्यावर अनंत उपकार केले आहेत याची जाणीव राजीला होती आणि त्यांनी तिला दत्तक घेतले होते. यामुळे ती त्यांची कन्याच होती.

सहा महिन्यांनी वकिल चौधरी यांची तब्येत अचानक बिघडली. राजीने त्याना मुंबई हॉस्पिटल येथे ॲडमिट केले. पण पाच-सहा दिवसात त्यांची जीवन ज्योत मालवली. राजीनेच स्वतः त्यांचे अंतिम संस्कार केले व नाशिकला जाऊन सगळा उत्तरकार्याचा विधी आटोपला. आता ती त्यांच्याच जागेत राहत होती. तिने सरकारी जागा परत केली व स्वतः सर्व जेलमध्ये जाऊन नवे नवे कार्यकर्ते योगा शिक्षक तयार करुन योगाचे हे महान कार्य सातत्याने पुढे चालू ठेवले.

अनेक वेळा एकटी असताना ती तिच्या जीवनाचा **प्रतिशोध** घेण्याचा प्रयत्न करी. कॉलेजात असताना आईवडिल गेले. तिने ठाण्याच्या निकम गुरुजींकडे ३ वर्षाचा योगा शिक्षकाचा अभ्यास केला व शिक्षणाबरोबर योगाचे क्लासेस गिरगावमध्ये तिने घ्यायला सुरुवात केली. सचिवालयात नोकरी मिळाली. तिच्या जीवनाला स्थिरता येणार, येवढ्यात घडलेल्या पूढच्या घटनाने कोर्टाची शिक्षा, नोकरी गमावणे, घराचा तिन तिगाडा या सगळ्या संकटातून बाहेर येऊन योगासाठी आपले जीवन वेचावे व लग्न न करता आता जीवनभर अविवाहीत रहावे हे तिने ठरवून आपल्या जीवनाला योग्य वळण लावण्याचा प्रयत्न तिने केला.

दोन वर्षांनी तिच्या गिरगावच्या चाळीचा पुर्नविकास झाला. इमारत उभी राहिली आणि त्या इमारतीत दोन टू रुम किचनचा फ्लॅट तिला मिळाले. ती त्या नव्या घरात शिफ्ट झाली व तिने एका जागेत सोसायटीची परवानगी घेऊन एक योगा सेंटर चालू केले. राजी योग ॲकाडमी नावाने खूप चांगला रिस्पॉन्स तिला मिळाला व गिरगावात योगाची क्रांतीच झाली म्हणा. शिवाय सोसायटीने त्या इमारतीचा १५०० स्के.फूटचा हॉल तिला या कामासाठी देऊन तिला उपकृत केली.

आता त्या घटनेला ५ वर्षे होऊन गेली होती. त्या इमारतीत रहाणाऱ्या पूर्वीच्या भाडेकरुचेही आता मन परिवर्तन झाले होते आणि तिच्या बाबतची कटूता पार धुवून निघाली होती. या शिवाय जेल मधली योगा क्लासेसही चालूच होते. तिने अनेक पुरूष, महिला योगा शिक्षक जेल मध्येच तयार करुन त्यांच्या जीवनात जगण्याची उमेद निर्माण केली. आणि आनंद पेरला.

राजीचे आत्ता पूर्णपणे योगासाठी आपले जीवन समर्पित केले होते. आणि अशा तऱ्हेने आपल्या डोक्यावरचा गुन्हेगार हा कलंक धुवून आपल्या ‘जीवनाचा प्रतिशोध’ स्वकष्टाने केला. या तिच्या सामाजिक सेवेचा गौरव अनेक संस्थांनी केला व तिच्या कार्यात तिला मदत केली. आज या कार्यात खुप चांगले दिवस आले आहेत. हा चमत्कार नव्हे काय ?

०-०-०-०

# टक्कर !!

तो काळ तसा बंदिस्तच होता म्हणा, सगळ्या बाबातीत भिंती आणि त्याही उंच, त्या तोडून, वा ओलांडून जायची हिंमत त्याकाळी ग्रामीण भागात होत नव्हती लोकांची, म्हणजे ते अशक्यच होते म्हणा.

जातीपातीच्या भिंती ढासळायला लागल्या होत्या. पण ठिसूळ भिंती त्या अजून काही बाबतीत आपला आब राखून होत्या. म्हणजे त्या ओलांडण्याचा विचार मनात आला तरी पार करणे कठीण होते. त्यात कर्मठ जातीपातीत तर त्याचा विचार समाजाच्या दबावामुळे करणे म्हणजे आलेला विचार आंवढा गिळावा तसा, घशा आड करावा लागायचा असा तो काळ होता.

आपल्या गावात लक्ष्याच्या घराण्याचा, दबदबा. मानकरी देवीचे त्यांच्या शिवाय पान हलत नसायचे, गावच्या देवीच्या देवळात त्यांच्या हुकमाशिवाय, देवीला रूपी नव्हत्या लावल्या जात. सारे मान पान त्यांच्या घराण्यात होती. ९६ कुळी मराठ्यांचे त्यांचे घराणे. लग्न संबंध फक्त ठराविक चाकोरीत म्हणजे नातेवाईकात होत असत. प्रेम करायला मनाई, पण बाई ठेवलेली चालायची असा तो काळ होता. सरदारांचे वंशज होते ते. जातीच्या बाहेर ना मुलांची लग्ने होत ना मुलींची, त्यात जे पळून लग्ने करीत त्यांना घरचे दरवाजे बंद असत. आयुष्यभरासाठी आई बाप, नातेवाईक यांच्यापासून ती मुले वा मुली कायमच्या दुरावत. आता जसा जात पंचायतीचा बडगा दिसतो ना, तसा त्यावेळी या उच्चवर्णीयात नव्हता. तरीही अनेकांना या प्रमादामुळे बहिष्कृत केले जायचे.

शिक्षणाचा अभाव होता त्या काळात. माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा म्हणजे पूर्वीची ११ वी तीही तालुक्याच्या शाळेत व्हायची, प्राथमिक शाळा सातवी पर्यंत होत्या. तेथेही शाळेत येणारे शाळा मास्तर, म्हणजे शिक्षित लोक. क्वचित माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा झालेली पण, गटवीत गोऱ्या गोमट्या पोरी गावातल्या. नी बदली करून निघून जात. त्या मुलींना माहेर बंद कायमचे, काही मुली प्रेमात पडत शिक्षकांच्या. पण लग्ने होतच असे नाही. तिचे लग्न होई ते संबंधात. ते प्रेम नसे शारीरिक आकर्षण असे उफाड्याच्या मुलींचे आणि शेवटी घाण्याला जोडल्या जात, खंगत आणि अश्रू ढाळीत. आयुष्य काढीत.

अशी ती चौकट होती. चार भिंतीची दरवाज्या नसलेली समाजाला.

आमचा लक्षा तसा हिंमतवान निघाला. मानकऱ्याचे घराणे, पण त्याने चौकट तोडलीच आणि समोर उभ्या असलेल्या सह्याद्रीला टक्कर दिली. रक्त बंबाळ झाले कपाळ, पण मागे हटला नाही, आयुष्यभर टक्करच द्याव्या लागल्या त्याला. शिवाय समाजात कायम बदनाम, मेल्यानंतरही समाजाचा रोश कायम, त्याला, त्याच्या मुलांना, या भोगाला गणती नव्हती. हा चौकट तोडण्याचा ताप चार पिढ्या गेल्या तरी नाही संपला... घराणे बदनाम ते बदनामच.

सातवी झाल्यावर त्याने गांव सोडले आणि मुंबईत नोकरी करीत असलेल्या काकांकडे त्याने आसरा घेतला. सकाळी शाळा, दुपारी काही तरी काम. पेपर स्टॉलवर पेपर विकणे इ. कामे तो करायचा आणि आपला भार काकावर पडणार नाही यासाठी धडपडत रहायचा. त्याकाळात नोकऱ्यांना वानवा नव्हती, पण निदान एस.एस.सी. होणे गरजेचे होते, त्याने ते दिव्यही हिमतीने पार केले ६२% टक्के मार्क. आणि सेवा योजन कार्यालयातून पत्र आले. रेशन विभागात पद रिक्त होते. तेव्हा रुजू व्हायचे होते. तो मुंबईचा रेशन विभागात सुरुवातीला सरकारी नव्हता, नंतर सरकारने त्या विभागाला आपल्या अखत्यारीत घेतले आणि सगळ्याच नोकर वर्गाचे नशीब फळफळले.

लक्षा कारकून म्हणून नोकरीवर रुजू झाला. मुंबई सेंट्रललाच. तरीही सकाळची त्याची पेपरची लाईन चालू होतीच. तसा त्याचाभार रेल्वेत काम करणाऱ्या त्याच्या काकांवर नव्हताच  आणि काही अंशी तो स्थिरावला होता. नोकरी चालू होती.

त्याच्याच कार्यालयात संध्या नावाच्या एका सुंदर कन्येचे आगमन झाले. तेव्हा तो नुकताच इन्सपेक्टर झाला होता. त्याचे व्यक्तिमत्व तसे राजबिंड. गोरा पान गडी, तशीच संध्याही. ओळखी झाल्या. आणि प्रेमात पडली होती ती दोघे, अणि वाटचाल सुरु झाली ती, बोहल्यावर चढायची, पण अडचणीचा पर्वत समोर उभा होता. तो जातीचा, तो ९६ कुळी. ती शिंपी, काकांजवळ त्याने प्रस्ताव मांडला, ते कडाडले ...

''काय पोरी नाहीत काय आपल्या समाजात शिकलेल्या आहेत, काय पाऊस पडलाय तिच्यावर ! मी काही हो म्हणणार नाही. आणि तुला करायचे असेल लग्न तिच्या बरोबर, या घरातून निघून जा, परत तोंड दाखवू नकोस.''

अरे आपले मातब्बर घराणे, मानकऱ्याचे. तुला मानकरी म्हणून गांव स्वीकारील काय ? तू किती शिकलास, पैसा कमवलास, साहेब झालास तरी कवडीची किंमत नाही गाववाल्याना. पुढच्या सगळ्या परिणामांची तयारी ठेव आणि काय करायचे ते कर ! माझा नकार आहे या तुझ्या लग्नाला ! अरे तुझ्या बहिणींची लग्ने व्हायची आहे. माझ्याही एका मुलीचे लग्न व्हायचे आहे, कोण स्वीकारेल तिला ? आता पासूनच तू निघून जा आणि पुन्ह तोंड दाखवू नकोस!'' काका.

लक्षाचा नाईलाज झाला. तसे पाहिले तर त्यांच्या काकाकडून विरोध होणार हे त्याने गृहित धरले होते. उद्या काही अपवाद व्हायला नको म्हणून त्याने तो मार्ग स्वीकारला. त्याचे कारणही तसेच होते. त्याचे काका हे समाजातले एक मात्तब्बर व्यक्तिमत्व होते; कोणा कोणाला म्हणून त्यानी तोंड द्यायचे. शिवाय हे होणारे लग्न समाजातले पहिलेच होते. त्याना समाज, गांव या सर्व पातळीवर तोंड खाली घालण्याची वेळ येणार हे तो गृहित धरून होता.

ज्यावेळी त्याच्या घरी या विषयाला तोंड फूटले, तेव्हा सारे वातावरणच पार बदलून गेले. काकांनी, काकांच्या मुलांनी अबोला धरला. भावजयाही डोळ्याला डोळा देईनात. मोठी पंचाइत झाली लक्षाची. त्या अबोल्याला कंटाळून त्याने घर सोडण्याचा निर्णय घेतला. बरे संध्याला तत्पूर्वी सांगायला हवे. आपली रहाण्याची व्यवस्था व्हायला हवी प्रथम. मग लग्न, तेही जाहीर नव्हे. नोंदणी पद्धतीने करावे लागणार होते. आणि त्यासाठी एक महिन्याची नोटीस. त्यात दोघेही सरकारी नोकरीत. प्रचंड मानसिक तणाव जसा लक्षावर होता तसाच संध्यावरही. त्याला राहून राहून काकाच्या बोलाची आठवण येई, आपल्याकडे एक म्हण आहे ''मुलगी निच कुळात देऊ नये. पण उच्च कुळातली मुलगी करायला हरकत नव्हती''. खरेतर उच निचता हि प्रेमिकानी केव्हाच पायदळी तुडविलेली असते. त्यांना दिसत असते 'प्रेम' आणि त्यासाठी काहीही करण्याची त्यांची मानसिकता तयार असते, पुढच्या सगळ्या परिणामांना तोंड देण्यासाठी. ज्यांचा समाजाशी फारसा संबंध नसतो, ते विवाह जिरुन जातात, पण तिच बाजू जर समाजाशी जोडली असेल तर ? मोठी गोची होते त्या दोघांची. असे विवाह म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेचा प्रवास ठरतो. आणि त्या प्रवासाला सुरुवात होणार, हे ती जाणून होती. त्यात येणाऱ्या अनेक अडचणी डोंगरा येवढ्या असतात. आणि त्याना 'टक्कर' द्यायची म्हणजे कठीणच, पण असे लोक निर्धास्तपणे प्रसंगाना सामोरे जातात. लक्षा-संध्याने तेच केले.

नाईलाज म्हणून लक्षाला काकांचे घर सोडावे लागले, अगदी काळजावर दगड ठेऊन. दुसऱ्या दिवशी लक्षा-संध्या अंधेरीत एक घर पाहून त्या घराची पडवी भाड्याने घेतली. आपली मोटार सायकल लक्षाने त्यासाठी विकली, आणि त्यानी नोंदणी पद्धतीने विवाह करायचा निर्णय घेतला. संध्याच्या घरून परवानगी होती, पण डामडौलात लग्न न करता नोंदणी लग्न करण्याचे दोघांनी ठरवले. तारीख एका महिन्याची होती. त्या दोघांची पोस्टींग तेव्हा अंधेरीच्या रेशनींग ऑफीसमधे होती. तेव्हा हे घर त्यांना सोईचे होते. त्या दोघांनी संसारासाठी लागणाऱ्या सगळ्या गोष्टी जमवल्या. लग्नाच्या तारखेपर्यंत लक्षा त्या घरात आणि संध्या आपल्या आई वडिलाकडे रहात होती.

एकदाची तारीख आली. संध्याच्या घरचे लोक कोर्टात हजर होते. लक्षाचे दोन मित्र साक्षीदार म्हणून हजर होते. नोंदणी पुस्तकात नोंद झाली. दोघांनी एकमेकांच्या गळ्यात हार घालून लग्न सोहळा पार पाडला. मग उपस्थितांनी स्टेशन जवळच्या हॉटेलमधे जेवण घेतले. आणि उभयता आपल्या नव्या घरी आले. त्यांच्या स्वागतासाठी कोणी ही नव्हती. खूप वाईट वाटले दोघांना. लक्षाने संध्याला बाहेर थांबायला सांगून त्याने घराचे कुलुप काढले. स्वत: आत गेला एका ग्लासात तांदूळ आणून उंबऱ्यात ठेवले आणि संध्याला ते माप ओलांडायला सांगितले. तिने तसे करून घरात प्रवेश केला. आनंदाची लकेर त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. मिशन पूर्णत्वाला गेले. अनेक संकटे आली पण त्याला हातात हात घेऊन दोघानी टक्कर दिली. सोहळा संपन्न झाला आणि त्यांच्या संसाराची गाडी रूळावर चालू झाली.

ही बातमी लक्षाच्या घरात, गावात वाऱ्यासारखी पसरली आणि गावचे, घरचे दरवाजे कायमचे बंद केले गेले. ते कधीच उघडले नाही ही गोष्ट लक्षाच्या वडिलांच्या मनाला खूप लागले, पण ते सावरले. आणि ते कधी कधी जात त्यांना भेटायला. तेवढाच एक दिलासा होता त्या नवपरिणीत जोडप्याला. ते सांगायचे. माझी सुन नक्षत्रासारखी सुंदर तर आहे पण तिच्या हातात जादु आहे अन्नपूर्णेची. खूप कौतुक ते करीत तिचे.

मध्ये चार पाच महिने गेले आणि निसर्गाने आपले काम चोख बजावले. तिला दिवस गेले. आता खऱ्या अर्थाने कुणाच्याही आधाराशिवाय हे सगळे त्या दोघांनाच पार पाडावे लागणार होते.

लक्षाने आपल्या नवपरिणीत पत्नीला घेऊन गावाला जायचा निर्णय घेतला

आपण गावी जावे. आपल्या आईला भेटलो, ग्रमदेवता, कुलस्वामीनीचे दर्शन घ्यावे अशा विचाराने मुंबई सोडली. 'मी पत्नीसह येत आहे' असे पत्र त्याने आईला लिहिले होते. या पत्राने मोठी खळबळ उडाली. त्याचवेळी त्याचे काका गावाला आले होते. त्याना हे समजताच, रातोरात त्यांनी घर सोडून पलायन केले. आई बिचारी एकटीच घरी होती. तिला हा विवाह मान्य होता की नाही माहिती नाही. आपला लेक माझ्या मांडीवर लहानाचा वाढला होता हे ती जाणत होती. पण सारी बंधने झुगारून तिने त्यांचे स्वागत केले. पण बघा आजू-बाजूच्या लोकांनी आपली कवाडे बंद करून घेतली. लक्षा कोणासही न भेटता आपल्या आईला भेटून, संध्याकाळच्या एस.टी. ने मुंबईला रवाना झाला.

खरा वनवास आता सुरु झाला होता. सुरुवातीला खूप टक्कर हिमतीने त्यानी दिली. रहायची जागा येणाऱ्या पाहुण्यासाठी सुरक्षित नव्हती, तिचे बाळंतपण, बाळाचा सांभाळ आणि मग नोकरी या साऱ्याची कसरत त्यांना करावी लगणार होती, कोणाची मदत होईल असा एकही किरण दिसत नव्हता. संध्याच्या माहेरचे छप्पर तर केव्हाच दूर झाले होते. भावजया भाऊ त्यांच्या नोकरीत. पण म्हणतात ना ज्याचा विश्वास परमात्म्यावर असतो आणि जे येणाऱ्या प्रसंगाना अंगावर घेतात त्याना परमात्मा मदत करतो. जरुर करतो. ते खूप चिंतेत होते, पण केव्हातरी म्हाडात केलेल्या अर्जामुळे त्यांना एक घर मिळाले. तत्पूर्वीचा एक महिना फारच क्लेशकारक गेला. संध्याला ५ वा. महिना सुरू झाला. ती दोघं, काय करावे आता या विचारात होती, आपण गर्भपात करून घेऊ या कारण पुढचा काळ अडचणीचा आहे असे विचार त्यांच्या मनात आले. ज्या दिवशी ते हॉस्पीटलला जाणार त्याच दिवशी म्हाडाचे पत्र हातात पडले, बेत बदलला. एक आशेचा किरण दिसला आणि त्यानी सुटकेचा निश्वास सोडला. आणि त्यानी आठवड्याभरात त्या नव्या घरात येणाऱ्या बाळासह प्रवेश केला. ती कॉलनी खूप मोठी होती गोरेगावात. लोक नव्याने येऊ लागले. त्यांच्या शेजारी एक ब्राम्हण आई, जोशी काकु या ही आल्या. त्यानी एक दिवस त्यांच्या घरासमोर बोर्ड लावला. 'लहान बाळांचे संगोपन गृह'... त्यामुळे लक्षा-संध्याची चिंता मिटली. त्या त्यानाही जेवण आणि घरकामाला मदत करीत. त्यामुळे प्रेमाचे संबंध प्रस्थापित झाले आणि पुढचे सगळेच प्रश्न सुटले.

पावसाळा सुरु होणार होता. तत्पूर्वी घर मिळाल्याने अनेक प्रश्न सुटले. त्याच काकुनी संध्याचे ओटभरणी केली अगदी प्रेमाने, आपल्या मुलीची

करतात तशी. आईची सगळी कसर जोशी काकुनी भरून काढली होती.

संध्याला पहिली कन्या झाली. आनंद झाला. सहा महिन्यांनी ती कार्यालयात जाऊ लागली. सारे काही सुरळीत चालले होते, मग मात्र लागोपाठ दुसरी कन्या आणि एक मुलगा याचे कुटुंबात आगमन झाले. आनंदी आनंद झाला. प्रपंच्याचा गाडा अगदी सुरळीत चालत होता. मुले वाढत होती. आणि नव्या चिंतेने त्यांना ग्रासले.

दोघांनाही बढती मिळाली, अधिकारी म्हणून. आता होती ती जागा अपुरी पडू लागली होती. तेवढ्यात जोशी काकुंनी त्यांना एक प्रस्ताव दिला, ''माझी जागा आपली समजा, मी काय चार दिवसाची पाहुनी!''. पण माझी काळजी तुम्ही घ्या शेवटच्या श्वासापर्यंत. मी आपल्या कुटुंबाचा एक सदस्य म्हणून राहीन. त्या दोघांनी होकार दिला. त्यांच्या आई वडिलांची सेवा करता आली नाही ती कसर त्यानी जोशी काकुंच्या सेवेत भरून काढली. आणि शेवटच्या क्षणा पर्यंत त्यांना जपले.

मुली मोठ्या झाल्या, मोठा प्रश्न होता तो त्यांच्या लग्नाचा. लक्ष्मण काकांच्या नंतर समाजात तो वावरू लागला होता. मुळात तो हुशार होता, समाजातल्या अनेक समस्या त्याने सोडवल्या, दोन विद्यालय काढली त्या परिसरात. लोक त्याचा आदर करीत, काकांच्या मागे त्याचा वारस म्हणून, आणि मान सन्मानही मिळाले. घरी लोकांची रीघ लागली. अनेक लोकोपयोगी कामे त्याने मार्गस्थ केली. आपल्या कुटुंबियांसमवेत आता तो त्याच्या गावातही येऊन राहू लागला. त्यांची उठ-बस गावात तशीच समाजातल्या इतर गावातही होत होती. पण त्याच्या लोकप्रियतेबरोबर आंतरजातीय विवाहाची वाटही त्याची पाठ सोडायला तयार नव्हती. मुली शिकल्या, नोकरी धंद्याला लागल्या, पण त्यांना समाजात योग्य वर मिळेना, म्हणजे हा त्यांचा २५ वर्षापूर्वी झालेल्या विवाहातून मायेचा ओलाचा नाही जाणवला, ती खानदानी औलाद नाही म्हणून त्याना समाजातल्या लोकांनी नाकारले. येणारी स्थळे 'आईचे नाव, गाव' विचारीत आणि सरळ पाठ फिरवीत. एक-दोन वर्षे प्रयत्न करूनही एकाही मुलीचा विवाह जमेना. आता त्या दोघांचा निवृत्तीचा काळही जवळ येत होता. वयेही वाढत होती आजारांची रांगच लावली होती. हार्ट, डायबिटीस यानी लक्ष्मणची क्षमता आटत चालली होती.

एक दिवस त्याने आपली पत्नी व मुलांसमवेत रात्री जेवल्यानंतर आपल्या

मनातली खंत बोलून दाखविली.

"बाबांनो! मी थकलो ! मी ज्या समाजातून आलो त्याने मला नाकारले, तुमची लग्ने प्रयत्न करूनही मी जुळवू शकत नाही. तेव्हा ही जबाबदारी, मी आता तुमच्या खांद्यावर ठेवीत आहे !'' लक्ष्मण

आणि संध्यानेही त्याची री ओढली. आपण कोणता तरी समाजाच्या दृष्टिने मोठा गुन्हा केला आहे. आपण ज्या समाजात वावरतो तो आपला नाही. आपले जग खूप मोठे आहे. पण नाही. पाया खालची जमीन जेव्हा आपल्याला स्वीकारायला तयार नसते तेव्हा, जगही आपल्याला नगण्य वाटायला लागते हीच अवस्था लक्ष्मणची झाली होती, खचली दोघेही बिचारी, आंतर जातीय विवाह केला. पण ते या बुरसटलेल्या समाजाला मान्य नाही. त्याने खूप सेवा केली पण त्याच समाजाने त्याला झिडकारले. त्याने अंथरूणच धरले. संध्याने, मुलांनी त्याला आस्वस्थ केले. "तुम्ही चिंता करु नका. आम्ही आमचे जोडीदार शोधू ! निश्िंचत असा!'' सगळी मुले.

पण तरीही ती दोघे या धक्क्यातून सावरली जात नव्हती या पेचाला 'टक्कर' कशी द्यायची याच विवंचनेतून त्याचा दिवस रात्र जात होते. आतातर लोकांचे येणे जाणे ही आटले होते. एवढे काम करून काय उपयोग झाला ? लोक जाती पतीतून बाहेर येऊ शकत नाहीत. कधी बदलणार हा निगरगट्ट समाज. त्यातला कर्मठपणा जायला तयार नव्हता. एवढी मुले शिकली, चांगल्या स्थानावर पोहोचली. त्यांची एक मुलगी तर आय.ए.एस. झाली, दुसरी डॉक्टर, मुलगा इंजीनियर. पण गाडा अडला तो लग्नाच्या बाजारात. लक्ष्मणने तर अंथरूणच धरले होते. त्याच्या निवृत्तीला अजून २ महिने बाकी होते, संध्याच्या ६ महिने. मग त्यानी मेडीकल रजा घेऊन घरीच रहाण्याचा निर्णय घेतला.

लक्ष्मणने समाजाच्या अनेक संस्थातून स्वतः राजीनामे दिले. पण कोणतीही संस्था त्याचे राजीनामे स्वीकारायला तयार नव्हते. त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी घरी येऊन राजीनामे मागे घेण्याची विनंती केली. त्यांना राबणारी माणसे हवी होती. लक्ष्मणने त्याना आपले दरवाजे कायमचे बंद केले. जो समाज आपल्याला स्वीकारत नाही त्याची सेवा करणे त्याने नाकारले.

मोठ्या आय.ए.एस. मुलीने आपले लग्न एका पंजाबी आय.ए.एस. मुलाशी जमविले, दुसरीने गुजराथी, मुलाने मालवणच्या भंडारी मुलीशी लग्न जमवले. आणि लक्ष्मण-संध्याच्या डोक्यावरचा भार मुलांनीच हलका केला होता.

सगळ्यांची नोंदणी पद्धतीने लग्ने झाली जावई खूप चांगले मिळाले. सुनही सुशील.

आता लक्ष्मण आयुष्याची ३५ वर्षे झुंजता झुंजता ... टक्कर देता देता थकला होता. पण शेवट गोड झाला होता. अनेक वेळा त्याला वाटे गावाला जावे. शेवटचा काळ गावातच व्यतित करावा. पण मागच्या सगळ्या अनुभवातून त्याने निर्णय घेतला खूप दूर जावे या निबर समाजापासून आणि शांतीत जगावे दोघांनी, ज्यात आपल्याला आनंद मिळेल, आणि तो तळेगावला सपत्नीक गेला. आणि तिथे स्थायिक झाला. मुले मध्ये मध्ये येत .... आता टक्कर देणे थांबले होते, नव्हते त्यानेच ते थांबविले होते... स्वखूशीने...!!

०-०-०-०

# देवचार !

बरेच दिवस नाशिक वारी झाली नव्हती म्हणजे वेळही नव्हता, आणि कामाचा बोजा उपसता उपसता जराही उसंत नव्हती. तसे खास काही काम मला नव्हतंच. पावसाळा आला होता. कोर्टातही कामे कमी होती. म्हटले चला नाशिक गाठावे. त्यात माझा स्वार्थ होता. त्र्यंबकेश्वराचे दर्शन आणि माझा जीवश्च कंठस्य मित्र रामचा दोन दिवसाचा सहवास. त्याचे घर हे गोकुळ होते. आनंद ओसंडत होता घरात. सारी सुबत्ता हात जोडून उभी होती. प्रचंड मोठा बंगला म्हणजे मोठा वाडाच म्हणा. खरे तर मुंबईच्या दगदगीतून मला सुटका करून घ्यावयाची होती म्हणून सकाळीच 'पंचवटी' गाठली, नी दुपारी ११ वाजता नाशिक स्टेशन.

रामा मी आलोय तेव्हा प्रथम त्र्यंबकेश्वर दर्शन, मग रामाचे दर्शन आणि मग तुझा पाहुणचार! मी दोन दिवस तरी नक्कीच आहे, नाशिकात ! मग नाही. आता यावेळी चांगले १५ दिवस तुला सोडणार नाही. शिवाय कोर्टाला सुट्टी आहे, उगाच जायचा बहाणा करु नको ! आपण शिरडीला जाऊ ! तेथे दोन दिवस राहु ! मग शेगांव ! स्वामी दर्शन आणि शेवटी आई भवानीचे दर्शन घेऊन नाशिक ! कसा वाटला माझा प्लॅन ? ... तो.

''उद्या आपण त्र्यंबकेश्वरला जायचा प्लॅन करु ! मग पुढचा प्रवास, कसे ?'' मी.

''हो तू म्हणशील तसे.'' तो.

''पण यात मला आराम कधी मिळणार ?''

''नंतर बघू यार ! आता प्रथम जेवण घेऊ, मग रामाचे दर्शन ; संध्याकाळची झकास पार्टी आणि मग रात्रीची झोप !'' तो.

ती रात्र मी शांतपणे झोपलो. माझ्यासाठी त्याने पहिल्या माळ्यावरची खोली तयार करून ठेवला होती.

रात्रीची जेवणे झाली. मग शिळोप्याच्या गप्पा. रात्री ११ वाजता झोपलो ते सकाळी ६ पर्यंत.

तळ मजल्याच्या हॉलमध्ये येऊन मी योगा करण्यास सुरुवात केली. प्रथम आसने, मग प्राणायाम आणि कपालभाती ... मी शडाष्टक लावले नी ॐशांती म्हणणार... एवढ्यात त्याचा म्हणजे रामचा नोकर. रामू बराच वेळ माझे

आटोपण्याचे वाट पहात होता. आंघोळीला पाणी काढले होते. त्र्यंबकेश्वरला जायला गाडी तयार होती.

''तुमच्या अंगात देवचार, येता काय ?''

''नाही बा!''

''माझो विश्वास नाय ! पण खात्री असा की तुमच्या अंगात देवचार येताच!'' रामू.

मी पण गडबडून गेलो त्याचा या अनपेक्षित प्रश्नाने, मी आणि देवचार ! याने काही पाहिलयं का माझ्यात ? त्याच्या डोळ्यात हे खूळ कसं आलं ?

त्यादिवशी त्र्यंबकेश्वरला जाऊन मी दर्शन घेऊन संध्याकाळी ६ वाजता आलो. मग आंघोळ आटोपली आणि जेवून छान झोपलो. आठवीत त्र्यंबकेश्वरला....

सकाळी नेहमीप्रमाणे ६ ला उठलो. नित्य कर्मे करून योगाला मी बसलो. क्रमाक्रमाने आसने, प्राणायाम सुरु झाले... मी पाहिले रामू कोपऱ्यात उभा होता. नी न्याहाळीत होता मला. बाकी सारे कसे शांत होते. मग झाली कपालभाती सुरु.

''यिलो ! देवचार यिलो... महाराज्या यिलो!'' म्हणत त्याने टाळ्या वाजवल्या नी पहातो तर हॉल क्षणात भरुन गेला समोरचा. त्यात रामही होता.

''इचारा प्रश्न ! इचारा !'' रामू.

माझी कपालभाती सुरुच होती. तोवर सारे कसे शांत होते... पण ते संपताच...

''देवा ! माझ्या म्हशी गेले तीन दिवस सापडत नाहीत. समद्या पाच हायत त्या... कुठे आहेत, सांगाल का ?'' एक.

मला जाग आली ....

''डावीकडच्या खाचरात ! काहीतरी म्हणावे म्हणून मी म्हटले. तो धूम पळत गेला इतरांना तुडवीत...

मग, दुसरा, तिसरा ... एवढ्यात रामूने धुपारती आणून ठेवली समोर, धूपाच्या धुराने माझा जीव कोंडला होता. अजून लोम विलोम नी मग ॐ बाकी होते. मी काही बाही सांगत होतो. सारेजण निघून गेले .... नी.

''देवा ! आज साई संस्थानचे टेंडर फूटणार आहे ! मला मिळेल ना?'' राम.

''हो, मिळेल ! ... मी.

आता समोर कोणीही नव्हते. मी सगळी योगासने आवरली नी उठणार... माझे दोन्ही पाय कोणीतरी दाबले आहे असा भास झाला. रामू माझे पाय मळीत होता... जरुरी नसताना... पण त्याच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहून... काहीही न बोलता वा आसन न सोडता तसाच बसून होतो... तेवढ्यात...

''देवचारा ! माझ्या पोरीचे लगीन अडले या. कधी होणार ?''

''जून महिन्यात !'' मी.

आणि तो पटकन उठला... धूपारती घेऊन निघून गेला. मी मात्र सारे काही घडलेच नाही अशा अविर्भावात माझ्या बेडरुममध्ये गेलो... तर रामू माझ्या बिछान्यावरची चादर नीट करीत होता.

''देवा ! येवा ! ... म्हणत तो माझ्या पाया पडला नी निघून गेला...

मागून राम चहा नाष्टा घेऊन बेडरुममध्ये आला. त्याचा चेहरा आनंदाने ओसंडत होता. आणि माझ्यासमोर तो उभा होता हात जोडून....

''राम ! हे काय, हे हात जोडणे काय ? कोणाला ? कशासाठी ... !'' मी.

''तुमच्यासाठी देवा !'' राम.

मी पार चक्रावून गेलो होतो. नी उठून बाथरुमकडे वळलो... तर हातात टॉवेल घेऊन राम उभा!

''औ ! भाऊ राम ! काय तमाशा चाललाय सकाळपासून ? अरे मी देव वगैरे कोणी नाही. तुझा मित्र .... शाम .. !'' मी.

टॉवेल घेऊन मी बाथरूममध्ये घुसलो. पार चक्रावून गेलो होतो. मी सकाळच्या सगळ्या प्रकाराने ... द्विधा मनस्थितीत... मी मला आरशात पाहून घेतले. तसा फरक नव्हता... मी तोच शाम होतो... मग आटोपली आंघोळी नी शांत बसून होतो पलंगावर...

तर रामूने चहा आणला...

''काय रे रामू ! काय चाललाय तमाशा सकाळपासून ... मी कोणी देव नाही हां ! मी मी शाम आहे ! हे सारे थांबवा ... !'' मी.

तो काहीच न बोलता निघून गेला... आज तसा काहीही कार्यक्रम नव्हता... संध्याकाळी काळाराम मंदिरात जाऊन दर्शन घेणे एवढेच. पण घडल्या सगळ्या गोष्टीचा मी उगाच विचार करीत बसलो... साला ! काय चावटपणा चाललाय ?

दुपारी मी तासभर झोपून उठलो, तर रामच्या गाडीचा आवाज, पोर्चमध्ये

आला... नी तो धावतच माझ्या बेडरुममध्ये आला!

"महाराज्या!... मला टेंडर मिळाले! आपल्या कृपेने ! माला-माल मी होणार आता ! हे पेढे घ्या ! राम आणि तो माझ्या पायाशी बसला.

अरे काय वेडा आहेस काय? मी शाम हाय ! कोणी महाराज्या नाय ! काय?

तो काही न बोलताच निघून गेला, नी मी त्याच्या जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहिलो. आज खरच मी कात्रीत सापडलो होतो... मी खाली आलो तर काळाराम मंदिरात जायला गाडी तयार होती... नि राम ने अदबीने दरवाजा उघडला तो मागचा...

"अरे! राम मी पुढे बसतो तुझ्या जवळ, मागे नाही !" मी.

मी काही न बोलता गाडीत बसलो... आणि राम गाडी चालवीत होता...

आता पुढचे १५ दिवस कोठेही जायचे नाही ! सकाळचा दरबार, नी आम्हाला सेवा करायची संधी द्या!" राम.

हे तुम्ही ! तुम्ही काय चाललेय कालपासून, मी कोणी महाराजा, साधु, साक्षात्कारी पुरुष नाही ! राम, मी शाम आहे तुझा मित्र !" मी.

काळाराम मंदिर आल आणि मी गाडीतून उतरणार ... एवढ्यात रामने दरवाजा उघडला. ..

"या ! महाराज." मी.

या महाराजाच्या प्रकरणापासून मलाही माझाच संशय आला होता. खरच मी कोणी साक्षात्कारी पुरुष आहे काय ? मी मला चाचपून पाहिले, पण तसा फरक नव्हता... पण इतरांच्या वागण्यात... अमुलाग्र बदल झाला होता. तो दिवस गेला....

"अरे राम ! आपल्या तुळजापूरचे काय ? मी विसरायचे आता ! राम तुम्ही आता कोठेही जायचे नाही ! आमचे तुम्ही पाहुणे तुम्ही लोकांना सेवा करण्याची संधी द्या. आता मुक्काम येथेच!" राम.

"अरे माझी वकिली ! मला जावे लागले !" मी

"नाही...." राम.

मी गप्पच बसलो.

दुसऱ्या दिवशी गुरुवार होता. नी मी योगाला बसताच रामू आणि कुटुंबीय, मुले सगळ्यांनी माझे पाय धरले. आता मात्र मी आनमान न करता दर्शन दिले...

''शामेंद्र महाराज की जय!'' सगळ्यांनी एका सुरात माझा जय जयकार केला. रामुने पण माझे दर्शन घेतले.

''राम मला एकटा सोड. माझा योगा आटपू दे !'' मी.

''हो, पण लवकर आटोपा, बाहेर लोकांची गर्दी झाली आहे. आम्ही सगळ्यांना सातची वेळ दिली आहे.'' राम.

''कशाला, हा काय चावटपणा चाललाय ? अरे पण कोणी देव नाही ! कृपया राम हे थांबव. मला एकटा सोडा.'' मी.

''योगा संपला नी रामुने हॉलचा दरवाजा उघडला. मात्र भराभर शंभर, सव्वाशे लोक दरबारात आले. मी चक्रावलो. काहीच समजेना मला. खरंतर मी नाशिकला येऊन फसलो होतो. परत तीच लोकांची, प्रश्न माझी उत्तरे ! मी मनाला येईल ते सांगायचो प्रश्नांचा कल पाहून. म्हणजे तात्काळचा प्रश्न असेल तर विचार करावा लागेल पण लांबचा .... म्हणजे लग्न जमणे, होणे, नोकरी, प्रेम ... मग चार, सहा महिन्यात सांगून टाकत होतो. पण लोक समाधानी .. आनंद ओसंडायचा चेहऱ्यावर म्हणून मी तेथे बसून सारे पहात होतो...

शेवटचा माणूस उठला. मी पहिल्या दिवशी आलो होतो. तेव्हा तो आला होता, माझ्या म्हशी ! महाराज तुम्ही बरोबर बोललात तेथेच सापडल्या त्या... तुम्ही साक्षात्कारी आहात महाराज ! म्हणत त्याने माझे पाय धरले... मी ही आनमान न करता .. पाया पडू दिले.

''हा प्रसाद!'' तो.

मी तो स्वीकारला. तो आनंदाने परत गेला आणि राम हॉलमध्ये आला.

''महाराज ! हे घ्या तुमचे नवे कपडे!'' तो.

कशाला !

''घालायचे उद्यापासून...ही भगवी तुम्ही महाराज शोभायला हवेत...!''

मी ते घेतले नी उघडून पाहिले तर त्यात एक भगवी कफनी नी एक भगवीच लुंगी... आता मात्र मी फसलो आहे याची जाणीव मला पक्की झाली. दुसरा संशय स्वत:चा आला. हे येणारे लोक समाधानी कसे ! त्यांना मी सांगितलेले खरे वाटते का ? की देवच माझ्या मुखातून सारे वदवतो ? असेलही आणि आता रामही माझ्या चरणी लागलाय ? काय खरे ! काय खोटे ? पण मी अडकलो होतो एवढे खरे. अनेक वेळा येथून पळून जावे असा विचार मनाला स्पर्शून गेला पण मार्ग सापडत नव्हता. एक मत सांगे लोकांच्या विश्वासाला जाग. दुसरे सांग

या बंडलबाजीतून बाहेर पड... ताबडतोब.

आजचा पहिला दिवस, मी कफनी घालून बसलो, नव्हे रामच्या हट्टाने मी ती घातली. आम्ही काय पहातोय... अहो पैशाचा खच पडला पायाशी. १००, ५०० च्या नोटाही. एका भक्ताने तर २००० ची जुनी नोट ठेवली. की ती पाहिली, पण उचला ती ! हे सांगायला हिम्मत मला नाही झाली. त्यात आज प्रचंड गर्दी. हॉलमध्ये प्रचंड गर्दीच गर्दी. लोक दर्शन घेऊन जात होते नी मी आशीर्वाद देत होतो. पण मनातल्या मनात मी घाबरलो होतो. प्रचंड तणाव आला होता. आणि आज मी बळीचा बकरा झालो होतो.

आजचा दरबार म्हणजे आश्चर्य होते. चेहऱ्यावर महाराजांचा भाव आणून भगव्यामध्ये मी हॉलमध्ये प्रवेशलो....

शामचंद महाराजांचा विजय असो ! च्या घोषणांनी सगळा हॉल आणि बाहेरचा परिसर दणाणून गेला होता.

मी आसनावर स्थानापन्न झालो. गेले दोन दिवस बसत असलेल्या खुर्चीच्या जागी लग्नात नवरा नवरीला बसवतात तशा खुर्चीवर भगवे अंथरूण ती तयार केली होती. मी सुखावलो तो त्या आरामदायी बैठकीने. रामने एका टेबलावर प्रसादाचे तबक ठेवले होते. त्यात कंदीपेढे. मी दर्शन घेणाऱ्या सर्वांना एक एक पेढा द्यावा हा त्या मागचा उद्देश. शिवाय दोन सेवक मला दोन बाजूला उभे राहून वारा घालीत होते. म्हणजे चौऱ्या ढाळीत होते. हा सारा साज पाहून मीही सुखावलो. शिवाय रामजीने धूप घालून सगळा हॉल सुगंधी केला होता.

मी डोळे बंद केले. सर्व देवदेवतांचे स्मरण केले. कधी नव्हे तो आज मी देवतांचे स्मरण करीत होतो. खरेतर या संकटातून मार्ग निघावा म्हणून...

दरवाजा उघडला गेला आणि जमावातील लोक अगदी एक एक करून दर्शन घेत होते. त्या प्रत्येकाला मी एक एक पेढा देत होतो. लहान मुलेही पाया पडत होती. त्यांनाही भरभरून आशीर्वाद देत होतो. अहो हात दुखायला लागला तो प्रसाद वाटून... मग मी रामलाच ते काम दिले. दर्शना नंतर प्रश्नोत्तराचा तास.

पण एक एक करीत सगळ्यांचे समाधान होईल अशी सहजपणे उत्तरे देत होतो. अगदी तोंड दुखायला आले होते. एवढ्यात एक तरुण जोडपे समोर उभे राहिले. त्यांनी नमस्कार केला वाकून... आणि समोर बसले मी त्यांना न्याहाळले. ते विवाहित नव्हते. मग ...

''महाराज ! आमचे एकमेकांवर प्रेम आहे हो ! पण दोन्ही बाजूंच्या

घरच्यांचा विरोध. त्यात हा आंतरजातीय विवाह... आम्हाला मार्गदर्शन करा ! महाराज आम्ही काय करावे, उपाय सांगा!''

मी विचारात पडलो. काय सांगावे. मला आमच्या लग्नाचा प्रसंग आठवला. तोही प्रेमविवाह. दोन्ही बाजूचा विरोध... आम्ही पळून लग्न केले हे आठवले. मी डोळे मिटले. ध्यान केले नी झटक्यात म्हणालो.

''बाळांनो! पळून जा नी लग्न करा !'' सारे काही ठीक होईल. माझा आशीर्वाद आहे. मग ते दोघे ताडकन उभे राहिले.

''महाराज ! आम्हीही तोच विचार करत होतो. म्हणत ... पुन्हा नमस्कार करून ते गेले.

मग दरबार आवरता घेतला. माझे सर्वांग ठणकत होते. पार दमून गेलो होतो. मग मी जाऊन बेडरुममध्ये झोपलो. ते जोडपे सारखे नजरेसमोर येत होते. मला माझी सुटका कशी करावी हीच विवंचना होती. या सगळ्या दरबार प्रकरणातून साईंचे दर्शन नाही झाले ... नि माझाच 'पोपट' झाला होता. रात्रभर खूप विचार केला नि सकाळीच येथून पळून जाण्याचा विचार पक्का केला. पण रामला पटवणे गरजेचे होते. तरच यातून सुटका होणार होती. पण तोही फुटक्या बुडाचा निघाला. त्याने पैशाच्या लालसेने हा उपक्रम पुढे असाच चालवावा असा माझ्यामागे धोशा लावला. पण मी तयार नव्हतो. या सगळ्या खेळात रामही अडकला होता. हा त्याचा बंगलाही सार्वजनिक झाला होता. घरातली शांती फार विसकटून गेली होती. रात्री अपरात्री लोक येत. पहारेकऱ्यांनाही नाही जुमानत. शेवटी पोलिस बोलवावे लागतात. बंगल्याचा त्यांच्या मठ झाला होता. पण त्याला मी जबाबदार नव्हतो. घटना एवढ्या वेगाने घडत होत्या की, डोके चक्रावून गेले होते. एका आठवड्याभरात मी शामचा महाराज झालो. कसा हे मला ही अजून उमगत नव्हते. मुळात मी नाशिकला कसा आलो का आणला गेलो याचाही उलगडा अजून होत नव्हता. पण जे काही घडले ते सत्य.

त्या शेवटच्या 'प्रेमिकांच्या' प्रकरणात मी त्यांना सांगितले पळून जा !... यातून मलाही आता पळून जावे असे वाटत होते. पण मार्ग सापडत नव्हता. जेवण झाली की मी रामला माझ्या बेडरुम मध्ये बोलावले तोही भोळा येताच माझ्या चरण स्पर्श करून .....

''महाराज ! काय आज्ञा ?''

म्हणजे याच्याही डोक्यात तो महाराज फिट बसला होता. पण माझ्या

नव्हता. यातून मार्ग कसा काढावा याच विचारात मी होतो. मार्ग सापडला होता पण त्याची अंमलबजावणी कशी करावी. व यासाठीचा तोडगा काय यासाठी मी रामला बोलावले होते.

त्यानंतर मी गप्पच होतो...

''महाराज ! काय आज्ञा ?''

मी त्याचा हात पकडून पलंगावर बसवला. ''राम खरं सांगू मला पळून जावे असे वाटत आहे. तुच मार्ग सांग. त्यातून माझी आणि तुझीही सुटका होईल बोल काय करावे ?''

''जा पळून !''.... राम.

ठरले उद्या मला सगळ्यांना निरोप द्या मी १२ वर्षांसाठी हिमालयात जातोय तपश्चर्येसाठी असा बोर्ड लाव... आणि बातमी पेपरमध्ये द्या.

झाले पेपरमध्ये माझ्या फोटोंची छायाचित्रे नावांसह आली छापून...

पुनः तशीच गर्दी. पण आज मी रीलॅक्स होतो. आता या संकटातून माझी सुटका होणार होती आजच.

सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत दर्शन सोहळा चालू होता... त्याच दिवशी कफनीच्या वेशात पंचवटी एक्सप्रेस मध्ये मला निरोप दिला. मी एका स्वतंत्र कुपेमध्ये होतो. प्रथम दरवाजा लावला. कफनी काढून ........... सरकवली. नी पॅन्ट, टी-शर्ट घातले. आता कसे अगदी छान वाटत होते. छान

एवढ्यात दरवाज्यावर टक टक आवाज आला. कॅटरींगचा माणूस उभा होता. हातात कॉफीचा ट्रे.

अहो इथे एक महाराज होते ते कुठे गेले ?

मेले ! मी

''काय सांगताय काय ? .........................

मी सांगतो ना ते मेले ! ...

म्हणजे अहो सकाळी लोकांनी त्यांना निरोप दिला ना... आम्ही पाहिले ते याच कुपेत आले.... आम्हाला त्यांची चांगली खातरदारी करण्याची सूचना आहे... या गाडीत दोन आमदार, एक खासदार बाजूच्या डब्यात आहेत. ते ही आता येतील! अहो आम्ही काय सांगायचे, त्यांच्यासाठी आमची नेमणूक आहे.

''अरे ते मेले म्हणून सांगितले ना !'' मी.

आणि मी ती कफनी त्यांच्या अंगावर भिरकावली. तसा तो घाबरला आणि पळत सुटला. मी तसाच बाहेर पडलो बॅग घेतली नी. सर्वसाधारण डब्यात जाऊन बसलो. सुटकेचा श्वास सोडला. एवढ्यात कल्याण स्टेशन आले. प्रचंड गर्दी होती महाराजांच्या दर्शनासाठी.

मी बाहेर आलो नि चक्क एस.टी. ची गाडी पकडून बोरीवली गाठली. खूप भूक लागली होती. म्हणून एका हॉटेलात गेलो नी पोट भरून घेतले. मग घरी जाऊन अंग टाकून दिले. खूप हलके हलके वाटत होते. रात्री झोप छान लागली.

आणि सकाळी वर्तमानपत्रात माझा फोटो कफनीत.... महाराज मेलेल्याची बातमी ठळक मथळ्यात....

मग मात्र महिनाभर मी घरातच राहणे पसंत केले.

माझ्या अशिलांचें सारखे फोन येत होते. मग बाहेर पडणे क्रमप्राप्त होते.

एकदाचा महाराज प्रकरणावर पडदा पडला होता. आठवणीने मन थरारते.... देवाचाराने पूर्णपणे मेलो होतो !!

०-०-०-०

# अनुत्तरीत शल्य

प्रेमात पडला ना माणूस कि तो हरवतो स्वप्नांच्या दुनियेत, हरवतो, भूक, तहान आणि स्वत:लाही प्रेमाच्या हवाली करून, त्याचा ही नाही रहात तो. दिवस रात्रही हरवते त्याची आणि मखमली गालीच्यावरून त्याचा प्रवास सुरु होतो, जीवन भर. डोळ्याच्या पापण्या आड लपून राहते ते प्रेम आणि डोळे बंद करताच शहारते मन त्याचे, आणि वहात रहातो प्रेमाचा धबधबा, सगळे अडथळे पार करीत, भेटी साठी प्रेमाला आपल्या. जोवर प्रत्यक्ष नाही येत ना वास्तवात, तोवर स्वप्नांच्या भेडोळ्यात ते बंगले बांधीत रहाते, कधी कोसळतो तो, तर कधी झगमगतो ओसंडणाऱ्या मोगऱ्याच्या सुगंधात डोळे झाकून आपले कधी होतो उष्ण आसवांचा डोह तर कधी हरपतात शितलतेत प्रेमाच्या. कधी अंतरंगातला मकरंद पिणारे हे प्रेम, तटातटा तुटते आणि ठासळतो पत्यांचा बंगला तो मनोरा. पण उरतो आठवणीत, ढाळीत आसवे आयुष्यभर.

हे एकदा आणि एकदाच घडते हो माणसाच्या आयुष्यात, मग कितीही लाटा आल्याना, की नाही सर येत त्या पहिल्या प्रेमाची. नंतरच्या लाटांच्या कितीही फेरी झडल्याना तरी अंतरात कायम स्थान असते ते पहिल्या प्रेमाचे, ते देत रहाते आनंद, अनुभूती आनंदाची. जीवन भर, तसेच आणि तसेच गुलाबी, दरवळत नी मनात, खेळवीत आपल्याला. शेवटच्या श्वासापर्यंत, रंगीबेरंगी फूल पाखरू होऊन शितलतेची अनुभूती देत प्रेमिकाना अखंड जीवनभर.

वसंताचे असेच प्रेम होते शालूवर आणि शालूचे वसंतावर, शुभ्र चांदण्यात न्हात पौर्णिमेच्या, गंधाळत, मकरंदाचा आस्वाद घेत, तना मनाला सुखवीत एकमेकांच्या.

पण कधी कधी नियतीच ढासळते या प्रेमाचे बुरूज आणि आकाश काळ्याशार ढगांनी भरून जाते, येतात वादळे जीवघेणी, कडकडाट विजांचा आणि पाला पाचोळ्या सारखे. दोन ध्रृवावर दोघे जातात. पुनः कधीही न भेटण्यासाठी.

शाळेत गंधाचा सडा घालणारे हे प्रेम, नसते कधी कधी, कितीही समजावले जगाला तरी आणि पार काळवंडून जाते, अंतर बाह्य. स्वार्थी, दुटप्पी, गोष्टीचा विजय होतो आणि प्रेमाचा हा प्रवाह दुभंगला जातो मध्ये येणाऱ्या जीवघेण्या प्रवाहाने ह्रदयाचे होतात दोन तुकडे आणि उरते त्यांचे अस्तित्व दोन किनाऱ्यावर

आठवीत आणि ढाळीत आसवे.

या बालवयात प्रेमिकांना नसतो अनुभव, नियतीच्या जीवघेण्या खेळाचा. शाळा संपते आणि रस्तेच बदलतात, दोघांचे जीवनाच्या उपजीवीकेच्या शोधात, आणि मागच्या वाटाही मग आंधळ्या होतात. नवी दिशा, नव्या आशा यांच्या वाऱ्यानी दूर फेकले जातात दोघे. मागे वळून पहाण्याचे भानही नाही रहात दोघांना, आणि आंधळी होते नजर झगमगाटात दुनियेच्या मायावी.

आणि तसेच झाले बारावी झाल्यावर वसंताच्या काकाने त्याला इंजीनीअरिंगच्या शिक्षणासाठी पार दुर यू.के.ला पाठवून दिले. आणि शालुला तिच्या भाऊने दिल्लीला नेले. झाले संपर्क तुटला. ना फोन, ना पत्र, साऱ्या वाटाच बंद झाल्या, पण मनाच्या वाटा कुणी बंद करु शकला नाही. दोघेही एकमेकांसाठी प्रेमात बुडाल्याने हरवली होती. आपल्या ह्दयाच्या अंतरमनात. रोज रात्री त्यांची झोप मोड होई, भेटत दोघेही स्वप्नात. आणि चांदण्याच्या दिव्यत्वाची अनुभूती घेत घेत एक दिवस ढकलीत होती आशेवर. केव्हातरी आपण भेटू, एकमेकांचे होऊ. आणि संपूर्ण आयुष्य एक दिलाने 'एक दुजे के होऊ'.

पण नियतीला हे मान्य नसावे. वसंत बी.ई. झाला आणि एम.एस. करायला यू.एस.ला गेला. आणि शालूने एम.ए.केले. हिस्टरीत, तिचे एक स्वप्न होते. म्हणजे दिल्लीला आल्यावर तिने आय.ए.एस. व्हायचे. आय.पी.एस.साठी प्रयत्न करायचे आणि उच्च पदस्त अधिकारी होऊन भारत मातेची सेवा करायची. वसंत एम.एस.झाला आणि पुढे तो डि.लीट् करून यू.एस.च्या नासामधे जॉईन झाला.

जेव्हा शालू गावाला आली आय.ए.एस. होऊन तेव्हा गावच्या लोकांनी तीचा सत्कार केला. तेव्हा ती भेटली तीच्या घरच्या लोकाना. त्यानी वसंता बद्दल सारे सांगितले. शालूने त्याचा पत्ता, फोन नंबर त्याच्या काकांकडून घेतले व वसंताला संपर्क केला. पण त्याचा संपर्क होऊ शकला नाही, गेले चार महिने वेड्या सारखी तीची अवस्था झाली होती. तीने तीच्या बाबाना फोन करून वसंता संबधी त्याच्या कुटुंबियांना संपर्क करून, त्याच्या बद्दल काही सांगा. पण काहीही उपयोग झाला नाही. तो नासाच्या सागरात पार बुडाला असणार. आणि त्याचा संपर्क होणे आता दुरापास्त झाले होते. आपण उगाच त्याच्या मागे घोटाळण्यात आता अर्थ नव्हता. खरेतर ती दोघे दोन ध्रृवावर उभे होते.

दोघांचेही विश्व वेगळे होते. शालूच्या काकांना वसंताचे कुटुंब काहीही सांगायला तयार नव्हते. तो फुकट गेला येवढेच त्याचे काका म्हणाले होते. याचा अन्यार्थ लावून त्याच्या अस्तित्वाबद्दल कीस काढीत शालू बसली होती. आता तर तिने त्याचा नादच सोडला होता. कारण लग्नासाठी घरच्यांचा दबाव तिला अस्वस्थ करीत होता. पण काही केल्या शालूने वसंता बद्दल आशा सोडली नव्हती. गेली दहा वर्षे ती त्याच्या प्रतिक्षेत होती पण आशेचा एक किरणही तिला दिसत नव्हता.

त्यावेळी ती दिल्लीच्या सेक्रेटरीयेत मधे होती व नुकतीच तिची नेमणूक पी.एम.च्या ऑफीस मधे होणार अशी बातमी तीला मिळाली. खूप आनंदी झाली ती डी.वाय.सेक्रेटरी म्हणून तेथे प्रमोशन मिळाले. आणि पदाचा चार्ज देण्यात आला. पुढच्याच आठवड्यात ती रुजू झाली.

तिच्या कामाचा भाग म्हणून यू.एस. सरकारच्या सगळ्या बातम्या, सर्व मुख्य अधिकारी, मिनिस्टर व प्रेसिडेन्ट यांच्या डे टू डे भारतासंबंधीच्या घटना, यांच्या बातम्या येत. यू.एस. सरकारने दिले जाणारे पुरस्कार अ हॉनर. यांच्याही बातम्या येत असत. एक दिवस एक बातमी आली. वसंताला यू.एस.सरकार तर्फे ''ऑर्डर ऑफ यू.एस.ए.'' हा पुरस्कार दिला गेला. त्याच्या नासातील संशोधना बद्दल आणि पूढच्या महिन्यातच तो यू.एस. प्रेसिडेन्टच्या हस्ते दिला जाणार होता. आणि त्याच वेळी भारताच्या पंतप्रधानाचा यू.एस. दौराही होता. अर्थात शालूही त्या दौऱ्यात जाणार होती. ती तेथे प्रथमच जाणार होती. खूप खूष होती ती, कोरोना मुळे तो पूरस्कार प्रेसिडेन्ट होममध्ये देण्यात आला व जाहीर कार्यक्रम रद्द झाला. अर्थात शालूला वसंताला भेटण्याची इच्छा काही पूर्ण झाली नाही.

आपण आय.ए.एस.पेक्षा आय.एफ.एस. सर्विसमधे जावे असे सतत वाटत होते. तिने त्याच्या दोन संधी पूर्वीच घेतल्या होत्या. राहता राहिली एक संधी म्हणजे परिक्षेला बसण्याची संधी यावेळी काहीही करून ही संधी वाया घालवायची नाही असे मनोमन तीने ठरवले होते व त्या प्रमाणे परीक्षेची तयारी केली. आणि ती दहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली व तिचा इन्टंरव्हू झाला.

''तुम्हाला फॉरेन सर्व्हीसमध्ये जाण्याची इच्छा का आहे !'' परीक्षक.

तेव्हा शालुने अस्खलीत इंग्रजी मधें त्याचे समर्पक उत्तर दिले. गेली २ वर्षे पी.एम.ऑफीस मधे असताना यू.एस.च्या बाबत तिचा अभ्यास चांगला होता

आणि आय.ए.एस. होण्यापूर्वी मला आय.एफ.एस. व्हावे अशी मनिषा तिने अंतिम इन्टरव्ह्रूच्या वेळी मुलाखतकारांसमोर व्यक्त केली.

आणि ती पास झाली व तिच्या चॉईस प्रमाणे न्यू.यॉर्कमधल्या इंडीयन काऊंसलेटमधे तिची नेमणूक झाली. एक दिवस काही काळासाठी इंडीयन पासपोर्टचे काम तिच्याकडे देण्यात आले होते. आणि त्यावेळी १५ वर्षे पूर्ण झालेल्या भारतीयांचे पासपोर्ट रिन्यूअलला आले, त्यात वसंत सबनीस याचा पासपोर्ट तिने पाहिला. त्याच्यात फारसा फरक पडला नव्हता. तो तसाच राजबिंडा होता. त्यावर त्याचा हल्लीचा पत्ता होता. तिने त्याचा पासपोर्ट नोंदणी करून पाठवला व त्याच्या पत्त्यावर त्याला एक पत्र पाठविले, मेल केला, फोन केला पण त्याने तो उचलला नाही. यू.एस.चे एक नवीन यान मंगळावर पाठविण्याची योजना होती त्याचा तो हेड होता. १८/२० तास काम करावे लागे. शिवाय नासाच्या नियमा नुसार ऑफीसमधे मोबाईलला परमिशन नव्हती. १८/२० तास करून घरी आल्यावर ८ तासाची झोप मिळत नसे मग वसंत कसा उचलणार शालूचा फोन . शिवाय तो तिचा यू.एस मधला फोन ना नाव, गाव.

पण पासपोर्ट मिळाल्यावर वसंताने पासपोर्ट देणाऱ्या अधिकाऱ्याची सही आणि नाव त्याने वाचले आणि तो उडालाच. ही येथे कशी? या प्रश्नाने तो चक्रावला. त्या पासपोर्टवर ऑफीसचा पत्ता न्यूयॉर्कचाच होता. तिचे नाव तेच होते, म्हणजे तिने अजून लग्न केले नाही ! कां ! असाही प्रश्न त्याला पडला. पण तिला भेटण्याची इच्छा त्याला अनावर झाली होती. यू.एस.च्या न्यूयॉर्क-इंडियन काऊंन्सलेटला त्याने एक मेल केला. तो शालूच्या नावाने. तीलाही आश्चर्य वाटले. आणि भेटण्यासाठी येऊ कां? असा मेसेज पाठवला.

तिने तत्काळ त्याला उत्तर दिले. वसंताने लग्न केले असेल का कोणाशी? या विच्याराने गेल्या आठवड्याभर तिला झोप नाही लागली जर त्याने लग्न केले असेल तर कसे कळणार ? शिवाय त्याच्या पर्यंत ते मेल पोहचत असेल कां? तो कॉम्प्यूटर जगापासून वेगळाच होता. ना संपर्क कोणाचा अतिशय सिक्रेट असा होता. त्यातील कोणाला बाहेर जायचे असेल तर सोबत दुसरा माणूस पाठवला जायचा. त्यात त्याचे यान हे आठवडा भरात उड्डाण करणार होते. मग तो मोकळा होता. या यानाच्या बांधकामात त्याचा सिंहाचा वाटा होता. मंगळावर १ वर्षानंतर ते यान पोहचणार होते. ते उडाले आणि वसंताने सुटकेचा निश्वास सोडला. त्याला न्यूयॉर्कला जाण्याची परवानगी मिळाली, पण सोबत एक

अमेरिकान मॅडमला डेप्युट करण्यात आले होते.

न्यूयॉर्क येताच तो शालूच्या ऑफीसला आला. तपासणीचे सर्व सोपस्कार झाल्यावर त्याला व त्या अमेरिकन मॅडमन वर जाण्याची परवानगी दिली. तो शालूच्या ऑफीस मधे आला व वेटींग रुम मधे बसला १/२ तासाने शालू त्याला भेटायला आली. तो भेटला पण त्या मॅडम कोण ?

"She is may Assistants ! वसंत

" OK OK."

"Can I meet her alone ? वसंत

"No please ! No permission!" मॅडम

" Why ?"

"Our mission is secrete ! & no one should know where about and any thing. you can not discuss any secrete ! मॅडम

" OK OK." ! she is my friend & I want to talk to her !

"No you please talking my presence only ! मॅडम

वसंताचा नाईलाज झाला आणि त्या मॅडमच्या समोरच शालूशी बोलणे झाले !

तो कमालीचा नाराज झाला ! त्याला शालूच्या लग्ना संबंधी व बऱ्याच गोष्टीची माहिती घ्यायची होती पण काहीच साध्य झाले नाही. तो नासाच्या Complex मधेच रहात होता. बाहेरचे कोणीही आत येऊ शकत नव्हते येवढी security tight होती.

शालू ! मी भारतात २ महिन्याच्या रजेवर जाणार आहे. तेव्हा मी भारतात जाण्यापूर्वी तुला भेटेन, नक्की. मी भारतात जाण्याचे सगळे सोपस्कार पूर्ण करतो.! आज आपण सविस्तर बोलू शकलो नाही ! सॉरी आणि त्याने त्या मॅडम कडे एक कटाक्ष टाकला. त्याचे कारणही तसेच होते ! बरेच देश ॲम्बेसी मार्फत हेरगीरी करतात. असा संशय त्या देशातल्या सरकारला असतात, तेव्हा येवढी काळजी घेणे भाग असते. एकदा त्या कैदेत गेला तर स्वत्व हरवून बसता तुम्ही. म्हणून त्या कैदेतून बरेच लोक पळण्याचा प्रयत्न करतात. वसंतच्या मनातही तसे विचार गेल्या ६ महिन्यात सुरू होते पण पी. एम. मोदी यांच्या आवाहनानुसार अनेक तरूण परदेशातून भारतात येण्याचा प्रयत्न करतात. गेल्या ६ वर्षात प्रथमच वसंत भारतात येण्याच्या विचारात होता. आता शालूला भेटल्यावर

त्याची ती उर्मी अधिकच वाढली . पण अनेक प्रश्नांची उत्तरे त्याला मिळाली नव्हती. तीने लग्न केले कां? वा केले पण घटस्फोट झाला कां? कि काही अफेअर चालू आहे. या तिन प्रश्नांत त्याचे मन गुंतले होते पण उत्तरे मिळत नव्हती. तो खूपच अस्वस्थ होता.

आणि त्या बयेला वसंत बरोबर पाहून शालूही गैर समज करून बसली. ही याची कलीग की आणखी काही संबंध आहे याचा हिच्याशी. वसंतने लग्न केले कां? कां नाही केले अजून? तो माझ्यासाठी थांबला कां? इ. इ. ह्या प्रश्नांची उकल होत नव्हती. पण तो मला भेटायला आला हेच खूप झाले. त्याने लग्न केले असते तर आला नसता, त्याच्या मनात काय विचार आहे. येवढ्यात त्याच्या मेलने ती सुखावली, झोप उडाली तीची. तो तीच्याकडे ८/१० दिवसात येणार होता, त्या क्षणांची वाट ती पहात होती.

शालूला भेटून वसंता आणि त्याची असिस्टंट आपल्या गाडीने परत निघाली. ८००/९०० कि.मी.चा तो प्रवास. होता रात्रभर गाडी ड्रायव्हर चालवीत होता. मधे मधे थांबून त्यानी डिनर व चहा-कॉफी घेतले. रात्री त्याला झोप लागली. तेव्हा ती मॅडम मात्र जागी होती. प्रवासातल्या गप्पां मधे तिला माहिती पडले जे वसंताने तिला सांगितले. ती म्हणजे शालु त्याची बाल मैत्रीण होती Fiancee आहे आणि आता ७/८ वर्षांनी भेटत आहेत. त्यांना लग्न करायचे आहे लौकरच. ती बया नाराज झाली गेली ३ वर्षे ती वसंता बरोबर काम करीत होती. वसंतावर ती फिदा होती. पण अधिक जवळीक नसल्याने त्यांचा फारसा संपर्क नव्हता. हा आता लग्न करणार याच विचाराने सगळ्या प्रवासात ती बेचैन होती. वसंता झोपेत असताना ती सरळ त्याच्या गळ्यात पडली वसंता जेव्हा जागा झाला तेव्हा, त्याला ती त्यालाच रेलून आहे हे समजले आणि पाल झटकावी अशी त्याने तीला दूर केली. असे त्या रात्री २/३ वेळा घडले.

ती दोघेही तरूण, तोही राजबिंडा, गोरा, अमेरिकनना मागे टाकणारा, हुशार, बुद्धीमान, तेव्हा त्या मडमेच्या तो मनात पूर्वीच भरला होता. पण या निमीत्ताने तीने त्याच्याजवळ जवळीक करण्याचा प्रयत्न केला. अशी संधी पुनः येणार नाही हे ही ती जाणून होती. पण वसंता तसा वहात जाणारा नव्हता. एखाद्या स्त्रीच्या स्पर्शाचा अनुभव कॉलेज मधून बाहेर पडल्यावर तो प्रथमच घेत होता. मोहरला क्षणभर, पण क्षणभरच सावध झाला आणि ब्रेक नंतर ड्रायव्हर जवळच्या सीटवर बसला. प्रवास संपला. पण त्या मडमेच्या अंगात झालेला

पुरूषी स्पर्शाचा ज्वर काही उतरायला तयार नव्हता. ही धोक्याची घंटा आहे, हे वसंता जाणून होता. त्याने तो प्रसंग हसण्यावर नेला कारण त्याला कोणताही धोका करून घ्यायचा नव्हता. आणि त्याच क्षणी आपण या चार भिंतीच्या तुरूंगातून आपली सुटला करून घ्यायचे ठरविले. त्याच वेळी नुकतेच मोदी अमेरिकेत येऊन गेले होते. त्यानी यू.एस.मध्ये काम करणाऱ्या, इंजीनियर, संशोधकाना आवाहन केले की भारतात या, आपल्या माय भूमित या. देशाच्या प्रगतीचे सुवर्ण पान व्हा. तो त्या मेळाव्याला गेला होता. आणि आता तर त्याला एक दिवसही येथे रहाण्याची इच्छा नव्हती. ती मॅडम आपला बकरा करील, तिच्या गोरेपणाला भुलून आपला आर्या होईल अशी भिती त्याला वाटत होती. आणि म्हणून त्याच दिवशी त्याने आपला निर्णय नासाच्या संचालकाना कळवला. पण त्यानी बोलावून वसंताला हातातले प्रोजेक्ट पूरे करा आणि मगच जा असा सल्ला दिला. म्हणजे अजून सहा महिने या तुरूंगात रहावे लागणार होते. आपण येथून निघावे. शालूशी विवाह करावा, हवेतर यू.एस.मध्ये रहावे. दुसरी नोकरी धरावी. अशी अनेक स्वप्ने तो पहात होता. पण नियतीच्या मनात काही वेगळे असावे. आता तो शालूशी मेल वर बोलू शकत होता. फोनवरही बोलणे होत होते. हा एकच आशेचा किरण त्याला दिसत होता.

पण नियतीला हे मान्य नसावे. शालूला अमेरिकेत ३ वर्षे होऊन गेली होती, आणि तिची बदली रशियन ॲम्बसी मध्ये झाली होती तिला तातडीने तेथे जाणे भाग होते. तिने तसे वसंतालाही कळवले. आता वसंताची भेटही दुर्मिळ गोष्ट झाली होती. स्वप्नांचा डोलारा तर केव्हाच ढासळला. जूळत आलेले योग पुनः लांबले. आता तो ३२ वर्षाचा झाला होता. वसंत आपल्या करीयर मागे पळत होता आणि शालूही. आता दोघां मधले अंतर खूपच दूर दूर होत गेले होते. आता ती रशियाला, पुनः भेट होणे कठीण. वसंता गेला महिनाभर अस्वस्थतच होता. आणि ती अमेरिकन मॅडम डोरा टाकीतच होती.

वसंता दर रविवारी हरे राम-हरे कृष्णा मंदिरात जायचा. तेथे त्याच्या मनाला शांती मिळे. आज काहीतरी मोठा उत्सव होता. महा प्रसाद होता दुपारी. तेव्हा तोही तेथे थांबला होता. त्या गर्दित त्याला ती अमेरिकन मॅडम दिसली. खरे तर तिचे नांव मेरी पण ती गेली २/३ वर्षे या मंदिरात येत होती हे वसंताला नंतर समजले. तीने अनुग्रह घेतला होता आणि तीचे नांव 'आनंदी' असे घेतले होते. तीने कपाळावर गंध लावले होते. सगळा होराच बदलला होता तिचा. त्याला ती

तेथे पाहून आश्चर्य वाटले. कार्यक्रम संपला, संध्याकाळचे भजन आरत्या संपल्या. आणि तो एकटाच त्याच्या कॉर्टर मधे आला. आज पूरी रात्र तो आनंदीचाच विचार करीत होता. तीने भारतीय पेहेराव घातला होता. छान दिसत होती ती. तिची नजरा नजर वसंत बरोबर झाली. आणि त्याला तेथे पाहून आश्चर्य वाटले. म्हणजे ती या संप्रदायाची फॉलोअर आहे तर. आणि तिने हिंदु धर्माचा स्वीकार केला आहे. भारतीय संस्कृतीची तीला जाण आहे. त्या रात्री तो तिचाच विचार करीत होता.

दुसऱ्या दिवशी आनंदी त्याला नासाच्या प्रयोग शाळेत भेटली. हसली, तोही हसला. असे प्रथमच होत होते. शालूकडून येतानाच्या प्रकारामुळे तो तीच्यावर कमालीचा नाराज होता. पण आता वसंताच्या मनात तीच्या बद्दल कमालीची ओढ निर्माण झाली होती. मग भेटी होत गेल्या. पण कोणीही इतर विषय छेडला नाही. आनंदीही मर्यादेने वागत होती. हा प्रकार पूढे ४ महिने चालू होता. त्या काळात त्याच मंदिरात त्याची आनंदीची भेट झाली होती आणि प्रवासही सोबतीने झाला होता. पण आनंदीने जराही आतताईपणा केला नाही. याचेच वसंताला आश्चर्य वाटत होते.

आता शालू रशियाला गेल्यामुळे ती वसंताच्या संपर्कात नव्हती. ना भेट, ना फोन, ना मेल सारेच थांबले होते. आताशा वसंताला असे वाटू लागले होते की ती जगाच्या पटीवर फिरत रहाणार आणि आपण? येथून निघालो तर करिअरची वाट लागणार. फरफट होणार आपली. भारतातही आपली किंमत काय असेल ? ही विषाची परीक्षा घ्यायला त्याचे मन आता कचरु लागले होते. त्यापेक्षा हेच इथले जीवन सुखाचे आहे. असे वाटू लागले होते. शालूच्या मागे जाऊन नाळया बरोबर गाड्याची वरात होईल. आणि पस्तावायची वेळ येईल या भीतीने तो काळजीत होता. आणि वेगळ्या पद्धतीने आपल्या करीयरचा, भविष्याचा विच्यार करीत होता. आणि याच काळात जरी त्याचे डिपार्टमेंट बदलले होते तरी आनंदी संपर्कात होतीच. आपण आनंदीचा स्वीकार कां करू नये ? असाही प्रस्ताव त्याला सतावीत होता. आणि पूढच्याच रविवारी आनंदीची भेट वसंताशी झाली. त्या दिवशी गोकुळाष्टमी होती. कृष्ण जन्माचा सोहळा होता. आणि तो संपला रात्री १ वाजता. पार्कींगची अडचण होती, शेकडो गाड्या आल्या होत्या भारतीयांच्या तो येताना ओलाने आला होता पण आनंदीने आपली गाडी आणली होती. ती पहाटे ४ पासून मंदिरात होती. कार्यक्रम

आटोपला, महा प्रसाद झाला. आणि आनंदी निघणार येवढ्यात वसंता समोर आला...

''आर यु गोईंग होम ?''

''येस् ! आय वान्ट टू कम विथ यु !''

''येस् ! वाय नॉट, इट्स  माय प्लेजर !

म्हणत दोघेही तिच्या गाडीने निघाले २०० कि.मी. चा प्रवास होता मंदिरापासून त्याच्या नासा सेंटर पर्यंतचा. दीड तासाच्या प्रवासात खूप गप्पा झाल्या. वसंता तिच्याकडे आकर्षित झाला होता. त्याने तिचा हात हातात घेतला.

''आनंदी ! आय लव यू!

तीनेही दुजोरा दिला आणि ती त्याच्या कुशीत शिरली. दोघेही हरवली होती. त्या दीड तासात ती पार हरवून गेली होती एकमेकांत.

मग मात्र दररोज भेटी होतच होत्या. वसंताने विचार केला ती अमेरिकन सिटीझन आहे आपले. ग्रीन कार्डाच प्रपोजल अजून प्रलंबित आहे. केव्हा होईल माहिती नाही. आणि जर आपण आनंदीशी लग्न केले तर ताबडतोब होईल. जीवनाचे तारु कायम किनाऱ्याला लागेल. त्याने मनाने ठरवले शालूला विसरायला हवे ती आता खूप दूर गेली आहे आणि आता तीच्या विचारातून आपल्याला वेगळ्या मार्गाने जायला हवे. तोच मार्ग सोपा व सुखदाई आहे.

आणि वसंताने त्याच आठवड्यात हरेराम-हरेकृष्ण या सांप्रदायात अनुग्रह घेतला. आनंदी सोबत होती तेव्हाच आपण लग्न करावे असे ठरवून त्या मंदिरात लग्न करावे असे ठरवून टाकले. आणि हा विवाह सोहळा पार पडला. आता आनंदीच्या उबदार प्रेम पाशात तो खूपच आनंदी होता. त्याच वेळी त्याचे Green card चे काम झाले आता तो अमेरिकन सिटीझन झाला होता. त्या दोघांचे छान चालले होते.

लग्नाला १ वर्ष होऊन गेले होते. वसंता-आनंदी यानी भारतात सुट्टीवर जाण्याचा निर्णय घेतला व तो सिझन अमेरिकेत थंडीचा होता. म्हणून भारतात यावे असे त्यांनी ठरवले. आताशा आनंदी भारतीय पेहेरावात रहात होती. तिला तो खूप आवडे. फक्त कामाची वेळ सोडून ती इतर वेळी भारतीय झाली होती. व्हाया मुंबई ती व वसंता त्यांच्या गावाला रत्नागिरीला आले. तो पर्यंत आपण लग्न केले याची वाच्यता केली नव्हती. त्याच्या लग्नाचा बाजा पूऱ्या गावात

वाजत होता. आणि त्याच वेळी शालूही एक महिन्याच्या रजेवर गावाला आली होती. वसंताने लग्न केले. हे तिला समजले. तोवर तिनेही लग्न केले नव्हते. आपल्याला झिडकारले, वसंताने लग्न केले. ही गोष्ट तिच्या मनाला खूप लागली दु:खी झाली ती. वसंताची बायको पुन: १५ दिवसात पडला निघून गेली.

शालूने लग्नासाठी आपली बदली भारतीय परराष्ट्र मंत्रालयात करून घेतली होती व येथे चार्ज घेतल्यावर एक महिन्याची रजा घेऊन ती गावाला आली होती. ती गावाला आहे हे समजल्यावर वसंताने आपला गाशा गुंडाळला व तो पुन: यू.एस.ला गेला. त्याने शालूची साधी भेटही घेतली नाही ना तीने त्याची. आणि दोन प्रेमिकांची अशी ताटातुट 'नियतीनेच' घडवून आणली होती. मोठ्या आशेने शालूने भारतात बदली करून घेतली ती लग्नाच्या इराद्याने. पण बार फुसकाच निघाला. दोन जहाजे दोन ध्रूवाकडे प्रयाण करती झाली. कायमची सगळे प्रेमाचे बंध कापून. पण दोघांच्याही मनातले प्रेम नाही विसरू शकली ती. आनंदीशी लग्न करून वसंता अमेरिकन जीवन शैलीशी एकरुप होण्याचा प्रयत्न करीत होता. ही सगळी ॲजस्टमेंट होती. पण खरे सांगू त्याचा जीव गुंतला होता तो शालू मधे बालपणातले ते हळवे, निरागस, मोरपिशी आणि निर्व्याज्य ते प्रेम हा अमृत योगच म्हणायला हवा, नाही विसरता येत हे पहिले प्रेम जीवन भर, अगदी श्वासाच्या शेवटच्या क्षणीही सोबत घेऊन जातात ते प्रेम. स्वर्गातील अमृताहूनही अविट साक्षात्कार प्रेमाचा.

पण वसंताने तो किनारा सोडला आणि भरकटला स्वार्थापायी, क्षणिक सुखाच्या मागे लागून. खरेतर त्याने पाठपुरावा करायला हवा होता. पाठलाग शालूच्या प्रेमाचा, जसा शालू करीत होती, नाईलाज म्हणून दुसरा पर्याय तिला स्वीकारावा लागला, म्हणून काय त्या प्रेमाला विसरली का ती ?

आता तर दोघांनाही या चुकीची जाणीव झाली होती, पण वेळ निघून गेली होती. पण या प्रेमाची जाणीव विसरता येणार नव्हती जीवन भर, पण दोष तरी कोणाला देणार? त्या दोघाना, त्यांच्या समोरील वातावरणाला की नियतीला जी त्याना खेळवत होती या प्रवासात. पण याला उत्तर नाही.

ती मधे मधे तिच्या दहिसरच्या घरी जायची, पण संध्याकाळी न विसरता पार्ल्याला यायची. गेले दोन दिवस ती फारच अस्वस्थ होती. आपल्या आयुष्यातला आनंद हरवला आहे. याची सतत जाणीव तिला गेले दोन दिवस होत असावी. तिच्या वागण्या, बोलण्यात जाणवत होते वसंताला. त्याने

तिच्या मनाची उकल करण्याचा प्रयत्न केला. एक दिवस गप्पा मारताना त्याने शालूला जवळ बोलावले...

"शालू ! माझे अजुनही तसेच निर्व्याज्य प्रेम आहे तुझ्यावर. आपण लग्न करू या कां? वसंता.

तिने काहीच उत्तर दिले नाही. पण मान खाली घालून आंगठ्याकडे नजर स्थिर करून बसली. वसंताने तिला जवळ घेतले. चुंबन घेतले तीचे पण तिचे शरीर, मन थंडच जाणवले वसंताला..

"ठीक आहे, नाहीतर आपण आता रहात आहोत तसेच राहू एक दुसऱ्याचे होऊन..! वसंता.

त्या दिवशी ती त्याच्या बेडरुम मधेच झोपली एखाद्या निरागस बाळा सारखी आणि सकाळी लौकर उठली. पुरी रात्र दोघेही जागे होते.

"मी दहिसरला जात आहे, आणि आज तेथे रहाणार आहे. तुम्ही उद्या दहिसरला या ! मग आपण दोघे परत येऊ ! शालू.

आणि ती निघून गेली. मला कां बोलावले आहे दहिसरला तिने? असा प्रश्न त्याला पडला होता. तो १० वा. ओलाने दहिसरला गेला... तिच्या Flat चे दार बंद होते. बेल खूपदा वाजवली पण कोणीच उघडत नव्हते. त्याने वॉचमनला विचारले ती घरी आहे की बाहेर गेली आहे.

"साहेब ! त्याना मी काल संध्याकाळी पाहिले त्यानंतर नाही ! वॉचमन.

काय करावे कळत नव्हते, त्याने आजु बाजुच्या लोकांना विचारले.

"आम्ही संध्याकाळी त्यांना पाहिले होते !" लोक.

त्याला जरा वेगळी शंका आली. त्याने वॉचमेनला सांगून पोलीस complaint केली. पोलीस १/२ तासात आले. त्या flat चा दरवाजा आतून बंद होता. तो त्यानी फोडला. तर बेडरूम मधे शालू पलंगावर झोपलेली आढळली. हातात पकडूनएक कागद, शेजारी विषाची बाटली पडली होती.

"हि आत्महत्या आहे ! पोलीस

त्यानी हातातली चिठ्ठी वाचली.

"मी आत्महत्या करीत अहे. मला जगण्यात काहीच interest नाही वसंता सॉरी ! शालू.... वसंताने हंबरडा फोडला.

सारा प्रकार उघड झाला होता.

"तुम्ही कोण !

''वसंत !.

''तुम्ही काल कोठे होतात ?''

''माझ्या घरी पार्ल्याला !.''

''येथे कधी आलात !''

''१/२ तासा पूर्वी !'' वसंत

''ही आत्महत्या या बाईने काल ७- ७।। वा. रात्री केली. त्या चिठ्ठीवर तारीख ही कालची आहे !'' पोलीस.

बॉडीचे पोस्ट मार्टेम झाले. आणि वसंतच्या हवाली तीचे शव सोपवले. तो पार गांगरला होता. शेजाऱ्यांच्या सोबतीने त्याने तिच्या पार्थीवाला अग्नी दिला.

आजवर जपलेल्या प्रेमाची इतिश्री झाली होती. पण तिच्या मनातले शल्य मात्र अनुत्तरित राहिले हे खरे !!.

हे अनुत्तरित शल्य जीवन भर त्यांना त्यांच्या पहिल्या प्रेमाची सातत्याने आठवण करून देत राहणार, ऊन पवसाच्या थपडा खात, वाटेवरच्या निखाऱ्यांची धग सहन करीत. येवढे मात्र खरे. सुख, दुःख, जेव्हा जेव्हा मनाला स्पर्शील ना तेव्हा तेव्हा प्रेमच त्याना आधार देईल जगण्याला, जीवनाची होडी बनून, साथ करीत राही, पापण्या आडच्या अश्रूना वाट करून देत, येवढे मात्र खरे.

आपली सुट्टी संपण्यापूर्वीच वसंताने पडला जाण्याची तयारी केली. आणि तिकडे प्रयाण केले. पण हे अनुत्तरित शल्य त्याला छळीत होते. येवढे खरे!

०-०-०-०

# चिपाड

भात लावणीचे दिवस होते. राजूचे आजोबा हे मोठे शेतकरी. चांगली चार खंडीची शेती ते करीत आणि त्याच्यावरच त्यांची गुजराण व्हायची. मोठा शेतकरी. पण पैशाची आवक धान्य विकूनच. त्या भात, नाचणीला तसा भावही नव्हता. पण अनंतराव सुखी होते. गावातले ते मोठे जमीनदार. तीन्ही मुली लग्न होऊन आपआपल्या घरी सुखात नांदत होत्या. कमतरता होती ती एकाद्या मुलाची. पण ती कोणाच्या हातात ? आनंदरावाना ही एकच खंत सोडली तर बाकी संसार झकास.

वाडा गुरानी भरलेला. दोन जोड्या बैल, गाई. म्हशी सारा प्रपंच कसा अगदी बैजवारच म्हणायला हवा. गावात तशी गरीबीच. हातावरचे पोट लोकांचे होते. त्या काळात म्हणजे ७०च्या दशकात कोकणात पद्दत अशी होती की कामाला येणाऱ्यांना तीन वेळ जेवण, सकाळी चहा, मग न्याहारी व दुपारी आणि संध्याकाळी पोटभर जेवण जे असेल. संध्याकाळचे जेवण बारा माणसे ताटभरून घरीच घेऊन जात. आणि मग पोरा बाळांची चंगळ. नाहीतर सुकाभात नी वर कोरड्यास बस. हेच खाणे असे पण संध्याकाळी त्यांच्याकडे जे कामाला जात त्यांचा हात जेवण देताना सुटायचा. हात आखडणे हा प्रकार तेव्हा कोकणात नव्हता. आहेरे वाल्यांना नाहीरे वाल्यांची जाणीव होती. त्या काळात मजुरी मात्र थोडी असायची.

त्याकाळात गडीमाणसे वर्षभरासाठी कामावर रहात. त्यांचे काम वर्षभर, नांगरणी, भाजवण, लावणी आणि इतर कामे काही कमी नव्हती. कधी टोपल्या वळ, डालगी वळ, हत्यारांना धार लावून आण, शिवाय गाडी असायचीच शेतीच्या कामाला आणि माणसांना कधी बाजारात, कधी जत्रेला तर मुलींना सासरी पोहचवायला, कधी त्यांना सासरहून माहेरी आणायला.

अनंतराव तसे फार श्रीमंत नव्हते. पण गरीबही नव्हते. दूधदुभत्याची चंगळ. घरात बाहेरच्या पडवीला एक तांब्याचे गाडगे झाकून ठेवलेले असायचेच. कोणीही वाटसरूने यावे, तांब्यातले ताक प्यावे. कधीकधी बारवयच्या टोकातून कातकरी येत येताना कधी ससा मारून आणित काही देत ते मोल घेत. जराही घासाघास नव्हती पण घेणाऱ्यालाही जाणिवेचे काळीज असे, मग भाकरी झुणका खाऊन आपली तिर कामटी सांभाळीत हसतमुख होऊन जात.

पण दिवस फिरले, गेले वर्षभर पावसाचे टीपूस पडले नाही. पहिल्या वर्षाच्या शिल्लक वैरणीवर जनावरे कशीतरी तग धरून होती. अनंतरावनी जंगलातून मिळेल ती झाडाची पालवी आणून तो उन्हाळा कसातरी काढला . मोठा प्रश्न होता तो पाण्याचा, चार-चार किलोमीटर अंतरावर जाऊन जनावरांना पाणी पाजायला जावे लागे रखरखत्या उन्हात. सगळी जनावरे अर्धपोटी, पाण्या शिवाय. शिवाय पीण्याच्या पाण्याची मोठी मोताद. विहिरीनी तळ गाठला होता. झरेही बारीक झाले होते. विहिरीत उतरुन वाटग्याने पाणी भरावे लागे. रात्री रात्री जागून घोटभर पाणी प्यायला मिळे. गावचे हाल कोणीही पहावयास तयार नव्हते. कामे होती तेथेच पडली होती, कामगार मिळेना ह्या संकटाने अख्खा गाव अडचणीत आला होता.

अनंतरावांच्या वाड्यात १० गुरे काय कराणार? वैरण संपली पाण्याचे दुर्भीक्ष. बिचारा पहाडासारखा माणूस पण पुरता ढेपाळला होता. त्याच्याकडे भात होते ते त्याने गरजुंना दिले. पण पाणी या प्रश्णाने त्यांच्या डोक्याचा पार भूगा झाला होता. ग्रामपंचायती पासून सरकार ही पार ढेपाळून गेले होते. भीती होतीती हा असाच दुष्काळ पडला तर? गाव सोडून जावे लागेल आणि गुराना पाठवावे लागेल खाटीक खान्यात.

बरे म्हशी, गाई विकावेत तर गिऱ्हाईक नाही, कोण घेणार ? अल्प दरातही घ्यायला कोणी तयार होईना. अहो या वर्षी राजापूरची गंगाही आटली. आणि लोकांचा धीर पार खचला.

सगळ्या गावांचाच तोच प्रश्न. आतातर मे महिना सरत आला होता. लोक आकाशाकडे डोळे लाऊन बसले होते. पण ढगांचा मागमूसही आकाशात दिसेना. एप्रिल, मे मधे अवकाळी पाऊस पडायचा. पण त्यानेही पाठ फिरवली होती. वैरणी, पाण्याअभावी गुरांची पार चिपाड झाली होती. अनंतरावांच्या वाड्यातली गुरे आशाळभूत पणे त्यांच्या तोंडाकडे पहात होती. पुढ्यात काही नव्हते, ना वैरण, ना पाणी. त्यांच्याकडे चार घाटी बैल होते. त्यांना तरी जगवायला हवे होते. जर पाऊस पडला तर... तर नांगरणीची व्यवस्था होईल. बाकी गुरे काय कामाची या कल्पनेने त्यांच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. त्यांनी आपली गाडी जोडली, गाडीत त्यांच्या आवडात पाणी पुरवण्या साठी पिंप ठेवले आणि बादली बादली पाणी देण्याची व्यवस्था केली. पण आता त्या नदीतही पाणी पिण्याच्या लायकीचे उरले नव्हते. गुरेही त्या पाण्याला तोंड लावायला

तयार नव्हती. त्यांची वासलेली तोंडे पाहून अनंतरावाना भरुन आले. आता काहीच उपाय उरला नव्हता.

सगळीकडे तिच परिस्थिती, जायचे कोठे ? पण मे जून पर्यंत तरी वाट पहावी, पाऊस पडेल या आशेने. आणि मग जर नाहीच पडला तर ? जनावरांसह घर सोडायचे. आसरा मिळेल तेथे जायचे घरात खंडीभर भात  होते. पण त्याला ना गिऱ्हाईक, ना भाव, विहिरीत हंडा दोन हंडे पाणी मिळे त्यावर पुढचे १५ दिवस कसे जाणार याच विवंचनेत अनंतराव होते. खरच देव कोपला होता. पाप वाढले होते, देवही वाली नव्हता आणि पुढे सगळा अंधकार दिसत होता. यावर्षीही पाऊस पडला नाही. आणि सगळीकडे हाहाकार माजला होता.

सरकारने पाण्याचे टँकर पाठवायचे ठरवले ४/४ दिवसानी एक टँकर येई नी माणसांना प्यायला पाणी मिळे. पण येवढ्या गुरांचे काय. त्याना १०/१५ बदल्या पाणी लागायचे. शेजारच्या नदीचे पाणीही आटले... आपली गुरे मरताना पाहणे आता अनंतरावांच्या नशिबी आले होते.

त्यानी पाहिले गावात हेडे लोक गुरे खाटीक खान्यात नेण्यासाठी येत. वाड्यात मरण्यापेक्षा डोळ्या आड तरी होतील म्हणून लोकही देत सोडून. पैशे काय चाटायचे होते? दुभत्या गाई ही त्या कळपात सोडताना डोळ्यांच्या धारा लागत  होत्या. गुरे त्या खाटिकाच्या हाती सोपवून शेतकरी वाड्याचे दरवाजे लाऊन घेत.

अनंतरावांच्या वाड्यातल्या गुरांना त्यांच्या परसातल्या विहिरीच्या पाण्यातून थोडी तग धरता येत होती. पण तीही आता अजून १५ दिवसात आटणार हे त्यानी ताडले.

उन्हे मात्र तापत. बाहेर पडता येत नव्हते. शेतीत ही पाण्याचा थेंब नसल्याने प्रचंड भेगा पडल्या होत्या. आणि नद्या नाल्यांचे, विहिरींचे झरे आटले होते. प्यायलाही पाणी मिळणे कठीण झाले होते. ज्यांच्याकडे धान्य होते ते दोन घास खात होते. पण ज्यांचे पोट हातावर त्याना कोणीच वाली नव्हता.

एक एक करीत लोक गाव सोडून जात होते, हे पाहून अनंतरावांचे काळीज पिळवटून निघे. शेवटी अनंतरावानी गाव सोडण्याचा निर्णय घेतला. गाडीत होते ते भात भरले आणि किडूकमिडून जमा करून निघाले.

त्यानी पाहिले जनावरे, माणसे अर्धपोटी राहिल्याने त्यांची पार 'चिपाडे' झाली होती. आजाराने वर मान काढली होती. गावातली वयस्कर माणसे

आजारपणात जग सोडून गेली. तरण्यांच्यातही त्राण राहिले नव्हते. सारे भविष्य अंधकारमय वाटत होते.

अनंतरावानी घर सोडण्याचा निर्णय घेतला खरा पण, जायचे कोठे? निर्णय होत नव्हता, आयुष्यभर गावाच्या पंचक्रोशीत वावर. बाहेर जाणे नाही. तालुक्याला केव्हातरी जाणे व्हायचे तेवढेच. त्यात पाण्याची व्यवस्था कोठे असेल ? याचाही पत्ता नव्हता. ते आपल्या गुरांसह हमरस्त्यावर आले. समोर पाहिले तर वैतरणा पार सुकलेली. लोकांचे तांडेच्या तांडे निघाले होते. अन्न पाण्याच्या शोधात. त्यानी डावीकडे जायचे ठरवले तर समोर सह्याद्रिचा कडा. हा पार करून वर गेल्यावर कोयना खोऱ्यात पाण्याची सोय, असे लोक म्हणू लागले. आणि सगळेजण त्या बाजूला निघाले. गुरा ढोरांसह हा पर्वत चढून जायचे म्हणजे दिव्यच. शेवटी त्यानी तेही दिव्य करायचे ठरवले आणि गुराढोरांसह निघाले.

तेव्हा कोयना धरण झाले नव्हते. कोयना कृष्णा नद्याना पाणी होते, पण ते दऱ्या खोऱ्यातून जाणाऱ्या मार्गावर, निबीड जंगल. पण तेवढीच आशा होती. कोकणातला माणूस देशावर निघाला होता. रस्त्याला ही गर्दी गुरात गुरे मिसवाडी. आपली कोणती इतरांची कोणती काही कळत नव्हते. फक्त चार बैल, पुढे दोन आणि मागे गाडीला बांधलेले दोन. ते शिरगाव पर्यंत आले. नदीच्या वरच्या अंगाला पाणी होते. सगळी गुरे घसरली पाण्यासाठी तुडुंब भरणारी नदी पार रोडावली होती. आता हे पाणीही थोड्या दिवसात आटणार अशीच चिन्हे दिसत होती.

गुरानी मनसोक्त पाणी प्यायल्यावर पुन: सगळा तांडा निघाला. कऱ्हाड कडे जाण्याऱ्या रस्त्यावर गुरे माणसांचे तांडे हळूहळू वर सरकत होते. तो डोंगर पार करायला संध्याकाळ आली. आपले कोकण सुंदर त्याचे दर्शन पर्वतांच्या पठारावरून छान विहंगम दिसत होते. कोणाला आवडेल हे सुंदर ठिकाण सोडून जायला. पण नाईलाज होता. हेळवाक पार झालेनी थंड हवा सुरु झाली. सगळे जीव सुखावले. खाली पाहिले तर कोयनाचे पात्र निळे निळे पाण्याने वळणे घेत जात होते. आपण तेथेच थांबावे. पण गावा गावातले लोक दांडे घेऊन उभे. पुढे जा ! पुढे जा ! येथे आमच्या शेतात थांबायचे नाही. आता निवारा कोठे मिळणार? पाटण ओलांडण्या पूर्वी अनंतरावांना नदीच्या पलीकडे विरळ जंगलाचा भाग त्यांच्या नजरेस पडला. पण पलीकडे जायचे कसे ? नदीचे पाणी

खोल असावे पण मुबलक होते.

ते जेव्हा नदी पार करीत होते. अनेक स्थानिक लोक म्हणाले. पलीकडच्या जंगलात पटेरी वाघ आहेत. तुमची गुरे उघड्यावर. शिवाय तुम्हालाही घर नाही. बघा बाबा. पण एकदा ठरवले की अनंतराव ऐकतात कसले ? त्यानी बैलगाडी रस्त्याच्या शेजारी लावली आणि गुरांसह नदी पार केली. पण तो भाग दलदलीचा होता झोपडी वा वाडा बांधण्यासाठी योग्य नव्हता. तेवढ्यात समोर त्या नादीवरचा पूल दिसला आणि ते पुढे सरकत गेले. वेळे नावाचे गाव आले त्यानी गावातल्या लोकांना आपली कैफियत सांगितली. ते त्यांच्या नातेवाईकांचे गाव. त्यांनी आसरा दिला नी वस्ती करायचे ठरले.

पहिली रात्र त्यानी जागून काढली मधे गुरे बाजूला म्हशी व बैल संरक्षक म्हणून. खरेतर रात्री खूप थंडी पडली. कशीतरी रात्र त्यानी काढली. आपल्या जवळची अंथरुणे वासरांच्या व रेडकांच्या अंगावर घातली. मग गावातल्या लोकांनी त्याना एक वाडा दिला व वस्तीला घराची पडवी.

कोकणात पाऊस पडला तर आम्ही गुराढोरांसह जाऊ आपल्या गावाला. तोवर आम्ही तुमच्या आसऱ्याला राहू! चालेल नां ? अनंतराव

''चालेल ना ! '' गाववाले म्हणाले.

अनंतरावांचे हळूहळू बस्तान बसले. घरची दोन म्हशी व एक गाय दुभती होती त्यांच्या दुधावर त्यांचा प्रपंच चालला होता. त्याना राहून राहून आठवण येत होती गावची आणि घरातल्या देवांची. ते त्यानी तेथेच ठेवले. एकाच आशेने आपण आज ना उद्या या गावात येऊ.

त्यानंतर २ वर्षे पाऊस पडला नाही. पण मग पुढच्या वर्षी पाऊस पडला. अगोदर सगळ्या जनावरांना तेथे न आणता फक्त बैलगाडी, दोन बैल व पत्नी यानाच त्यानी आपल्या गावात आणले. घराची डागडुजी केली. गुरांचा वाडा पार तुटला होता. तो आता पावसाळ्यात दुरुस्त करणे शक्य नव्हते. त्यानी दोन बैलांची व्यवस्था घराच्या पडवीत केली. बी-बीयाणांची व्यवस्था केली व थोडी शेती करण्याचे ठरवले.

हेळवाकला गुरांची व्यवस्था लाऊन दूधदुभते विकण्यासाठी एक गडी ठेवला व ते निश्चिंत झाले.

पण नजर मात्र घाट माथ्यावरच्या उरलेल्या गावकऱ्यांवरच होती. ते तेथे स्थिर झाले. कोकणी माणूस मुळात मायाळू तो रमला घाटावर आणि घाटी

झाला. शेतीत, दूधदुभते आणि मुबलक पाणी यानी सुखावला नी विसरला कोकणाला. पण अनंतरावानी जपले आपले कोकणीपण ते तेथेच गावात स्थिरावले पाऊस पडत होता. सगळी कडे हिरवळ, मुबलक पाणी आता कोयनाच्या धरणाचे ही पाणी आले. पण... पण जे गेले घाटावर ते काही यायला तयार नव्हते. कारण त्या काळातले 'चिपाड' त्यानी अनुभवले होते. पण अनंतरावानी आपले ब्रीद, कोकणीपण जपले येवढे मात्र खरे !!

०–०–०–०

# वादळी वाट

''तू कबूल केले होते तेव्हा, मी तुला साथ देत राहीन, प्रपंचाच्या वाटचालीत ! लग्ना आधी!'' अरुण.

''हो ! हे खरे आहे ! पण प्रेम आणि प्रपंच या दोघात जमीन अस्मानाचा फरक आहे, तुम्ही होतात नशेत, पण मी जागी होते या वाटचालीत आणि जाणून होते भविष्यातली वादळाची वाट !'' रजू.

''आहे मला कल्पना ! पण थोडे जमवून नको का घ्यायला करोनाच्या संकटात. ! अरुण.

''कसे जमवून घेणार ? जगाच्या व्यवहारात फक्त आणि फक्त पैसाच कामाला येतो, प्रेम नाही! ते विरून फिक्कट होते हे कसे कळत नाही तुम्हाला!'' रजू.

''कळतय, पण मी तरी काय करू! नोकरी सुटली हा काय माझा दोष, सांग ? अरुण.

''पण मग शोधाना नोकरी, घरचा खर्च, पोरांचा खर्च, जीव मेटाकुटीला आलाय, दोन टोके जोडताना !'' रजू.

आणि मग वादळापूर्वीची शांतता पसरली. घराच्या चार भिंतीत प्रेमविवाह असो वा अरेंज मॅरेज तसा फरक नसतो. मने जुळतात. पण सारे काही सुरळीत होईल याची काहीच शक्यता नसते. भविष्य आपल्या परीने सोंगट्या टाकत रहाते आणि त्या चक्रव्युहात आपण मात्र पावला पावलावर फसत जातो. कधी निसटतो त्यातून, तर कधी, मार्ग नाही सापडत. घराच्या भिंतीना भगदाडे पडतात आणि नाकीनऊ येते बुजवताना.

सहाच वर्षे झाली अरुण आणि रजूच्या लग्नाला. त्यात दोन मुले झाली. रहायला चार भिंतीचे घर होते खूप आनंदात सरकत होते दिवस नी मनाला फूटले कोंब. मोठी जागा, सारे काही हाय फाय. जोवर पैशाचा पाऊस पडत होता तोवर सारे सुरळीत चालले होते नी कोरोनाच्या धक्क्याने जागतिक अर्थकरणाच्या भिंती कोलमडून पडल्या, पार धुळीला मिळाल्या. सहा महिने झाले तरी कंपन्या सुरु होईनात. लॉक डाऊनचा काळ पुनः पुनः सरकार वाढवित रहात होते, नी अरूणचा पगारही अर्ध्यावर आला. तीच अवस्था रजूची, घरभाडे. दूध, रेशन, इलेक्ट्रीक बील सारे काही संपवीत होते. येणारा पैसा नी बँकेतली रक्कमही आटत

होती दिवसा दिवसाने आणि धीर सुटत होता त्या दोघांचा.

प्रपंच हा बायकांचा प्रांत, साऱ्या गोष्टी डोळ्यासमोर घडत रहातात आणि त्याचे चटके बायकाना बसतात. सगळ्या धोक्यांची सूचना बायकांच्या डोळ्यात प्रथम दिसते. आणि तिचा धीर खचत जातो. कधी कधी ती कोलमडून पडते, सगळी स्वप्नेही स्वप्नेच रहातात, त्याची तिला खंत वाटत रहाते.

कोरोना हे आताचे संकट, पण या पूर्वी आपल्या पंखात हवा भरताना थोडा विचार व्हायला हवा होता. बायकाच नाही, दोघांचेही चूकते. आपल्याला झेपेल तेवढेच, म्हणजे आटोक्यात ठेवावेत आपल्या गरजांची जाळी, नाहीतर त्याच जाळ्यात माणूस अडकत जातो. खरेतर पैसा हाच खरा मित्र, सखा असतो सदासर्व काळ, आणि म्हणून त्याचीही इज्जत करायला हवी आपण. नाही तर तोच आपली लक्तरे वेशीवर टांगतो. पण हे कळते तोच शहाणा.

अरूण, रजूच्या स्वप्नांचे दोर लांब लांब होत गेले आणि बूरुज ढासळू लागले. अकाली प्रपंचही वादळाची वाट आहे ते त्याना माहिती नव्हते. पण जेव्हा एक एक पाऊला खालची माती सरकते आहे तेव्हा तरी त्यानी सावध व्हायला हवे होते. काळाने सारीच क्षितिजे काळवंडून टाकली होती कोरोनाने नी डोळ्या समोर अंधारी आली.

आता तर दोघांमधले बोलणे ही बंद होत गेले होते. समोरून आलीतरी बोलत नव्हती ती आणि दोन अजाण पोरे ती चिडीचूप होऊन बसत होती. त्याना जाणवत असावा घरातला हरवलेला हास्याचा फवारा. मनाचा कोंडमारा होत होता त्यांच्या.  खेळणे, हासणे त्या दोन जाणीवांचेही अरूण-रजूला पहावत नव्हते. कारण कोरोनाच्या अस्मानी संकटाने हजारो प्रपंच कोलमडून गेले होते. श्रीमंतांचा प्रश्न नव्हता दूभती गाय दूध देत होती त्यांच्या घरात, पण मध्यम वर्गच ढेपाळून गेला होता. त्यात गरीब ज्याचे पोट हातावरचे आहे. मुंबापूरीतल्या छोट्या मोठ्या प्रकल्पावर रोजंदारीवर काम करीत आहेत त्याना कोणीच वाली नव्हता. त्या कामगारांना बाहेरचा रस्ता शेठमंडळीनी दाखवला. आणि ती बिचारी रस्त्यावर आली. रस्तो रस्ती रात्री काढल्या पण किती वेळ ? मग गावाकडे पाऊले वळली. उपाशी पोटी पायपीट करीत.

काळ तसा कठीण सगळ्यानाच, त्याने ना श्रीमंत ना गरीब कोणालाच सोडले नव्हते . सगळेच एकाच बोटीतून प्रवास करीत होते. प्रलयच तो होता. कोरोनाच्या महामारीचा मगर गिळीत जात होता. मुक्यांचे जीव बेवारस अवस्थेत

माणसांची अवस्था तीच बघा रस्त्यावरच्या बेवारस प्राण्यांची, तर हाल विचारायला नको. सरकार गरीबांना अन्न देई, पण प्राण्यांची व्यवस्था काय ? कोणीच वाली नव्हता या मुक्याना.

काळ कधी तसाच रहात नाही त्यालाही मन असतेच ना. केव्हाना केव्हा त्याचेही मन द्रवेल, या आशेवर एक एक जीव दिवसानी दिवस ढकलीत होता. अरूणची इमारत तशी काही श्रीमंत नी मध्यम वर्गीयांची. मध्यमवर्गीयांची अवस्था बिकट होत चालली होती. झेपत नाही तरी ही सोन्याची सळी त्यानी गळ्यात बांधून घेतली होती. काळाच्या ओघात पण कोरोनाच्या धोंडेने सारेच दरवाजे बंद केले होते.

आज ना उद्या हा लॉक डाऊन सरेल. कंपन्या चालू होतील या आशेवर प्रत्येक जण एक एक दिवस पुढे ढकलीत होता. त्यात टीव्ही वरच्या बातम्या ऐकून मृत्यू आपल्या दारावरच आला आहे असा भास प्रत्येकाला होत होता. दूध, अन्न नी सगळ्या वस्तुंचा तुटवडा झाला होता. आणि ज्यांची आर्थिक कोंडी झाली होती त्यांना ते काहीही घ्यायला हातात दाम नव्हता.

सगळी नाटके करता येतात माणसाला, पण पैशाचे नाही. त्यात भिती होती कोरोना विषाणू. तो कधी कोणाला ग्रासेल, युरोप, यु.एस्, मधल्या बातम्या श्रीमंत, गरीबांना सरख्याच अस्वस्थ करीत होते. आपल्याकडे तशी परिस्थिती ठीक म्हणजे आटोक्यात होती पण, झोपडपट्टयात कोरोना घूसला नी वस्तुस्थिती झपाट्याने बदलत गेली. ती धास्ती सगळ्यांनाच सतावीत होती, कधी घुसेल आपल्या घरात यामुळे तोंडावरचे हसूही कोमेजून गेले होते.

अरूण-रजू पार धास्तावून गेले होते. मुंबईत चारीही बाजुंनी सर्वांची कोंडी झाली होती आणि लॉक डाऊन उठेल याचीही चिन्हे दिसत होती. पंधरा दिवसाचा लॉकडाऊन सरण्या आधीच पुढच्या तीन आठवड्याची घोषणा व्हायची, नी जीव अस्वस्थ होऊन गेला होता त्यांचा. त्यात दोघांच्या कंपन्या बंद झालेल्या, भले काही काळासाठी पण कधी सुरु होणार याची तलवार डोक्यावर लटकत होती. रात्र रात्र झोप लागेना. आपल्या पश्चात या चिमुकल्यांचे काय? या धास्तीने ती अधिकच अस्वस्थ होत होती.

घरातल्या कामाचा भार रजूवर पडला होता. दिवस भराच्या श्रमाने ती संध्याकाळी मोडून पडायची. खरच तिच्यात त्राण नसायचे अरूणसाठी, क्षणभर बोलायलाही, गेले काही दिवस कमालीचा अशक्तपणा आला होता तिच्यात.

पोरे गोचडासारखी चिटकत मायेने पण तीही नकोशी वाटायची. अवेळी दिवसें दिवस अरूण आणि तिच्या मधला सौहार्दाचा भाग पार रुसत चालला होता. तीला हे जाणवत होते पण तोंडातून शब्दही बाहेर येईनात. दिवस रुसल्यासारखे झाले होते. आणि घराची रया गेली होती.

प्रेमाच्या रंगात असताना लग्नाचा विचारही तिच्या मनात येत नव्हता. एकटाजीव सदाशीव पण नियतीला हे मान्य नसावे आणि लग्नाच्या गाठी बांधल्या गेल्या तिच्या मना विरुद्ध. निर्सगाची करामत त्याने दाखविली, दोन पोरांना पदरात टाकून. सारा भूतकाळ आता तिच्या मनाशी खेळत होता नी ती मिनिटा मिनिटाला अस्वस्थ होत होती. स्वतःची, नवऱ्याची आणि मुलांची काळजी तिला भेडसावीत होती ती बाहेरच्या महामारीच्या आठवणीने.

घराच्या बाहेर गॅलरीतून वाकून पहावे तर चिटपाकरुही दिसत नव्हते. पूरती अवकळा आली होती येवढ्या सुंदर परिसराला. संपूर्ण दिवस कोंडून आपण आणि दोन चिमुकले जीव. डोके काम करेनासे झाले होते. झुगारून द्यावी ही सारी बंधने नी मोकळा श्वास घेण्यासाठी पडावे बाहेर, तर कोरोना आ वासून उभा दरवाज्यात, त्याच पावली परत यावे लागे, दरवाजा बंद करून.

या गेल्या दीड वर्षात बाहेरची दिशा कोणती, वार कोणता, तारीख कोणती याचे भान नव्हते कोणालाच, आला दिवस सुरू व्हायचा सुर्योदयाला नी पश्चिमेला मायुस मनाने मावळायचा. त्यात आज कहर झाला. पुढचे तीन दिवस कडेकोट लॉक डाऊनची बातमी, दुधवालाही नाही फिरकला आता ? एका मुलाला दुधाशिवाय काहीच देत नव्हती ती. त्याचे काय? डोके भणाणून गेले. थोडे दूध होते पातेल्यात, ते तिने त्याच्या पुढ्यात ठेवले, आणि काहीतरी पुटपुटली. नवऱ्याने ऐकले असावे. धाडकन दार उघडून त्याने धाव घेतली खाली नी सिक्युरिटीला टाळून डेरी गाठली. दरवाजा बंद होता. पण किलकिल्या नजरेने त्याने पाहिले तर मागचा दरवाजा उघडा नी लोक दूध घेऊन जात होते. त्यानेही तेच केले, नी लपत छपत घर गाठले. पोलीस, वॉचमन यांना घाबरणारा तो, पण कोण जाणे कुठली हिम्मत आली त्याला ? तोडून टाकायला हवीत सगळी बंधने मनाचीही नी काहीतरी धडपड करायला हवी नोकरीसाठी आणि मग दिवसभर तो भराभर मेल करीत होता.

चांगला रिस्पॉन्स मिळाला. आशेचा किरण मनात डोकावला नी मरगळलेला तो फिनीक्स पक्षासारख पंख विस्फारून झेप घेताना दिसला रजूला.

तो कालचा नव्हता... आजचा त्याचा अवतार वेगळाच होता. आज त्याने मुलांना जवळ घेतले, बोलला, खेळला, तीही सुखावली. त्याच्यातला बदल तिला आज पावला पावला वर जाणवत होता. आपल्या गाड्याचे एक चाक जरी फिरले तर... तर जिवंतपणा जाणवेल या घरात. आणि आज तिच्यातही कमालीचा उत्साह वाटत होता. घरातल्या बदललेल्या वातावरणाने.

खरच या कोरोनाच्या महामारीने तिची परीक्षाच घेतली होती. कोमेजून गेले होते घर; नी साऱ्या वस्तु निर्जीव वाटत होत्या. पण आज त्यांच्यात जीव आहे याची जाणीव तिला झाली. भराभर सगळी कामे आटोपली तिने आणि गेले १५ दिवस बंद असलेला टीव्ही चालू केला. देशभरात फारसा फरक नव्हता. पण त्यांच्या मुंबईच्या उपनगराला ग्रीन झोनमधे टाकल्याने काही व्यवसाय, कारखाने, कार्यालये सुरू झाली म्हणजे उद्या आपली कंपनी सुरू होणार ही आशादायी बातमी तीने ऐकली लॉक डाऊन उठण्यची नी अरूणला तिने हाक मारली. गेले २०/२५ दिवसातला तो अबोला संपला नी त्याने 'ओ' दिली.

''अहो ! ऐकलेत कां? तुमची कंपनी उद्यापासून चालू होणार. तुम्ही सकाळीच ऑफिस गाठा. म्हणे त्या परिसरातल्याच लोकांना रोजगाराची संधी आहे....!'' रजू.

''हो मला आताच आमच्या मॅनेजरचा फोन आला होता. सकाळी बोलावले आहे. मला बढती देऊन शिफ्ट इन चार्ज केला आहे!'' अरुण.

''छान, एकदाची ही 'वादळाची वाट' आता शांत झाल्याचे जाणवत आहे मला देव पावला''! रजू.

आणि कित्येक दिवसात बासणात बांधलेले देव तीने बाहेर काढले. छानशी पूजा केली नी हात जोडले थॅक्स म्हणत आता कोरोनाचे वादळ शमले होते....!!.

०-०-०

# जे सांगायचे राहून गेले ते !

परवा ती गेल्याची बातमी आली आणि जयंत हादरुनच गेला. अनपेक्षीत पण तिचे हे जाणे म्हणजे त्याच्या आयुष्यातले एक पान फाडून टाकण्यासारखे होते. तिला झाला होता असाध्य आजार, ज्यातून ती बाहेर येण्याची शक्यताच नव्हती. आजार संपूर्ण शरीरभर पसरला होता. हे तिलाही माहिती नव्हते. ते निदान खूप उशीरा झाले.

एक महिन्यापूर्वी त्याचे तिच्याशी शेवटचे बोलणे झाले. तेव्हा ती गावी रत्नागिरीला होती. तिला तिच्या आजाराचा अंदाज आला नाही. शिवाय डॉक्टरानाही. तिला वेदना होत होत्या त्या ती बोलली. औषधे चालू आहेत. ती आजाराच्या साईड इफेक्टवर. पण मुळच्या आजाराचा डॉक्टरांनाही प्रथम अंदाज नव्हता. पण तीची सोनेग्राफी झाली आणि सगळे चित्रच स्पष्ट झाले. आणि येथे उपाय होणे कठीण म्हणून मुंबईला नेणे उत्तम. असा सल्ला डॉक्टरानी दिला. खरे तर त्यांना सारे कळले होते. पण नाही कल्पना दिली कुटुंबियाना.

तिचे आणि जयंताचे शेवटचे बोलणे झाले तेव्हा ती रत्नागिरीला होती. खूप बोलली त्याच्या जवळ. तिला तिच्या आयुष्याच्या वाटचाली बद्दल लिहायचे आहे, येवढेच ती बोलली. म्हणजे ती आता बरी होणार. तिचे आयुष्यच चढउताराचे, संघर्षाचे, दु:ख वेदना यानी भरलेले होते हे तो ऐकून होता. पण झाकलेल्या मुठीतले सारे फक्त तिला आणि तिलाच ज्ञात होते. येवढे मात्र खरे. ती आपल्या जगण्या विषयी खूप आशावादी होती. कसली कसली म्हणून तिला आवड नव्हती, फूले रंगीबेरंगी तिचा जीव होता. झाडात, निसर्गात ती आपल्या आयुष्यतले उणेपण विसरून जायची आणि आतली वेदना कोणालाच कधी नाही दाखविली तिने. मुळात ती एक शिक्षिका होती. मुलांमधे ती रमून जायची. शाळेत आणि घरातही. घराचे गोकुळ करायचे, जगायचे ते त्यांच्या साठी यासाठी ती सतत प्रयत्नशील असायची.

तिच्या दु:खाचे सावट वेगळेच होते. नको नको म्हणताना तिच्या गर्भात दोन मुली नंतर रमेश वाढत होता. मार्च महिना होता तो. शाळेच्या परीक्षा चालू होत्या. तिने बाळंतपणाची रजा न घेता तशाच अवस्थेत पेपर सेटींग, तपासणे इ. कामे सुरू ठेवली होती. इतर शिक्षक, कर्मचारी सारेच काम तिच्या खांद्यावर होते. खाण्यात हलगर्जीपणा, औषधांकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आणि मुलगा झाला

तो ही कमजोर. त्याच्या मंद हालचाली वरुन तिला त्याच्या भविष्याची चिंता वाटत होती. आणि कालांतराने ते खरे ठरले. तो मंदबुद्धी नव्हता पण, नेहमीच्या खेळात, अभ्यासात, त्याची प्रगती इतर मुलांसारखी नव्हती आणि ५वी नंतर तो इतर मुलांच्या मनाने स्पर्धेत मागे पडला तो कायमचा.

हे मूल नको म्हणून तिने खूप प्रयत्न केले पण नवरा मात्र आग्रही होता. आणि पुढच्या सगळ्या तिच्या जगण्याला फार मोठा अडथळा आला. जगणे कठीण झाले तिच्या त्या मुलाच्या ओझ्यामुळे. ते ओझेच होते जेव्हा त्याचे बालपण शापासारखे वाटले होते तिला. पण नवरा मात्र ढम्म. नोकरी सांभाळून कसेबसे ९ वी पर्यंत मुलाचे शिक्षण झाले पण पुढे काय ? मोठा यक्ष प्रश्न तिच्या पुढे होता. आणि तेच अनुभवाला आले. त्याला नोकरी लागेल अशी शक्यता कमी, कोठे तरी स्टॉल, हँडीकॅप म्हणून मिळेल तेही जमले नाही. त्याचे वाढते वय आणि शेवटी तो पुरुष होता. या साऱ्या अडचणीना तोंड देता देता तिचा जीव खाली वर होत होता. याचे सगळे पाप, श्रेय, तिच्या शिरावर होते. आणि तिने ते स्वीकारले होते.

तिचा नोकरीचा काळही तसा खडतरच मुंबई–वाशी. वाशी–मुंबई दररोजचा प्रवास. सकाळी उठून जेवण करणे, दुपारी येणे ही सारी कसरत तिलाच करावी लागत होती. ती एकाकी होती, मुली होत्या त्या त्यांच्या नोकरी धंद्यात... लग्न झाली नी सगळा भार तिच्यावर पडला.

तिच्या जाण्याने तिच्या अनेक आठवणी आता जयंतला सतावीत आहेत. कारण गेली सहा दशके तिचा त्याच्याशी संपर्क होता. अगदी लहान पणा पासून. वाढत्या वयात अनेक वळण घेत आयुष्य पुढे जात असते, आणि काही अंशी संपर्क तूटतोही पण तो पूर्णपणे पूसला जात नाही येवढे मात्र खरे.

तिच्या आणि जयंतच्या लहानपणी ते एकत्र म्हणजे एकाच इमारतीत एकाच माळ्यावर रहात होतो. तेव्हा माळ्यावरच्या सर्व मुलांना दिवाळीत सर्व मुली ओवाळीत असत. तो एक वेगळाच आनंद असे. ती तेव्हा असेल ६/७ वर्षाची आणि जयंता १२/१३ वर्षाचा. तशी काळी सावळी, सुमार दिसणारी. पण स्वभावाणे छान, प्रेमळ होती ती. जयंताला तिच्या बद्दल आकर्षण फार होते. कारण दुपारी मी घरी येई शाळेतून, त्या वेळी ही खेळत असायची.

''दादा आलास ! आता जेऊन घे !'' हा तिचा दररोजचा घोशा असायचा. कधी दप्तराची बदी ओढत ती मागे मागे येई दुडदुडत. पुढे जेव्हा ती मोठी झाली

दिवाळीत भाऊबीज होतच असे. आता थोडी मोठी झाली तरी खट्याळपणा गेला नव्हता. आम्ही घरात प्लंचेट खेळत असू. त्यावेळी त्याचे प्रचंड अप्रुप होते सगळ्यांना. पण जेव्हा त्याचा खरेपणा समजले, तो त्या पासून दूर झालो. पण खेळाचा मोह टळता येत नव्हता. तिची प्राथमिक शाळा संपल्यावर ती नवभारत हायस्कूल मधे जाऊ लागली आणि तिथूनच तिच्या पुढच्या आयुष्याला वाळवंट करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

का कोण जाणे पण जयंतला तिच्याबद्दल एका वेगळ्याच भावनेने पछाडलेले होते. खूप आवडायला लागली होती पण तो ते काही व्यक्त करू शकला नाही. भिडस्त स्वभावामुळे. तिला त्याच्या बद्दल ही आदर होता. पण तसे आकर्षण नव्हते. कारण आम्ही भावंडासारखे रहात होतो. माझ्या मनात मात्र मोठा गोंधळ झालेला तो अनुभवत होतो. तो कधी आपल्या भावना व्यक्त करू शकला नाही! सांगू तिचे ते वय नव्हते जाणून घेण्याचे. आणि इतकी घाई त्याने का करावी? अजून घोडा मैदान लांब होते ना म्हणून. पण तेवढ्यात घात झाला ती एका शाळेतल्या थोराड मुलाच्या आहारी गेली. आणि गेली पळून हे समजताच त्याने त्याच्या भावनाना मुरड घातली. पण ती भावना त्याला अजून पर्यंत दाबून ठेवावी लागली. हे ही प्रांजळ पणे सांगतो. तो ती गेली त्याच आजारपणात. पण तिच्या बालपणापासून तरुणपणापर्यंतच्या सगळ्या आठवणी जयंता विसरु शकला नाही.

आता सारे संपले होते, पण मनाच्या अंतरमनात दाबून ठेवलेले शल्य जयंताला अजून सतावीत आहे. एवढे मात्र खरे.

ती गेल्याला आता १० वर्षे झाली पण नाही पूसता आला मनातला तो उमलणारा प्रेमाचा कोंब सुकून गेला तरी.

०-०-०-०-०

# कोरोना असर !

''माझा निर्णय झालेला आहे ! मी तुमच्या घरी अजून वर्षभर तरी पाऊल ठेवणार नाही. मी बाळंतपणाला आले. छान बाळाला जन्म दिला, माझ्या माहेरच्यांनी बारसे केले पण तुमच्याकडचे कोणीच फिरकले नाही. मी कां म्हणून यावे? बर तुम्हाला कोरोना झाला हे कळवले पण नाही. तुम्ही बरे झाला सांगताय, पण माझ्या बाळाची काळजी मला आहे. त्याला सध्या तरी तुमचा स्पर्श नको आहे, ना तुमच्या घरच्यांचा ! आपण आल्या पावली परत जा !'' कुंदा.

तावातावाने कुंदा आपल्या नवऱ्याला प्रशांतला सांगत होती. साधा चहाही तिने पाजला नाही न जाणे कोरोनाचा विषाणू आला तर ? मी माझे बाळ येथे सुरक्षित आहोत. शेकड्याने लोक पटापट मरतायत. बरे होऊन आलेल्यानाही पुन्हा लागण होते आहे. म्हणून कुंदा इतकी कठोर झाली होती. हे जरी माणूसकीला धरुन नसले तरी... तिचे बोलणे आपल्याला स्वीकारावे लागेल.

''अग बाळाला लांबून तरी दाखव !'' प्रशांत.

''नाही ! '' कुंदा.

''असे नको करू ! लांबूनच दाखव. मी मास्क लावला आहे ! अगदी लांबून त्याला दाखव. इतकी निष्ठूर होऊ नकोस! शेवटी मी त्याचा बाप आहे !'' प्रशांत.

''हो! पण लांबूनच हाताचा स्पर्श करू नका, अगदी लांबून, तुमचे श्वासही रोखून धरा हवे तर, पण जवळ जराही येऊ नका !'' कुंदा.

तिने बाळाला आणले आणि लांबूनच तिने त्याचे मुख दर्शन घडवले.

खरेतर प्रशांत दोन वेळा के.ई.एम.मध्ये ॲडमीट होता कोरोना वॉर्डात. प्रथम त्याचा रिपोर्ट निगेटीव्हा आला म्हणून तो घरी आला पण पुन्हा दोन आठवड्याने त्रास होऊ लागला म्हणून कस्तुरबाला त्याला ॲडमीट केले. तिथली व्यवस्था त्याच्यासारख्या सुशिक्षीत तरूणाला मुळीच आवडली नाही. खरेतर आवडी निवडीचा प्रश्नच नव्हता. जिथे जागा असेल तेथे रोग्यांना ॲडमीट केले जात होते. त्या बातम्या कुंदा टी.व्ही.वर ऐकत होती. प्रशांत बरा झाला असे तिला समजले, पण महिना भर तो फिरकला नाही. १४ दिवसांचा कोरंटाईन संपल्यावरही. निदान त्याने फोन तरी करायला हवा होता पण त्याने पार पाठ

फिरवली तिच्याकडे. कोरोनाचे कारण होते हे मान्य पण फोन करायला काय हरकत होती ?

गेले ३ महिने प्रशांत हॉस्पीटल आणि घरीच होता. त्याचे ऑनलाईन कामही बंद होते. कदाचित कंपनी कामावरुन काढूनही टाकील या विवंचनेत तो होता. कुंदा सरकारी खात्यात तीने अजून एक वर्षाची रजा मुलाच्या देखभालीसाठी घेतली. तिने आता सासरी न जाता येथे माहेरीच रहाणे पसंत केले. तिच्या आणि मुलाच्या सुरक्षिततेसाठी. त्यात सासरचे घर लहान. दोन बेडरुम किचनचे म्हणजे मुलाला वेगळे ठेवता येणे शक्य नव्हते. शिवाय प्रशांत पासून निदान सहा महिने तरी दूर रहाणे जरुर होते. पण प्रशांत काही ऐकायला तयार नव्हता.

''मग तू कधी येणार ? मी न्यायला आलो होतो ! पुन: कधी येऊ ते सांग!'' प्रशांत.

कुंदाने हे त्याचे बोलणे ऐकून घेतले पण चकार शब्दही उच्चारला नाही. आणि ती त्याच्या समोरुन घरात परतली. आजच्या कुंदाच्या वागण्याने प्रशांतचा चेहरा पार उतरला होता. सहा सात महिन्यात बायकोची भेट नाही शिवाय कोरोनाचे संकट. त्यानंतर झाले ते लॉकडाऊन.

खरे तर नवऱ्याच्या अशा अवस्थेमुळे कुंदाला असुरक्षित वाटणे सहाजिकच होते. पण तो जराही समजून घ्यायला तयार नव्हता. आणि म्हणूनच दोघांची तोंडे वाजली. आपल्या सासुरवाडीत जाऊन अशी वागणूक याचाच प्रशांतला राग आला होता. पण त्याने आपल्या स्वभावाला मुरड घातली. कोरोनामुळेच हा प्रसंग ओढवला होता. आज मात्र तो मनात खजील झाला होता आणि तशा अवस्थेत त्याने घर गाठले.

''अरे प्रशांत, बाळाला नाही आणलेस ?''आई

''नाही ! ती यायला तयार नाही. माझ्या  कोरोना मुळे कुंदाला असुरक्षित वाटते येथे येणे तिच्या आणि मुलाच्या बाबत. तिने साफ सांगितलेय मी वर्षभर नाही येणार म्हणून !'' प्रशांत.

''मग तू काय बोललास ?'' आई

''काय बोलणार ! ते सासरचे घर, मी काहीच न बोलता परत आलो.'' प्रशांत.

''बरे! बाळाला पाहिलेस कां ?''

''हो ! पण लांबूनच ! अस्पृशासारखी वागणूक दिली मला तिने !'' प्रशांत

''असु दे ! अरे पण बाळ कसे आहे !'' आई.

''असेल छान मी नाही निट पाहिले. मैलावरुन कसे दिसेल ते ! तिला त्याला स्पर्श नको होता. ना श्वासाचा, सहवास ना नजरेची आतुरता माझ्या आई ! नाही पाहू शकलो त्याला. तो माझा नव्हता कां ? हे तीचे वागणे नाही आवडले मला आई ! मी खरेच अस्पृश्य आहे काय ? की, कोरोनाने मला ही शिक्षा दिली. अग मी आता बरा झालो आहे. सगळे रिपोर्ट निगेटीव्ह आले आहेत, मग माझ्यात दोष तो काय ?'' प्रशांत.

त्याच्या भाऊक बोलण्याने आईही भाऊक झाली. आपले मूल पहायला मिळू नये, त्याला स्पर्श करु नये असे काय पाप केले आहे हा प्रताप त्या कोरोनाचा नां ?

घरी आल्यावर तो थोडा शांत झाला. त्या दिवशी तो ऑफिसलाही गेला नाही. पण काल जी.एम.चा फोन आला आणि काहीही करून जायला हवे असे त्याला वाटू लागले. आणि त्याने गाडी स्टार्ट केली. गेले दोन महिने तो गावाला गेला नव्हता. एक महिना लॉकडाऊन आणि नंतर हॉस्पीटल आणि कॉरंटाईन. आज दोन महिन्याने तो ऑफिसला जात होता. तो फायनांस मॅनेजर होता आणि सगळा आर्थिक व्यवहार तोच सांभाळीत होता. ऑडीट सुरु होते बऱ्याच शंका सी.ए.ला होत्या, त्यांची उत्तरे त्याच्या कंपनीच्या सी.ए.ला त्याला द्यायची होती.

कंपनीच्या गेटवर येताच वॉचमनने त्याला अडविले.

''साहेब तुमची गाडी कंपाऊंडमध्ये घ्यायची नाही. पूढचे १५ दिवस असे जी.एम.ने सांगीतले आहे. कृपया आपली गाडी कंपाऊंडच्या बाहेर उभी करा! '' म्हणत त्याने सलाम ठोकला. वॉचमन.

प्रशांतला प्रश्न पडला कां अशी ऑर्डर मॅनेजरने दिली होती. कां अशी तुच्छतेची वागणूक. कोरोना मुळे तर नाही. क्षणभर गाडी बाहेर उभी करून तो गाडीतच बसून राहिला आणि मग चालत गेट मधून आत येताना वॉचमनने हातावर लिक्वीड टाकले व त्याची बॅगही वॉचमनने त्या केमीकलने पूसली.

'' थॅंक्यू सर ! ही तूमची बॅग घ्या !'' म्हणत त्याने पुन: एक सलाम ठोकला.

''साहेब... गेले दोन महिने हीच पद्धत कंपनीत आहे कोरोनापासून जपण्यासाठी आपल्या स्टाफला आणि कामगारांना. त्यात तुम्हाला कोरोना + होता म्हणून ही काळजी. साहेब ! वाईट वाटून घेऊ नका !'' वॉचमन

प्रशांत ऑफिसच्या इमारतीत आला तर तिथल्या प्यूनने त्याला बूट उतरायला लावले. व तिथल्या सपाता घालायला दिल्या.

''चला ! साहेब तुमची मी केव्हाची वाट पहात होतो. अगोदर हा मास लावा. मी तुम्हाला तुमची कॅबीन दाखवतो !'' शिपाई.

''मला माहिती आहे की ! तु जा !'' प्रशांत.

''नाही साहेब, आपल्यासाठी वेगळी कॅबीन खाली बेसमेंट मधे केली आहे तेथे आज पासून बसावे असे जी.एम. ने सांगीतले आहे! तेव्हा कृपया बेसीमेंट मधे चला !'' शिपाई.

प्रशांतला आश्चर्य वाटले आणि वाईटही. गोडाऊनमधली कोंदट हवेची, एसी नसलेली कॅबीन पॅकर वापरीत असत. ती त्याच्यासाठी साफसुफ करुन ठेवली होती कालच. येथेच बसून त्याला आता काही दिवस काम करावे लागणार होते. त्या कॅबीनमधे फक्त एक इंटरकॉम होता बाकी काहीच सोई नव्हत्या.

''साहेब तुमचा लॅपटॉप मी घेऊन येतो तुमच्या कॅबीन मधून. ती कॅबीन गेले दोन मोहिने बंद आहे साहेब. त्यातले काही लागले तर सांगा मला मी आणून देईन!'' शिपाई.

''मी माझ्या कॅबीन मधे कधी जाणार?'' प्रशांत.

''जी.एम. सांगतील तेव्हाच !'' शिपाई.

''असे कां?'' प्रशांत.

''साहेब तुम्ही कोरोनाग्रस्त म्हणून !'' शिपाई.

''म्हणून ?''

''हो साहेब ! आपल्या सेल्स मॅनेजर दामले बाईही बाजूच्या कॅबीनमधे आहेत ! त्याही आज येणार आहेत ! पण तुम्ही त्यांच्या कॅबीनमधे जायचे नाही!'' शिपाई.

''कां बरे !''

''साहेब त्यांचा अजून रिपोर्ट यायचा बाकी आहे. क्लोजींग स्टॉकसाठी त्या आज आणि उद्या दोन दिवस येणार आहेत. त्या पॉझीटीव्ह होत्या. बऱ्या झाल्या आहेत पण कॉरंटाईन झाल्या आहेत. ऑफिसची गरज म्हणून त्या येणार आहेत.!'' शिपाई.

''बरे ! मला चहा घेऊन ये !'' प्रशांत.

''होय साहेब !'' शिपाई. आणि तो निघून गेला. त्याने येताना प्लॅस्टीकच्या कपातून चहा आणला. तो पाहून प्रशांत वैतागला...

''चहा ट्रे मधून कां नाही ?'' प्रशांत.

''साहेब जी.एम.ची तशी ऑर्डर आहे तुमचा स्पर्श त्या ट्रेला वा कपांना नको. आणखी कोणी बाधित व्हायला नको म्हणून ही काळजी बरे, साहेब तुमचा हा प्लॅस्टीकचा कप जाताना बरोबर घेऊन जा, नी लांब कोठेतरी टाका. कंपनीच्या आवारात नको. शिवाय तुम्ही वापरलेले टीशू पेपर ही बरोबर न्या. आम्ही त्यांना हात लावायचा नाही अशी ऑर्डर आहे आम्हाला! '' शिपाई.

आता मात्र प्रशांत चक्रावून गेला. येवढा परिणाम या कोरोनाचा की काय. साला वागणूक दिली जातेय, पूर्वी दिली जात होती मागास वर्गीयाना तशीच....

''बरे ! राजू ! मी असे किती दिवस येथे बसायचे ? प्रशांत.

''सहा महिने साहेब! ए.सी.शिवाय, कारण ए.सी.मध्ये कोरोना वाढतो म्हणून! '' राजू.

आज दिवसभर तेथील कोंदट हवेत त्याचे डोके भणाणले होते. त्याने स्प्रे मारला तरी वासच येत होता. शिवाय भयानक आवाज. तेथे पॅकींग होत असे म्हणून. शिवाय ट्रॉलीचा आवाज, गाड्या भरण्याचा आवाज. प्रशांत संध्याकाळपर्यंत अगदी पिकून गेला होता. काम संपण्याची खूप पराकष्ठा करीत होता. वर्षभराच्या अकांऊटस् मधल्या साऱ्या शंकांचे निरसन तो दिवसभर सी.ए.ला करीत होता.

संध्याकाळी ५ वाजता प्रशांतने त्याच्या जी.एम.ला इंटरकॉमवरून फोन केला,

'' हॅलो ! मी प्रशांत बोलतोय सर!'' मी तुमच्या कॅबीनमधे येऊ का ?

''नको ! तुम्ही तेथेच बसा, तुमचा आजार हा महामारीचा आहे ! त्याची लागण इतराना व्हायला नको ! काय बोलायचे ते इंटरकॉम वरच बोला !'' जी.एम.

'' नो सर ! नथींग !!'' प्रशांत

आणि त्याने चहाचे दोन कप वापरले. टीशू पेपर आपल्या बॅगेत ठेवले. नी तो गोडाऊन मधून बाहेर आला. ऑफिस सुटायची वेळ होती. सगळेजण बाहेर निघाले होते.. पण प्रशांतला बघताच सगळा स्टाफ एका बाजूला उभा झाला. नी त्याला वाट करून दिली. सगळ्यानी त्याला मुक नमस्कार केला पण एकही

जण जवळ आला नाही. त्याचा खास मित्र मांडे यानीही लांबूनच नमस्कार केला. नी तोही समोरुन निघून गेला. या सगळ्यांच्या अशा वागण्याचा अर्थ काय? कोरोना कां ? असे ही त्याला वाटले.

त्याने बाहेर येऊन आपली गाडी सुरू केली. आणि पुन: त्याने गाडी बंद केली. आणि आपल्या विचारात गढून गेला.

या कोरोनाने प्रेम, माणूसकी सारे काही डुबवले काय ? येथे माणसाला माणूस स्पर्श करेना तुच्छतेने वागवतो, कस्पटासमान समजतो. फक्त गरज म्हणून मी वा दामले बाई हवी. फोनवर बोलायलाही जी.एम. तयार नाही ? सगळी दिशाच बदलली आहे. आणि पुढचे सहा महिने मी या गोडाऊनमधे बसायचे. ए.सी. नाही, कोंदट हवा, स्टाफही नाही येत माझ्या कॅबीनमधे. जी.एम.नेही येऊन नका. कां म्हणाले ! मला कोरोना झाला म्हणून ? हा कोरोना झाला आणि माझी जात बदलली की काय ? साला बायकोही मुलाला लांबून दाखवते. बघायला तयार नाही आणि सासरी येण्यासही नकार द्यावा ? म्हणजे मी ब्राम्हणाचा कोरोना जातीचा झालो असेच नां ? तरी बरे घरच्यानी स्विकारला नाहीतर फुटपाथवर रहायची पाळी आली असती. पुन: त्याच्या मनात विचार येऊन गेला... ही कंपनी आपल्याला तुच्छ समजते, सोडून द्यावी कां? पण नाही पोटापाण्याचे काय ? बरे दुसरी नोकरी मिळेलही. पण ही कोरोनाची जात कोठवर लपून रहाणार? केव्हातरी बिंग फूटेल आणि पुन: ब्राम्हणाचा कोरोना !

भन्नाट वेगाने प्रशांत गाडी हाकीत होता. आणि त्याची गाडी विजेच्या खांबाला धडकली. पुढचे बॅनेट पार तुटले नी त्याच्या पायाला मार लागला. कोणीतरी त्याला बॉम्बे हॉस्पीटल मधे ॲडमीट केला. जेव्हा तो शुद्धीत आला तेव्हा...

''सर तुमचा कोरोना आणि इतर रिपोर्ट करायचे आहेत !'' नर्स

म्हणत तीने थुंकीसह रक्त, लघवी सारे काही घेऊन गेली. पण जाता जाता...

''सर तुमचा कोरोना + आला तर तुम्हाला कस्तुरबाला पाठवावे लागेल !'' नर्स.

कोरोनाचे नाव ऐकताच प्रशांत पार गळून पडला... आणि त्यात 'कस्तुरबा' म्हटल्यावर आता त्याने देवाला हात जोडले... देवा माझा रिपोर्ट निगेटीव्ह येऊ दे रे नाही तर कस्तुरबातून काही घरी जाणे नाही सरळ... स्मशानात! आता तर तो

कमालीचा घाबरला होता. हा रिर्पोट येई पर्यंत काही खरेनाही आपले. असे त्याला वाटले. दिवसभर नर्स, वाडबॉय, डॉक्टर या पैकी कोणीही त्याच्या रूम मधे आले नाही. रुम साफ करायला मेतरही आला नाही. घरी समजल्यावर घरचे लोक आले पण त्याच्या रुम मधे त्याना प्रवेश नाकारला आणि त्या रुम बाहेर 'संभाव्य कोरोना पेशंट' असा बोर्ड लावून ठेवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी... डॉ. फडकर त्याचे डॉक्टर फक्त डोकावून गेले न बोलताच त्याच्याशी. त्यामुळे प्रशांत अधिकच अस्वस्थ झाला... नर्स एकदा डोकावून गेली...

''सर! तुमचा कोरोना रिपोर्ट रात्री येणार आहे ! मगच आम्ही पुढची ट्रिटमेंट देऊ. तोवर पडून रहा !'' नर्स

ते दोन दिवस प्रशांतला झोपही लागली नाही. आणि आपली बायको कुंदा अशी कां वागली याची उत्तरे त्याला मिळू लागली... तिचे वागणे जवळ येण्यास टाळणे, सासरी येण्याचा नकार. आणि कालची ऑफिसमधली वागणूक. हा सारा प्रताप त्या कोरोनाचा आहे हे त्याच्या मनाला पटले. पण त्याचे मन अजून निवले नव्हते. कमालीचा स्वतःवर आणि कोरोनावर रागावला होता. नाईलाजाने.

दुसरा दिवस सकाळ आणि तरी रिपोर्ट आल्याचे कोणी सांगेना. तो कमालीचा अस्वस्थ झाला होता. ना औषध ना काही. पायाला जखम झाली होती पण कोणीही बँडेज करायला येईना. पायाला आता सुजही चढू लागली होती म्हणजे फ्रॅक्चर नक्की झाले असणार. याच विचारानी तो कमालीचा घाबरुन गेला होता. त्याने त्याच्या डॉ.ना फोन केला ते म्हणाले कोरोनाचा रिपोर्ट आल्यावरच मी येईन तोवर कळ काढा !'' रिपोर्ट का नाही आला तर म्हणे पुण्याला सँम्पल पाठवले आहे. ते आल्यावरच ट्रिटमेंटचा विचार करु. तेव्हा तुम्हाला उद्यापर्यंत थांबावे लागेल. एक्स-रे ही काढता येणार नाही !

त्या दिवशी संध्याकाळी कोरोनाचा रिपोर्ट निगेटीव्ह आला नी प्रशांतचा जीव भांड्यात पडला. मग मात्र हॉस्पीटलमधे डॉक्टर, नर्सेस, वार्डबॉय यांची धावपळ झाली. एक्स-रेत पायाचे हाड क्रॅक झाले आहे हे समजले आणि ओ.टी.मधे घेऊन ऑपरेशनही पार पडले.

संध्याकाळी १० वाजता तो शुद्धीवर आला. घरुन आई वडील आले होते. त्यात कुंदाचाही फोन आला. त्याला हायसे वाटले. पण आपली जात बदलली

याचा विचार काही डोक्यातून जाईना. रात्री नर्सने त्याला झोपेची गोळी दिली आणि रात्रभर छान झोप लागली. त्याचे वडील रात्रभर त्याच्यासोबत रुम मधे होते.

सकाळी ८ वा. पुनः कुंदाचा फोन आला ती खूप वेळ त्याच्या जवळ बोलली झालेले गैरसमज, आजूबाजूची लोकांची मानसिकता या बाबतही बोलणे झाले. प्रशांतच्या डोक्यातली कुंदाची गैरसमजाची गोळी थोडी विरघळू लागली होती. मग सकाळ संध्याकाळ तिचा फोन यायचा तिच्या वागण्या मागचा भाव हा तीच्या व मुलाच्या सुरक्षिततेबाबत होता हे त्याला समजले व गैरसमज थोडे दूर झाले. कधी एकदा कुंदाला भेटतो मी आणि माझ्या मुलाला असे प्रशांतला झाले होते. पुढचे १५ दिवस तो बॉम्बे हॉस्पीटल मधेच होता. आता आपण आपल्या ऑफिसला न जाता घरुनच ऑनलाईन काम करावे अशी सुचना जी.एम. ने केली. देव पावला असे प्रशांतला वाटले. गेले ६ महिने तो घरूनच काम करीत होता. कुंदाही आली घरचे सारे वातावरण आनंदी झाले होते. पण तरीही प्रशांतने कुंदा नी मुलगा यांच्या पासून काही महिने दूर रहाण्याचा निर्णय स्वतःच घेतला. सगळ्यांच्या भल्यासाठी.

०–०–०–०–०–०

# देव रिटायर्ड होताना

अनंतरावानी नवा बंगला बांधला आणि घरातल्या देवासाठी नवा देव्हाराही आणला. वीस हजाराचा, जुना देव्हारा आता तसा कंडमच झाला होता. वाळवी लागली होती आणि फक्त तग धरुन होता. आता बघा नवा बंगला. मग जुन्या सगळ्या वस्तुना थारा नाही घरात. अशा अनेक टाकाऊ वस्तूंना बाहेरचा रस्ता दाखविला. आता घर नव्या गोष्टींनी सजत चालले होते. अनंतरावानी नवा देव्हारा आणला आणि जुन्या देव्हाऱ्या शेजारी ठेवला. सारखा तो नवा देव्हारा त्यांना सतवायचा. अहो अनंतराव माझा गाभारा रिकामा आहे. त्या तुटक्या देव्हाऱ्याला बदला आणि माझी वर्णी लावा सन्मानाने. मी किती दिवस असा तोंड वासून वाट पहात राहू.

खरे तर मुहूर्त सापडत नव्हता वास्तुशांतीचा. शिवाय सगळ्या नातेवाईकांना बोलवायचे तर मुलांच्या परीक्षात ते अडकलेले त्यानी जठार गुरुजीना फोन केला. ते म्हणाले ''अहो वास्तुशांतीचा मुहूर्त पार मे महिन्याच्या ३० तारखेला आहे. अजून दोन महिने आहेत. तेव्हा जरा दम धरा!''

''अहो पण देव्हाऱ्यात देव ठेवायचे आहेत. नव्या देव्हाऱ्यासाठी तरी मुहूर्त द्याना !'' अनंतराव

''नाही ! त्यासाठी मुहूर्ताची गरज नाही. तुम्ही हवे ते देव नव्या देव्हाऱ्यात ठेवा!'' गुरुजी

''अहो पण नव्या देव्हाऱ्यात, पूर्वी सारखे देव मावणार नाहीत..काय करावे ?''अनंतराव.

''काही देवांना रिटायर्ड करा! '' गुरुजी

''काय म्हणालात? देवाना रिटायर्ड करा?'' अनंतराव

''हो कमी करा देव देव्हाऱ्यातले ! मावतील तेवढेच ठेवा !'' गुरुजी.

या गुरुजींच्या वक्तव्याने अनंतराव मात्र पार गांगरून गेले. काय करायचे? देवाना रिटायर्ड? कसे शक्य आहे? आजवर मनोभावे त्यांची पूजा केली त्या देवाना रिटायर्ड करायचे म्हणजे ? तसे केले तर काही खरे नाही बाबा. कोपतील की ते देव! काय करावे हे अनंतरावाना समजत नव्हते. त्यानंतर १५ दिवस अनंतरावांची झोप उडाली To be or not To be अशी अवस्था झाली होती. देव कमी करावे तर पंचाईत नाहीतर सगळे देव मावणे कठीण. काही केल्या त्याचे

मन काही निर्णय घ्यायला तयात नव्हते.

आणि मग नाईलाज म्हणून देव्हाऱ्यातल्या कोणत्या देवाना रिटायर्ड करायचे याचा विचार सुरु झाला. तरीही निर्णय होत नव्हता. अहो त्यानी एक यादी तयार केली. ज्याना बाहेरचा रस्ता दाखवायचा होता ते. पण पुनः मनात गोंधळ ती यादी फाडून टाकली. पुनः दुसरी यादी त्यात पहिल्या यादीतले काही देव नव्हते म्हणजे आत येणार होते. पुनः तिसरी यादी  पण निर्णय काही होईना. अनंतराव द्विधा अवस्थेत गेले पंधरा दिवस होते. गावातल्या, नात्यातल्या लोकांजवळ त्यांचे बोलणे झाले. कोणीच होय म्हणेना, पण सगळ्यानी अनंतरावांच्या डोक्यात भिती मात्र घुसवली.

''अहो ! काय वेडे आहात कां ? देव कोणी कमी करतो कां देव्हाऱ्यातले ? उलट वाढत जातात त्याना सामावून घ्यायचे !'' लोक

''अहो पण मुळात नव्या देव्हाऱ्यात जागाच कमी आहे. मग मी काय करावे ?'' अनंतराव.

लोक चिडीचुप... गेले ७/८ दिवस अनंतरावाना झोपही निट लागत नव्हती. खरेतर आजवर जुन्या देव्हाऱ्यात पूजलेल्या देवाना काढून टाकावे या साठी त्यांचे मन काही धजत नव्हते. भीती होती ती की देव शाप देतील. नवी वास्तू त्यातला नव्याने होणारा वावर, पुढे ही वास्तु नीट फळेल कां? या विषयीच्या शंका कुशंकानी अनंतराव पार ठेपाळून गेले होते. त्यानी १० ता.ला देव्हारा बदलण्यासाठी शुभ दिवस निवडला. मधे चार दिवस होते. पण अनंतरावांची द्विधा अवस्था काही बदलायला तयार नव्हती.

त्या दिवशी रविवार होता आणि देव्हाऱ्याच्या बदलाचा गुरुवार. म्हणजे या चार दिवसात काही तरी निर्णय व्हायला हवाच होता. पण स्थापनेचा दिवस जस जसा जवळ येत गेला. अनंतरावांचा बी.पी वाढत गेला. झोप लागेना, बैचेन झाले होते. सगळे  देव्हाऱ्यातले देव गरा गरा फिरत डोळ्या समोर दिवसा आणि रात्रीही. मंगळवारी ते चिंताग्रस्त अवस्थेत बंगल्याच्या व्हऱ्यांड्यात बसून होते. चित्त ठिकाणावर नव्हते. येवढी मोठी रिस्क घ्यायला मन तयार नव्हते. लोक काहीही म्हणोत पण 'देव'ही संकल्पना माणसाने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी परमात्म्याची निर्माण केली तिची प्रतिमा वेगवेगळ्या रुपात तयार केली आणि आपल्या नजरे समोर ती दैवत सतत राहावीत यासाठी पूजेला लावली. आणि देव्हाऱ्यात डांबली.

त्याना माहिती होते की आपल्या हिंदुच्या कडून तेहतीस कोटी देवांची पुजा अर्चा होते आपण तर त्यातल्या आठ देवांचीच पूजा करतो . त्यात गणपती, ग्राम देवता, कुलस्वामीनी, बाळकृष्ण, तसेच दत्त महाराज आणि साई बाबा यांचा सामवेश होता. तसे पाहिले तर सर्वच देवता आपल्याला प्रिय, कोणाला रिटायर्ड करायचे हे याचा निर्णय होत नव्हता. जस जसा स्थापनेचा दिवस जावळ येत होता अनंतरावाच्या डोक्याचा खार वाढत होता. बरे देव्हाऱ्यात अडचण होती ती दोन देवांची दत्त आणि साईबाबा. त्या तसबिरी तशा आकाराने मोठ्या होत्या पण सुंदर. आनंदरावानी त्या खास बनवून घेतल्या आणि त्यांची ते मनोभावे पूजा करीत असत. त्यांनाच बाद करायची हिम्मत होत नव्हती आनंदरावाना.

दुसरे कारण फार महत्वाचे होते. ते म्हणजे आनंदरावांचे आजोबा गुरुपदावर होते. त्यांचे आजही शेकडो शिष्य गावात होते. ते स्वत: दत्त भक्त ते म्हणजे आजोबा. आणि आनंदराव साई भक्त. अनेक वेळा त्यानी शिरडीची पायी वारी केली होती. गेल्या तीस वर्षात त्यांची शिर्डीची भेट झाली नाही असे कधी झाले नाही. म्हणजे या दोन देवतांच्या तसबीरी रिटायर्ड करायची हिम्मत त्याना होत नव्हती.

आता उद्या स्थापनेचा दिवस मुहूर्त पाहून पक्का केला होता. तो दिवस शुभ आहे असे जठार गुरुजीनी त्याना सांगीतले होते. आणि देव्हाऱ्यात मूर्तींची स्थापना तुम्हीच करा असे सांगीतले. पण तुम्ही प्रथम नव्या देव्हाऱ्या खाली रांगोळी घाला. मध्ये स्वास्तिक काढा आणि प्रथम नव्या देव्हऱ्याची पूजा करा. मगच प्रतिष्ठापणा करा. पण त्या पूर्वी सर्व देवताना पंचामृताने स्नान घाला. मग गंधांक्षता, हळद, कुंकु व फुले वाहा, स्वत: देवताना नमन करुन प्रार्थना करा. बस ! हे सगळे उद्या करायचे होते. पण आजची रात्र त्याना वैऱ्याची झाली होती, रात्रभर त्याच्या डोळ्याला डोळा लागला नाही.

मात्र सकाळी उठल्या उठल्या त्यांच्या पत्नीने त्याना विचारले.. ''काहो! काल रात्रभर तळमळत होतात, झोप लागली नाही काय ? ते म्हणाले हो ! आणि त्यानी आपली व्यथा तिच्या जवळ बोलून दाखवली. त्यांची पत्नी तशी हुशार म्हणजे हुशारच म्हणायला हवी.

''तुम्ही एक काम करा ती अडचण माझ्यावर सोडा. आणि या क्षणापासून निश्चींत रहा !'' लक्ष्मी.

''अरे वा ! मग तर देवच पावला! मी अंघोळ करुन घेतो. पूजेची तयारी

करतो !'' आनंदराव

''हो ! तुम्ही तुमच्या कामाला लागा, शेजारी एक टेबल आहे ना त्यावर ते दोन फोटो ठेवा. पूजा करताना त्यांचीही पूजा करा. आणि पुढचे माझ्यावर सोडा!'' लक्ष्मी.

आनंदरावाना आनंद झाला होता. तो लक्ष्मी काहीतरी तोडगा काढील याचा. त्यानी  दत्त महाराज आणि साईबाबा यांच्या तसबिरी वेगळ्या टेबलावर मांडल्या. ज्या नव्या देव्हाऱ्यात मावल्या त्यांची मांडणी केली आणि पूजा केली. नंतर त्या दोन्ही तसबिरींचीही. तरी त्यांच्या डोक्यातला विचार काही थांबेना. काय उपाय करणार लक्ष्मी. काही बोलतच नाही. पण काही म्हणा आनंदरावांचे टेंशन थोडे उतरले होते. शिवाय आता उरलेल्या देवता नव्या देव्हाऱ्यात स्थानापन्न झाल्या होत्या. तेव्हा एक काम पूर्ण झाले होते.

नंतर त्यानी बाजूच्या टेबलावर ठेवलेल्या तसबिरींचीही पूजा आटोपली आणि लक्ष्मीला हाक मारली....

''लक्ष्मी !  इकडे ये ! पूजा आटोपली !'' आनंदराव

''हो ! येते ह! तोवर तुम्ही टी.व्ही. पाहत बसा. माझा किचन मधला पसारा मी आवरुन घेते आणि येते. दहा मिनिटात !'' लक्ष्मी.

''हो ! चालेल !'' आनंदराव.

आणि त्यानी टी.व्ही. वरचा 'सत्संग' चॅनल लावला ....

भारती महाराज देवतांच्या स्वरुपा विषयी बोलत होती. ''खरेतर परमात्मा निराकार आहे. त्याला देव बनवून आपणच सगुणाचे रुप दिले आणि पूजा अर्चा सुरु केली आहे. तुम्ही निर्गुण रुपाची उपासना करा. सगुणाचा मोह सोडा !''

आनंदरावांच्या डोक्यातला 'मोह' आदर्श वितळायला लागला  होता. हा कार्यक्रम अर्धा तास चालला होता. आनंदराव भारती महाराजांच्या प्रवचनाने अचंबित झाले. आणि तल्लीन होऊन ऐकत होते.

तुम्ही आपल्या ध्यानाच्या ठिकाणी तुमच्या इष्ट देवताना उभ्या करुन त्यांचे स्मरण करा. बस् हाच मुक्तीचा मार्ग आहे. बाकी सगळ्या उपाधी आहेत. काडीचाही फायदा त्या पासून नाही! '' भारती महाराज.

या अर्ध्या तासाच्या प्रवचनाने आनंदराव अंतर बाह्य बदलत गेले होते. त्या तसबिरींचा मोह पार विरघळून गेला. येवढ्यात लक्ष्मी आतून बाहेर आली. तिही टि.व्ही. वरचे प्रवचन ऐकत होती. हा ही एक योगायोग होता. परमात्मा

सर्वांचे चांगलेच करतो तो कोणाचेही वाईट करीत नाही. हा ही आनंदरावांचा समज पार दूर झाला.

''काय हो! काय म्हणत होतात ? मला किचन आवरायला वेळ झाला !'' लक्ष्मी.

''नो प्राब्लेम !'' आनंदराव.

''तुम्ही त्या दोन्ही प्रतिमांची पुजा केलीत कां? मलाही प्रसाद द्या की !'' लक्ष्मी.

''देतो ! तू काय सांगणार होतीस या प्रतिमांबद्दल ते आधी सांग. तुझ्या सांगण्या प्रमाणे वेगळ्या टेबलावर ठेऊन मी पूजा केली आहे. तेव्हा तुझे म्हणणे काय ?'' आनंदराव.

''हे पहा तुम्ही भारती महाराजांचे प्रवचन ऐकलेत नां? बस् ! तुम्हाला मी काहीही सांगायची गरज नसावी !'' लक्ष्मी.

''नाही ! तसे नाही ! पण या प्रतिमांचे काय करायचे?'' आनंदराव.

''सांगते ! असे पुढे या आणि या प्रतिमातल्या देवतांना नमस्कार करा !'' लक्ष्मी. म्हणत दोघांनी हात जोडले.

'' हे देवाधी देवा दत्त महाराज. साईनाथा आजवर आम्ही तुमची पूजा करीत आलो. आता तुमचे नाम मुखात कायम ठेवायचे वचन आम्ही तुम्हाला देत आहोत. दत्त जयंती, गुरुपौर्णिमा, श्रीकृष्ण जयंती या दिवशी ही पूजा षोडोपचार करीत आलो तशीच पूजा मानसपूजेच्या मार्गने आणि वरील प्रसंगी करीत राहू. त्यात खंड पडणार नाही. तेव्हा आमच्यावर रागाऊ नका. कृपार्शिवाद असावा. आम्ही उभयता तसे वचन तुम्हाला देत आहोत. पण तुर्तास तुम्हाला रिटायर्ड करावे लागणार आहे. आणि आपली रवानगी व्यवस्थित बस्तानात बांधून आमच्या कपबर्ड.... मधे करणार आहोत. क्षमा करावी आणि आमच्यावर कृपाशीर्वाद ठेवा..!'' लक्ष्मी.

आनंदराव चाटच पडले, साला खरंच बायको हुशार आहे आपली. गेले महिनाभर सतावणारी माझी अडचण हिने मिनिटात सोडवली. आणि दोन्ही फोटोना बांधून त्याना रीटायर्ड केले गेले. पूढच्या गुरुपौर्णिमे पर्यंत !''.

आज आनंदरावांना छान झोप लागली खरी. पण रात्रभर गेल्या महिनाभराचा ताप मात्र तसाच फेर धरुन पुढे पुढे सरकत होता. पण आता टेंशन नव्हते!

०-०-०-०-०

# बेवारस

रात्रीच्या एस.टी. ने मी मुंबईला निघालो. बऱ्याच दिवसांनी मला जायचे होते बोरिवलीला. गाडी स्पेशल स्टील जवळ ४ वाजता पोहोचली आणि मी रिक्षा पकडून घरी निघालो. घर काही फारसे लांब नव्हते. पाचच मिनिटात मी आमच्या घराच्या रस्त्यावर पोहोचलो.

वॉचमनने गेट उघडले. माझी रिक्षा आत गेली. मी उजव्या बाजूला पाहिले तर एक जातीवंत अल्सेशियन कुत्रा डोळे झाकून झोपला होता. थंडीचे दिवस होते ते. आणि मी अधिक वेळ तेथे थांबू शकत नव्हतो. कारण रिक्षावाल्यांना घाई सकाळी गिऱ्हाईक पकडण्याची. पण त्या कुत्र्याला पाहिल्यापासून माझी विचार चक्रेचालू झाली. हा जातीवंत कुत्रा येथे कसा काय? कोणाचा असेल बरे ? अशा किमती कुत्र्याला 'बेवारस' सारखा मालकाने सोडला तरी कसा ? तशा प्रकारचे अनेक कुत्रे आमच्या कॉलनीतल्या श्रीमंताकडे होते. शौक म्हणून.

मी रिक्षा सोडली आणि लिफ्टने घरी गेलो. दरवाज्याची बेल मारली. कोणी उघडला दरवाजा आठवत नाही... पण विचार चक्रात मी मात्र मनाने गुंतलो होतो त्या अल्सेशियन कुत्र्यातच.

मग ६।। वाजता मी माझ्या नातवाला त्याच्या शाळेच्या गाडीपर्यन्त गेलो. म्हणजे जेव्हा जेव्हा मुंबईला असे तेव्हा त्याची इच्छा असे की आजोबा सोबत यावेत शिवाय माझे मन ओढ घेत होते ते त्या कुत्र्याच्या साठी.

भराभर पाऊले उचलीत मी लिफ्टच्या दरवाजापर्यंत पोहोचलो. पण तो कुत्रा अजूनही तेथेच झोपलेला होता शेकोटी जवळ. आज तशी थंडी खूप होती. पण मला तेथे रेंगाळणे शक्य नव्हते. कारण बस येईल या भीतीने मी गेटच्या बाहेर गेलो माझ्या नातवाबरोबर.

शाळेची गाडी आली आणि निघून गेली. मी नेहमीप्रमाणे थोडे फिरून यायचे ठरवले. पण मग फार दूर न जाता पुनः कॉम्प्लेक्सच्या गेटवर आलो.

"राम राम साहेब !" राणे.

"राम राम !" मी.

"बऱ्याच दिवसांनी गावाकडून येणे झाले."

"हो घराचे काम चालू आहे. तेव्हा मुक्काम तिकडेच होता ४ महिने.

"बसा की जरा ! मी शेकोटी पेटवली आहे. छान थंडी पडलीय ... मग घरी

जा.'' राणे.

मला त्यांनी दिलेल्या खुर्चीत मी बसलो. ''अहो राणे ! हा कुत्रा कुणाचा? आणि इथे कसा काय ? मी.

''बी विंग १२०४ च्या शर्मांचा. गेली चार महिने इथेच असतो आपल्याजवळ दिवसभर. आम्ही त्याला खायला घालतो. पडून असतो इथे. आम्हालाही आधार वाटतो. त्याचा कधी डोळा लागला तर !'' राणे.

''पण तो इथे कसा काय ?'' मी.

''काय सांगू साहेब. ते शर्मा कायमचे गेले कॅनडाला, पुन्हा न परतण्यासाठी... आणि या डॉगीला येथे सोडून दिला. वेड्यासारखा झाला होता. कॉलनीत त्याने खूप हंगामा केला. पण मग आम्हीच त्याला आधार दिला... आज तो जरी आपल्या जवळ असला तरी सुरुवातीला पाळलेला तुपाशी खाणारा हा कुत्रा ४-५ दिवस उपाशीच होता आम्ही आणला तेव्हा.'' राणे.

तो कुत्रा तसा सगळ्यांना प्रिय होता. मुलांचा तो आवडता होता. लहान मुले त्याची लुसलुशीत आयाळ कुरवाळत असत. त्याचा मालक पट्टा लावी गळ्याला पण ... सकाळी बाहेर घेऊन जाताना त्याला. कारण इतर कुत्रे त्याला सतावीत असत म्हणून... पण आज त्याला पट्टा नव्हता. शेकोटीच्या बाजूला तो मान टाकून बसला होता... साहेब हे सुखात वाढलेले कुत्रे येथे बेवारशा सारखे आहे. म्हणजे जरी आमच्या येथे असला तर तो 'मजबूरीने, आम्ही त्याची काय काळजी घेणार ? परवा रस्त्यावरच्या कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला केला. पायाला जखम झाली आहे. खरेतर त्याला कुणीतरी दवाखान्यात न्यायला हवे. पण आम्हाला खर्च कसा परवडणार ? सोसायटीतले कोणीही लोक त्याच्याकडे ढुंकूनही बघत नाहीत. आम्ही गरीब माणसे, आम्ही काय करू शकतो? आम्ही त्याला चपाती भात देतो. पूर्वी ४-५ दिवस त्याने काहीच खाल्ले नाही. नंतर कुठे त्याने तोंड लावले.

जवळ जवळ १/२ तास मी तेथे बसून मग उठलो. त्या कुत्र्याने वर मान करून माझ्याकडे पाहिले. मी थोडावेळ तेथे उभा राहिलो. मला तेथून पाय काढणेही कठीण झाले होते. मी पुनः त्या खुर्चीत बसलो. मी ४ महिन्यांनी आलो. आमचे फिरायला गेलेले वयस्क मित्रमंडळीही त्या गेटवर जमा झाले.

आम्ही त्या सिक्युरिटी ऑफीसमध्ये बसलो. आणि चर्चा सुरू झाली. या

कुत्र्याचे भवितव्य काय? हा सुखवस्तु प्राणी या उघड्या थंडीत मरेल. त्याला सवय नाही या वातावरणाची. पण त्याच्यासाठी कुणीही तयार होईना. शेवटी त्याला डॉक्टरकडे नेऊन आणायचे ठरले. व डॉक्टरकडे नेऊन आणला. त्याच्या पायाची जखम भरली होती. औषधे चालू झाली होती. पण जखम बरी व्हायला वेळ लागणार होता. प्रश्न अजून आधांतरीच होता. या कुत्र्याचे काय करायच?

८-१० दिवस असेच गेले. तो कुत्रा तसाच तेथे 'बेवारस' अवस्थेतच तेथे पडून होता. त्यानंतरही आता जवळजवळ ४/५ वेळा त्या कुत्र्याला हॉस्पिटलला नेऊन आणला.

त्यानंतर शनिवार व मग रविवार मी खाली गेलो नव्हतो. सोमवारी मी माझ्या नातवाला शाळेत सोडायला गेलो तर तो कुत्रा मला तेथे दिसला नाही. आणि राणेही ड्युटीवर नव्हते.

''अहो दादा ! तो कुत्रा दिसत नाही तो ?''

''तो कालच मेला! आम्ही पुरला बाजूच्या गार्डनमध्ये. कालचीच गोष्ट. सगळी मुले होती त्यांच्या लाडक्याच्या अंत्यविधीला. सगळ्यांनी मुठमाती टाकली त्याच्यावर आणि साश्रु नयनांनी त्याला निरोप दिला साहेब!'' तुमच्याशी संपर्क झाला नाही सर !''

मी अगदी सदगदीत झालो. डोळ्यात पाणी उभे राहिले आणि त्या शर्माला चांगली एक शिवी हासडून मी माझे डोळे पुसले. आणि तसाच परतलो. पण डोळ्यातल्या धारा काही थांबयला तयार नव्हत्या... सारखी त्याची छबी डोळ्यासमोर तरळत होती... बेवारशी रुपात !!

०-०-०-०



लेखक

# ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

आपल्या सभोवताली घडणाऱ्या प्रत्येक गोष्टींचा परिणाम कवी किंवा लेखकावर होत असतो आणि या परिणामाची परिणिती साहित्य निर्मितीत होत असते, ॲड. यशवंत कदम यांच्या सर्वच कथांमधून याचा प्रत्यय येतो.

साहित्य निर्मिती करीत असताना सर्वच लेखक आपल्या कोणत्याही प्रकारच्या कलाकृती मधून ज्ञान आणि मनोरंजन यासह समाज प्रबोधनही करीत असतो. ॲड. यशवंत कदम यांच्या "मावळतीच्या सावल्या" या कथासंग्रहातील कथाही याला अपवाद नाही. त्यांनी आपल्या कथासंग्रहातील कथांमधून तत्कालीन परिस्थितीसह मानवी मनाचे अंतरंग चित्रित करण्याचाही प्रयत्न केला आहे.

ॲड. यशवंत कदम हे एक निष्णात वकील आहेत, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या कार्यकालात अनेक प्रसंग पाहिले आहेत आणि समाजात वावरत असताना विविध अनुभव घेतले आहेत, याचा परिणाम त्यांच्या साहित्यावर झालेला दिसतो. जीवनाकडे पाहण्याच्या नितळ दृष्टिकोनातून, आपल्या स्वानुभवातून आणि निरीक्षण शक्तीद्वारे त्यांनी आपल्या कथांमधून अगदी साधे प्रसंग घेऊन कथांची मांडणी केली आहे. ते केवळ कथा सांगून थांबत नाही तर, त्यांनी प्रत्येक कथेतून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांनी काही चांगले संदेशही या कथांतून दिले आहेत.

आपल्या जीवनामध्ये घडणाऱ्या बऱ्या वाईट प्रसंगांना सामोरे जाताना काही व्यक्तींच्या त्यावरील क्रियांचा आणि प्रतिक्रियांचा वेध या कथांमधून कदम यांनी घेतला आहे. त्यांनी त्यांची जीवनानुभूती सहजपणे साध्या शब्दात कधी कथांच्या रुपाने तर कधी आत्मकथनाच्या रुपाने शब्दबद्ध केली आहे.

या कथांना सामाजिक जाणिवेची किनार लाभलेली आहे. लहानशा प्रसंगातून मोठा आशय व्यक्त करण्यात कदम यशस्वी झाले आहेत.

**कमलाकर राऊत**

(कवी व समीक्षक)

कोमल प्रकाशन